
कथासंग्रह
लंडनचा
किनारा
लेखक
ॲड. यशवंत बाबुराव कदम
(नमनेश्वर)

# लंडनचा किनारा

कथासंग्रह

ॲड. यशवंत बाबुराव कदम,
नमनेश्वर

कोमल प्रकाशन

# लंडनचा किनारा

(कथासंग्रह)

हे पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल टीम ई साहित्य प्रतिष्ठान

लेखक- **ॲड. श्री यशवंत बाबुराव कदम**

आणि प्रकाशक- **कोमल प्रकाशन**

यांचे मनःपुर्वक आभारी आहे.

या पुस्तकावरील प्रतिक्रिया आपण ॲड. श्री. यशवंत बाबुराव कदम यांना **ybkadam14@gmail.com** या ई मेल पत्त्यावर किंवा **9892046868** या phone क्रमांकावर कळवाव्या ही विनंती.

धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237
(Whatsappवर विनामूल्य ई पुस्तके मिळवण्यासाठी
आपले नाव व गाव कळवा)

**लंडनचा किनारा / कथासंग्रह**
Londoncha Kinara / Kathasangrah
पहिली आवृत्ती : १ मे २०२३

ISBN No. : ?

**लेखक :**
© ॲड. यशवंत बाबुराव कदम
बी-११०१, एकता मेडोज, सिद्धार्थ नगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६.
भ्रमणध्वनी : ९८९२०४६८६८/९६१९३६०६६१

**प्रकाशक :**
१) कोमल प्रकाशन
३०२, कृष्ण श्रद्धा, पांचाळनगर,
नालासोपारा (प.), जि. ठाणे.
मोबाईल : ९१३७६ ६५९६८/९९८७७ ७६८९९
२) ई-साहित्य प्रतिष्ठान

**मुखपृष्ठ :**
नरेश ठाकूर
मोबाईल : ९८२०३८०२९९

**अक्षर जुळणी :**
चैतन्य आर्टस्, दादर, मुंबई ४०० ०२८.
मोबाईल : ९२२३४७८४८९

**मुद्रक :**

----

मूल्य
रु. १६०/-

**'लंडनचा किनारा'** या माझ्या कथासंग्रहातील कथांमध्ये वाचकांना काही प्रसंग, नावे, काही सत्य घटना आढळून आल्यास, माझ्या कथेतील वास्तव चित्रण, व्यक्तिदर्शन आणि घटना प्रसंग यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, असेल तर तो केवळ योगायोग समजावा... **ॲड. यशवंत बाबुराव कदम**

# अल्प–परिचय

**ॲड.यशवंत बाबुराव कदम**

बी.ए., एल. एल. बी. ॲडव्होकेट हायकोर्ट, मुंबई

| | |
|---|---|
| **जन्मतारीख** | : १४ ऑगस्ट १९४८ |
| **मूळगांव** | : मु. पो. टेरव, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी |
| **प्राथमिक शिक्षण** | : ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा, मुंबई |
| **महाविद्यालयीन शिक्षण** | : रुईया महाविद्यालय, मुंबई<br>न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई |
| **नोकरी** | : आयकर खाते (मुंबई) येथून वरिष्ठ अधिकारी म्हणून निवृत्त<br>सध्या – मुंबई उच्च न्यायालयात वकिली<br>***<br>खालील साहित्य संस्थांशी स्थापनेपासून सहभाग<br>काव्यमंच, मुंबई<br>कोकण मराठी साहित्य परिषद<br>मराठा मंदिर साहित्य संघ, मुंबई<br>लोटिस्मा, चिपळूण आणि अनेक सामाजिक संस्था<br>*** |

**प्रकाशित साहित्य** :

१. सद्गुरू दत्तात्रय शिंदे महाराजांचे जीवन परिचय १९७५
२. फुलोरा प्रातिनिधिक काव्यसंग्रह २००८
३. जीवनगाणे (काव्यसंग्रह) ५ जून २०१०
४. अंतरंगत (काव्यसंग्रह) २८ फेब्रुवारी २०१०
५. घे भरारी प्रातिनिधिक काव्यसंग्रह २०११
६. जय दुर्गे (आरती संग्रह) २०११
७. भक्तिरंग (काव्यसंग्रह) २०१२
८. बोलविता धनी वेगळाची (काव्यसंग्रह) ११ जानेवारी २०१३
९. तांडव (चरित्र) ११ जानेवारी २०१३
१०.जय दुर्गे (आरती संग्रह) चौथी आवृती
११.श्री कुलस्वामिनी आई भवानी वाघजाई देवस्थान, श्री क्षेत्र टेरव मंदिराचा समग्र इतिहास, ८ मे २०१३

१२.बोलके झाड (कथासंग्रह) मार्च २०१६
१३.महामानव... (प्रातिनिधिक कविता संग्रह) मार्च २०१६
१४.दसपटीच्या श्रीरामवरदायिनीचा इतिहास (संपादित एप्रिल २०१६)
१५.आकाशाचे पंख (कथा संग्रह) १८ फेब्रुवारी २०१७
१६.अंतरीचा दीप (अभंगगाथा) १२ एप्रिल २०१८
१७.गडगीचा डोह (कथासंग्रह) २० मे २०१८
१८.देव माणूस (व्यक्तिचित्र) मे २०१८
१९.लोहितचे मानसपुत्र : संत शंकरदेव यांचे चरित्र (मार्च २०१९)
२०.हरिपाठ चिंतन (मार्च २०१९)
२१.वळणावळणाची वाट (कादंबरी) १६ डिसेंबर २०२२
२२.मावळतीच्या सावल्या (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२३.गरुडझेप (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२४.ऊनपावसाचा खेळ (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२५.लंडनचा किनारा (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२६.आडवळणाची वाट (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२

**आगामी पुस्तके** : ◆ चांदण्याचा पाऊस (ललित लेख)
◆ मावळतीच्या साक्षीने (कविता संग्रह)
◆ शब्द स्फोट (हिंदी काव्यसंग्रह)
◆ क्षितीजा पलीकडच्या प्रवासात (मराठी काव्यसंग्रह)
◆ आध्यात्मिकतेचा अन्वयार्थ - एक अभ्यास (ज्ञानदेव आणि तुकाराम)

**पुरस्कार** : 'जीवन गौरव पुरस्कार' - वंदना प्रकाशन उल्लेखनीय साहित्यिक कार्याबद्दल.
लोटिसमाचा कविवर्य द्वारकादास शेंडे कथा पुरस्कार २०१८ बोलके झाड या कथा संग्रहाला. गो. नि. दांडेकर यांच्या नावाचा कथेला तृतीय पुरस्कार २०१८ कोकण मराठी साहित्य परिषदेचा 'गडगीचा डोह' या कथा संग्रहाला विशेष पुरस्कार, २०१८.

# अर्पण पत्रिका

''**लंडनचा किनारा** '' हा माझा कथासंग्रह
मी माझे प्रिय कुटुंबीय
सौ. सुजाता यशवंत कदम, डॉ. नितीन यशवंत कदम,
सौ. शीतल नितीन कदम, सोनिया नितीन कदम आणि
रोहित नितीन कदम यांना अर्पण करीत आहे...

**– ॲड. यशवंत बाबुराव कदम**
**नमनेश्वर**

# मनोगत

यापूर्वी माझे तीन कथासंग्रह, बोलके झाड, आकाशाचे पंख व गडगीचा प्रकाशित झाले आहेत. गडगीचा डोह २०१८ साली प्रकाशित झाला. आणि आता ऊनपावसाचा खेळ, मावळतीच्या सावल्या, गरुडझेप आणि लंडनचा किनारा हे पाच कथा संग्रह आणि वळणावळणाची वाट ही कादंबरी प्रकाशित होत आहे. त्यानंतर २०१९ मध्ये हरिपाठ चिंतन व लोहितचे मानसपूत्र संत शंकर देव यांचे भाषांतरीत चरित्र प्रकाशित झाले. त्यानंतर कोकणात चिपळूणला जाणे झाले व मग अडकलो कोरोनाच्या चक्रात. त्या काळात झपाटल्यासारखा लिहीत होतो. निवांत वेळ, लिहिणे हाच विरंगुळा होता मला आणि त्याच काळात कथांचा पाऊस पडला. कोरोना काही संपत नव्हता आणि जेव्हा तो आटोक्यात आला, वातावरण स्वच्छ झाले पण या सर्व कथांचे डीटीपी कसे होणार हाच यक्ष प्रश्न होता. चिपळूणला याची सोय नव्हती.

त्यात मधल्या काळातले जीव घेणे आजारपण, सावरलो त्यातून आणि त्या वह्यांचे बाड माझ्या भगिनी नंदा साळवी यांच्या हवाली केले. त्यांच्या व्यस्त कारभारातही त्यांनी या कथा संग्रहांचे काम मार्गी लावले. आणि त्यानंतर मुंबईला येऊन महिनाभर येथे थांबून उरलेल्या पुस्तकांचे काम मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आणि तो सफल झाला. हे काम करण्यामागे माझे मित्र, कमलाकर राऊत, शिवाजी गावडे आणि नंदाताई साळवी या त्रिकुटामुळे हे मार्गी लागत आहे, हे प्रांजळपणे कबूल करण्याशिवाय पर्याय नाही. शेवटी पांडूरंगाची इच्छा.

खरेतर कोरोनाचा काळ माझ्यासाठी फलदायी ठरला. निवांत वेळ, कमालीची शांतता. यातून अक्षर ब्रह्माची साथ, पांडूरंगाचा वरदहस्त आणि त्यातून लिखाण होत गेले. एकाग्र चित्ताने जेव्हा वावरलो भुतकाळात, वर्तमान काळात, तेव्हा जी सुत्रे समोर आली त्यातूनच कथा बीज सापडली आणि कथा लिहिल्या गेल्या आणि आता त्या या कथा संग्रहात प्रकाशित होत आहेत.

या पुस्तकाच्या प्रिटींग संदर्भात बऱ्याच मित्रांनी विचारणा केली. खरे सांगू आता हे परवडणारे नाही. माझा प्रकाशक ‘कोमल प्रकाशन’ यांनी तुम्हीच प्रिंट करा असे सांगितले. मी वितरण करीन पण हे परवडणारे नाही. म्हणून पूर्वी ठरविल्याप्रमाणे या पुस्तकाचे ‘ई साहित्य’ प्रतिष्ठान या संस्थेमार्फत ई बुक प्रकाशित करावे असे ठरले. या साईटवर प्रचंड वाचक वर्ग मराठी साहित्याचे

वाचन करीत आहेत. म्हणून सध्यातरी प्रिंटीगचा विचार नाही, पण पुढे मागे पाहू.

लंडनचा किनारा या कथा संग्रहात एकूण अकरा कथांचा समावेश आहे. यातील कथा ह्या ग्रामीण तसेच शहरी वातावरणाशी जोडलेल्या आहेत. यात काही सत्य घटनांची बीजे असलेल्या कथा आहेत. आपल्या सभोवतालच्या सामाजिक वातावरणात घडणाऱ्या घटनांचे पडसादही या कथातून दिसतील. शक्यतो लहान १००/१२५ पानांचे कथा संग्रह असावेत असाही मत प्रवाह आहे, म्हणून अगदी बेजोड कथासंग्रह न करण्याचे टाळले.

आज या कथा संग्रहांचा 'इ बूक' करण्याचा इराद्याला आमचे पितृतुल्य पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनीही दुजोरा दर्शविला. आणि ई-साहित्य प्रतिष्ठानचे श्री.सुनील सामंत यांच्या मार्फत हेही काम तडीस जात आहे हे येथे सांगणे जरुरीचे वाटले. भविष्यात याच प्रकाराला उर्जित अवस्था येणार यात वाद नाही. आजचे वातावरण बदलते आहे. आपणही बदलायला हवे. हे ही खरेच नां !

हा लंडनचा किनारा माझ्या कुटुंबियांना अर्पण करीत आहे. माझ्या या लिखाणाच्या वेडाला त्यांची साथ मिळाली म्हणून हे शक्य झाले म्हणून कोमल प्रकाशनचे शेट्टे यांचेही आभार. त्याच्या प्रकाशनाच्या मार्फत हा कथा संग्रह प्रकाशित होत आहे.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ माझे मित्र नरेश ठाकूर यांनी केले आहे. त्यांनाही धन्यवाद व माझ्या भगिनी नंदाताई साळवी यांनी डिटीपीची बाजू संभाळली. शिवाय त्यांचे सहकारी यांचा मी ऋणी आहे.

या पुस्तकाला प्रस्तावना लाभली आहे ती माझे मित्र ज्येष्ठ साहित्यिक डॉ.सुनील सावंत यांची. त्यांनी प्रकृतीच्या अडचणीतही हे काम वेळीच केले, त्यांच्याही ऋणात मी राहू इच्छितो.

शेवटी माझे रसिक, चतुरस्त्र वाचक यांना हा कथा संग्रह आवडेलच अशी आशा करून थांबतो.

**ॲड. यशवंत बाबूराव कदम**
**नमनेश्वर**

# प्रस्तावना

## ''मानवी आयुष्याचा अर्थ शोधणारा कथासंग्रह 'लंडनचा किनारा''

'  **'लंडनचा किनारा'** हा लेखक ॲड. यशवंत कदम यांचा अकरा कथांचा कथासंग्रह मराठी साहित्यक्षेत्रात पदार्पण करीत आहे.

ॲड. यशवंत कदम हे एक उत्तम कवी आहेत. तसेच ते चतुरस्त्र लेखक ही आहेत. त्यांच्या मनावर ग्रामीण जीवनाचा ठसा उमटलेला आहे. ह्याची जाणीव त्यांचा **'लंडनचा किनारा'** कथासंग्रह वाचताना आपल्याला सतत होत राहते.

ॲड. यशवंत कदम यांचा नवीन कथासंग्रह 'लंडनचा किनारा' मी पुर्णपणे वाचला. ह्या अकरा कथा मानवी जीवनाचा व मनाचा वेध घेतात. कथांची कथावस्तू व कलावस्तू व्यापक स्वरुपाची आहे. ह्या कथा सर्व सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाचं शाश्वत चित्रण करताना दिसतात. म्हणूनच त्या सगळ्या कथा आपल्या आजुबाजूला घडतायत, असे वाटत राहते.

ॲड. यशवंत कदम यांचे मूळ गाव कोकणातील चिपळूण तालुक्यातील आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील निसर्गरम्य असे आई भवानीच्या आशीर्वादाने वसलेले त्यांचे 'टेरव' गाव आहे. त्यामुळे त्यांच्या ह्या कथासंग्रहात कोकणातील विविध गावांचे प्रकटीकरण स्वाभाविकपणे व्यक्त झालेले आहे. त्यांच्या ह्या कथांमध्ये वैश्विक जीवनातील अमर प्रेम सतत आपले अढळ स्थान प्रगट करते. एकविसाव्या शतकात पोचलेले मानवाचे जीवन अजूनही माणसांनी निर्माण केलेल्या जात-धर्म व्यवस्थेत अडकले असल्याचे प्रभावी चित्रण त्यांच्या ह्या कथासंग्रहातील 'परिवर्तन' कथेत आढळते.

त्यांनी मानवी जीवनातील विविध घटनांचे अष्टपैलू दर्शन ह्या संग्रहातील अकरा कथांमधून वाचकांस घडविले आहे.

'लंडनचा किनारा' कथेत लग्न म्हणजे प्रारब्धचं असते, ह्याचा अविष्कार वाचकांना होईल.

'डि. एन. ए. कथेत एकविसाव्या शतकाचे आव्हान पेलवणारा माणूस गावाकडे का बदलू शकला नाही. ह्या प्रश्नाची उकल करताना लेखक भावनाप्रधान होताना आपल्याला दिसतो. नियती कळत नकळत पुन्हा आपल्या प्रेमिकांची भेट घडवून आणते, हाच विश्वकर्त्या शक्तिचा संदेश या कथेतून

वाचकांस मिळेल, असे माझे प्रांजळ मत आहे.

'वारस' कथेमध्ये मातृप्रेमाला मुकणाऱ्या सरोगसी बाळाची गोष्ट हृदयस्पर्शी लिहिली आहे. नैसर्गिक बाळ व सरोगसी बाळाची अंतर्मुख करणारी ही कथा आहे.

'अपघात' कथेत स्त्रीच्या पदरी अपघाताने येणारे अमानवी दु:ख लेखकाने मांडले आहे. 'स्त्री' सोबत अनाकलनीय संभोग आजही केला जातो आणि तिच्या मातृत्वाच्या भावनेला आव्हान दिले जाते, त्यावेळी ती खऱ्या अर्थाने हतबल होते व त्या बाळाचे पालनपोषण करते. बाळ मोठे झाल्यावर वडिलांचे नाव विचारते आणि सारे ब्रम्हांड त्या स्त्रीवर कोसळते. त्यावेळी सृजन शक्तीचा मालकच असे प्रश्न सोडवतो, ह्याचे कथानक अतिशय आर्ततेने 'अपघात' कथेत रेखाटले आहे.

ॲड यशवंत कदम कोकणाशी एकरुप झालेले असल्यामुळे त्यांच्या कथेत कोकणातील भात शेती, नाचणी, कणकुट अशी शब्दरचना सहजपणे कथेचा बाज उच्च पातळीवर नेते. कोकणात व मुंबईतही, किंबहुना ह्या जगात अजूनही जातीभेद, उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्यता जीवित असल्याचे वास्तव 'परिवर्तन' कथेत उत्कटपणे अभिव्यक्त केले आहे.

लेखक ॲड यशवंत कदम यांनी स्त्रियांच्या मासिक पाळीबद्दल स्पष्टपणे त्यांच्या 'असा मी काय गुन्हा केला' या कथेत विचार मांडून हे 'निसर्गाचे देणे' असल्याचा महत्वाचा संदेश संपुर्ण जगाला दिलाय.

पहिल्या प्रेमाची नाजूक आठवण मुंबईतील गिरणगावातील चाळीतील जीवनामधून अतिशय संवेदनशील मनाने 'फारकत' या कथेत गुंफले आहे. भूतदयेचा मानवी मनातील हुंदका 'कणव' कथेत अप्रतिमपणे चित्रित केला आहे.

अगदी नुकतेच थैमान घालून गेलेल्या व जगाला धडा शिकवणाऱ्या 'कोरोनाच्या पार्श्वभूमीवर' 'सोशल डिस्टेसींग' ही एक प्रेम कथा लेखकाने समक्षपणे रेखाटून मानवी जीवनाचे अलिखित सत्य वाचकांसमोर मांडले आहे. मानवी जातीची माजोरी मोडीत काढणारा 'कोरोना' मानवावर विजय मिळवू शकतो व स्वत:ला सर्व श्रेष्ठ समजणारा मानव निसर्ग शक्तीपुढे नतमस्तक होऊ शकतो, ह्याचे वर्णन प्रत्येक वाचकाला नक्कीच सुन्न करेल. 'कोरोना'ला

लेखकाने 'तेरावा ग्रह' अशी चपलख उपमा दिली आहे. माणसाचे विवाह बंधनच श्रेष्ठ असल्याचे लेखकाने या कथेत रेखाटले आहे.

उतार वयात म्हणजे वार्धक्यात पुरुषाला खरा आधार स्त्रीचा म्हणजे पतिला पत्नीचाच आधार असतो. त्यांच्या मुलाबाळांचा आधार नाममात्र असतो, हे वैश्विक सत्य 'कर्माचे भोग' कथेत सुंदर कथानकाने लेखकाने मांडले आहे.

'दुरावा' कथेत नशिबात भेट लिहिलेली नसेल, तर तशी भेट घडतच नाही, ही गोष्ट लेकीच्या व वडिलांच्या कथानकातून उलगडून दाखविली आहे.

अशा कथांच्या ह्या वाङ्मयकृतीतून साहित्यप्रेमी वाचकांना लेखक ॲड.यशवंत कदम यांनी प्रणय, वात्सल्य, क्रोध, मत्सर, भय, भावनांच्या अतिरेकीपणाचा दुष्परिणाम, मानवी विकृती, मुंबईतील गिरण गावातील चाळ संस्कृती, विविध मनोव्यापाराचे दर्शन, लैंगिक क्षुधा, स्त्रीला लाभलेले कष्टमय नैसर्गिक देणे, या भावनांचा प्रत्यय दिला आहे. ह्या कथा वाचकाला चिरंतन आनंद देतील व मानवी जीवनाच्या सुंदरतेचा आविष्कार घडवतील, असा मला विश्वास वाटतो.

आयुष्याचा अर्थ शोधणे म्हणजेच स्वत:शी बोलणे. त्याच संवादातून जीवनातील अनेक घटना लेखकाला खुणावतात व त्यातूनच मानवी जीवनाचा गर्भितार्थ शोधणाऱ्या कथा जन्मास येतात. ॲड. यशवंत कदम यांचा **'लंडनचा किनारा'** हा कथासंग्रह त्याची साक्ष देतो, अशी माझी खात्री आहे.

अवती भवती घडणाऱ्या घटनांचा सूक्ष्म तपशील लेखक मनात जपून ठेवतो आणि त्यातूनच **'लंडनचा किनारा'** सारखा सामान्य माणसांच्या मनातील भावना रेखाटणारा कथासंग्रह जन्मास येतो. अकरा विभिन्न हिऱ्यांच्या अंगठीत प्रत्येक कोंदणात बसवलेला एक एक वेगवेगळा हिरा म्हणजेच लेखक ॲड. यशवंत कदम यांची **'लंडनचा किनारा'** कथासंग्रहातील प्रत्येक कथा होय. प्रत्येक वाचकाने हा संग्रह एकदा निश्चितच वाचायला हवा.

**– डॉ.सुनील सावंत**
**ज्येष्ठ साहित्यिक**

## अनुक्रमाणिका


१) लंडनचा किनारा

२) डी.एन.ए.

३) वारस (खेळ भावनांचा)

४) अपघात

५) परिवर्तन

६) असा मी काय गुन्हा केला

७) फारकत

८) कणव

९) सोशल डिस्टंसिंग

१०) कर्माचे भोग

११) दुरावा

# लंडनचा किनारा

दामु सावकराचा हिसका सगळ्या गावाला माहित होता. महाखास्ट माणूस, हट्टी, पाय जमिनीवर नसलेला, पैशाचा माज इतका होता की त्याची झळ खेर्डी गावाला आणि त्याच्या आजूबाजूच्या गावानाही पोहोचली होती. अडला हरी गाढवाचे पाय धरी अशी अवस्था लोकांची झाली होती, जवळपास बँक नव्हती, शेतीला, गाडीला कोण देणार पैसा, दामदुप्पट व्याजाने दामुशेठ कर्ज देई आणि तसाच वसुल करी, तारणाला जमिनी ठेवी आणि ठेवलेल्या वेळात पैसे नाही परत की जमिनी ताब्यात घेई. अर्धा गाव त्याच्या मालकीचा. लोक भिकेला लागले, बऱ्याच जणांनी गाव सोडले, राव गावाचे गावपण हरवले आणि ओसाड गावाचा राजा झाला दामुशेठ. त्याचाही धंदा बसत होता. कर्ज घ्यायला कोणी येईना. पैसा कुजत होता तिजोरीत पण त्याचा उठाव होईना, पण सुधारले तर तो दामु सावकार कसला.

हा झाला धंद्यातला तिनतेराचा लेखा जोखा. पण कुटुंबाचा ? तो तर मोठा किस्सा आहे. सावकाराला सात मुली आणि मध्ये झालेला एक दिवटा – रमेश. दामु शेठच्या स्वभावाची झळ लागली ती सगळ्या मुलींना. आपल्या मर्जीप्रमाणे मुलगे बघून त्यांना दावणीला बांधण्याचा सपाटा त्याने लावला. पूर्वीच्या सरंजाई सारखा. सावकरांच्याच, अनाडी पोरांच्या गळ्यात सहा मुली तो बांधून मोकळा झाला. आपल्या मर्जीप्रमाणे, शाळेत मुले गावच्याच घातली. ७ वीच्या पुढे घरीच, मग लग्न. बस, ह्यांची आवड निवड, इच्छा आकांक्षा यांना चुड लावणाऱ्या या दामु शेठला हिसका दाखवला तो ७ व्या मुलीने. बापाचा, राव बाप निघाली ती.

काळ थोडा बदलत गेला. गावांत हायस्कूल झाले आणि त्या शेंडे फळाने चक्क सत्याग्रहाच केला. रमा तिचे नांव. बाप एक जात ऐकायला तयार नव्हता. आणि प्राथमिक शाळेतली २६ मुले ८ वीत त्या आनंदी हायस्कूलमध्ये दाखल झाली. घरात होती ती रमा. आपल्या सगळ्या मैत्रिणी हायस्कूलमध्ये गेल्या हे समजल्यावर मात्र तिने दामु शेठलाच आवाहन दिले. तो तर तिच्या लग्नाचा घाट घालीत होता. पेढांबे गावच्या दौलतराव सावकराच्या मुलाशी लग्नाचा. पण रमाने साफ नकार दिला. चौदा वर्षाची पोर तशी नासमजच, पण हुशार. हायस्कूल चालू होणार. या बातमीने शहारली. आपण खूप शिकावे, पुढे

कलेक्टर व्हावे या एकाच ध्यासाने तिने स्वत: हायस्कूलमध्ये जाऊन प्रवेश घेतला. दामु शेठला याचा पत्ता नव्हता.

शाळेच्या पहिल्या दिवशीच रमाने काहीतरी बहाणा करून शाळा गाठली. उद्घाटनाचा कार्यक्रम होता. सावकारालाही निमंत्रण होते. तो तर स्टेजवर बसला होता आणि रमा तोंडावर ओढणी घेऊन मुलींच्या घोळक्यात. गावच्या शाळेतील सगळी मुले या हायस्कूलमध्ये होती. शिवाय आजूबाजूच्या गावातीलही आली होती. आठवीचे दोन वर्ग करावे लागले. उद्घाटनाला जिल्ह्याचे कलेक्टर, तालुक्याचे तहसिलदार, गावचे सरपंच आणि गावचे प्रतिष्ठित लोक आले होते. उद्घाटन झाले. फित कापली गेली आणि अगोदर गावातली प्रतिष्ठित मंडळी बोलली – दामु सावकरही तोडक्या मोडक्या भाषेत बोलला व काय कोण जाणे त्याने एक लाख रु. ची देणगी शाळेला जाहीर केली. सगळे उपस्थित लोक चाट पडले. पण टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. कलेक्टर सुर्यवंशी यांनी ''मुलांनो खूप शिका, माझ्या सारखे कलेक्टर व्हा'' असे सांगितले. रमाने तोच धागा पकडून, मुलांच्या वतीने छान भाषण केले आणि ''मी कलेक्टर होऊन दाखवीन'' अशी ग्वाही दिली. ही इथे कशी असा प्रश्न सावकाराला पडला. आणि त्याचाही अहंकार कमी झाला. पण त्याच्या डोक्यातून लग्नाचा विचार काढणे कठीण होते. घरात त्यांचे काही चालेना, सगळ्या मुलींनी रमाला सपोर्ट केला, आईही रमाच्या बाजूनी उभी राहीली.

तत्पूर्वी रमा आपल्या आजोळी पेढांब्याला गेली होती. तिनेच ठरविले आणि ती दौलतरावांना भेटली.

''दादा ! मला खूप शिकायचे आहे. कलेक्टर व्हायचे आहे. पण बाबा ऐकत नाहीत. माझी लग्नाला तयारी नाही. मी खूप सांगितले, पण माझा नाईलाज झाला. तूम्हाला शिकलेली सून हवी असे नाही कां वाटत ? तुमचा मुलगाही शिकतोय, मलाही शिकायचे आहे. मी मनाने तुमची सून व्हायला तयार आहे. पण आता नाही. तुम्ही माझ्या बाबांना समजवाल का ?'' रमा.

तिच्या शब्दांची जादू चालली, असे तिला वाटली एवढ्यात आतून सदाशिव बाहेर आला. रमाला पहाताच तो चपापला. ही इथे कशाला आली ? ती सुंदर तर होतीच, पण धाडशी होती. कचखाऊ नव्हती. असे धाडस करणारी मुलगीच मला हवी. असे सदाशिवने मनाशी ठरविले. नुकतेच त्याने ११ वीतून पास होऊन चिपळूनला डी.बी.जे. कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतले होते. त्याला

शिकून इंजिनियअर व्हायचे होते. सध्यातरी त्याला लग्न नको होते पण रमा मात्र त्याच्या काळजात रुतून बसली होती. हि त्यांची पहिलीच भेट. त्या काळात मुलींना पहायला आई-वडील जात. मुला मुलींची भेट होई ती लग्नाच्या मांडवात.

'मुली ! तुला मी माझी सून म्हणून स्वीकारली आहे. तू म्हणशील तसं होईल. शिवाय सदाशीवलाही इंजिनियर व्हायचे आहे. मी तुझ्या वडिलांना सांगतो, समजावतो. तू निश्चिंत रहा !'' दौलतराव.

रमा आनंदात आपल्या गावात आली. ३/४ दिवसांनी दौलतराव आले. त्यांनी दामु शेठना समजाविले. त्यांचा नाईलाज झाला आणि रमाच्या शिक्षणाचा अडसर मोकळा झाला. आणि त्याच वर्षी १० वी हे एस.एस.सी. चे वर्ष झाले. रमा खूप चांगल्या मार्कांनी पास झाली. आणि तिने ही डी.बी.जे.मध्येच प्रवेश घेतला. तो ११ वी सायन्सला आणि त्यावेळी सदाशीव १२ वी होऊन पुण्याला इंजिनिअरींगला गेला होता. अधेमध्ये रमा आजोळी जाई तेव्हा तो तिला भेटत असे. छान मेतकूट दोघांचे जमले होते. पण आता भेट होणे मुश्कील झाले. तो केव्हातरी रजेत येई आणि तिची भेट होई. काळ पुढे पुढे जात होता. यशावकाश सदाशीव बी.ई. झाला आणि अमेरिकेला गेला नोकरीला. पण आता त्यांची दर रविवारी व्हिडीओ कॉलवर भेट होई.

दामुशेठ चिंतेत होता. त्याची पाणपोई पार आटली होती. कोणीतरी त्याला सांगितले की ज्या ज्या लोकांच्या जमिनी तू घेतल्यास व ज्यांना तू देशोधडीला लावलेस त्याचे शाप तूला नडत आहेत. त्याने विचार केला की त्या सगळ्या जमिनी वर्षानूवर्षे ओसाड होत्या. पार रया गेली होती जमिनीची. फक्त ओसाड जमिनीत गुरे चरत. पूर्वी हिरवीगार दिसणारी शेती आता दिसत नव्हती. दामु शेठनी त्यांना सगळ्यांना बोलावून त्या जमिनी कसायला दिल्या पण मक्ता मात्र ठरवून दिला. लोकही आनंदी झाले आणि दामुशेठ बद्दलची मनातली जळमटे आता हळू हळू दूर होत होती. पण चतुर दामुशेठने व्याज मिळेल या आशेने जमिनी आपल्या नावे करून ७/१२ चे उतारे आपल्याजवळ ठेवले. पुन्हा थोडाफार सावकारीचा धंदा वधारला होता. पूर्वी इतका तेजीत नव्हता, पण अगदीच वाईट नव्हता. मुली लग्न होऊन गेल्या. रमा शिकत होती. रमेशने महा. सरकारी खात्यात कारकून झाला होता. सारे काही सुरळीत चालले होते.

रमाचे बी.एस.सी. चे शेवटचे वर्ष होऊन ती फर्स्ट क्लासमध्ये पास झाली.

आता तिच्या स्वप्नाला पंख फुटले होते. ती मुंबईला आली. महाराष्ट्र शासनाच्या आय.ए.एस./आय.पी.एस. क्लासमध्ये तिने ॲडमिशन घेतले होते. दोन वर्षाचा हा अभ्यास क्रम तिने दिड वर्षात पूर्ण केला. आय.ए.एस.ची परिक्षा झाली. ती ३६ नं. ने सिलेक्ट झाली. मुलाखत वगैरे प्रोसेस पूर्ण करून ती दिड वर्षाच्या ट्रेनिंगसाठी मसुरीला गेली. तिथेही सदाशीवचे फोन येत, खूप गोष्टी होत, आणा-भाका झाल्या पण का कोण जाणे फोन एकाएकी बंद झाले. तिचे फोन सदाशीव उचलेना, तिने दौलतरावांना फोन केला. पण त्यांनीही बोलणे टाळले. खूप दु:खी झाली रमा. ८ दिवसांची रजा घेऊन रमा पुन्हा गावाला आली. तेव्हा सारे चित्र स्पष्ट झाले. सदाशीव कोणा अमेरिकन मॅडमच्या प्रेमात अडकला होता. दु:ख झाले रमाला. सारी पाहिलेली स्वप्ने जमिनीवर आली. पण तिचे दुसरे मन सांगत होते झाले ते ठीक झाले. तो आता परत हिंदुस्थानात येणार नाही. शिवाय रमाची नोकरी हिंदुस्थानभर कोठेही असेल तेव्हा हे लग्न होणे कसे जमणार ? एक तर त्याला येथे यावे लागले असते व तिला नोकरी सोडावी लागणार होती आणि ते तिला शक्य नव्हते. खरे तर बखेडाच निर्माण झाला होता.

ती तशीच देहरादूनला गेली. अजून तिची पोस्टींग व्हायची बाकी होती. आठवड्याभरात यू.पी.एस.सी.कडून ती येणार होती. रमाने तिच्या चॉईसमध्ये महाराष्ट्राची निवड केली होती. तिची दुसरी चॉईस होती इंडियन फॉरेन सर्व्हिस. तिची इच्छा होती की आपण अमेरिकेत जाऊन यु.एस. मधल्या कॉन्सलेट मध्ये जॉईन व्हावे. पण तोही विचार तिने सोडून दिला. यशावकाश रमाची नेमणूक महाराष्ट्रात प्रथम असिस्टंट सेक्रेटरी म्हणून सचिवालयात झाली. आणि ती ऑफर तिने स्वीकारली. तिला मुंबईला सरकारी घर मिळाले. याला आता २ वर्षे होऊन गेली होती. वर्षभरात तिला प्रमोशन मिळून ती कलेक्टर होणार होती. खरे तर तिला मुंबई सोडायची नव्हती. तिची पोस्टींग त्याच ऑफीसमध्ये असि.सेक्रेटरी म्हणून झाली. ती तिने स्वीकारली. आता तिचे वय २७ होते. दामुशेठ खूपच थकले होते.

आणि एवढ्यात कुळ कायदा आला. त्याच्या सगळ्या जमिनी कुळांकडे गेल्या. आता ते काही करु शकत नव्हते. आणि जरी कागदोपत्री ते मालक असले तरी त्याला अर्थ नव्हता. लोकांनी मक्ता देणे बंद केले आणि दामूशेठची सावकारी आटली ती कायमची. त्याच्या सावकारीचा धंद्यावर सरकारने कायदा

करून त्यावरही बंदी आली होती. म्हणजे सावकारीचा बोऱ्या वाजला होता.

आपल्या मुलीचे लग्न आता मोडल्यात जमा होते, तसे दौलतरावांनी कळविले. चौकशीअंती असे समजले. सदाशिवची बायको ही ख्रिश्चन होती. ती तिकडचीच नागरीक. तेव्हा आपल्यालाही ग्रीन कार्ड मिळणार या आशेने त्याने तिच्याशी लग्न केले होते. दामुशेठ, आपल्या मुलीचे लग्न करावे यासाठी तिला समाजावीत होता. हवेतर तू तुझ्या पसंतीच्या मुलाशी लग्न कर. आता तुझे २८ वय चालू आहे. दामुशेठने खूप शोधाशोध केली. पण आपल्या समाजातला शिकलेला मुलगा सापडेना. त्याने शोधा-शोधीचा उद्योग सोडून दिला, शिवाय आता तिला तिच्या स्टेटसचा मुलगा हवा होता. पण त्यांच्या मराठा समाजात ते शक्य नव्हते.

रमा अजून दु:खीच होती. ज्या सदाशिववर आपण जीवापाड प्रेम केले त्याने आपल्याला फसवले. ते स्वार्थी म्हणून तिच्याही मनात त्यांच्याबद्दल तिरस्कार निर्माण झाला होता.

आपल्याकडे एक म्हण आहे जन्म, लग्न आणि मृत्यू आपल्या हातात नसतात. तो नियतीचा खेळ आहे. असा पक्का समज रमाने करून घेतला. आता योग येईल तेव्हा पाहू असा विचार करून तिने उगाच घाई न करण्याचे ठरवले आणि वेट ॲन्ड वॉच असा पवित्रा घेतला लग्नाबाबत.

आणि योग आला. पुन्हा चूल पेटवण्याचा. आजवर थंड झालेले लग्नाचे गांजील जागले. त्याचे असे झाले. चंद्र शेखर नावाचे एक जॉईन्ट कलेक्टर मुंबईला बदली होऊन आले. त्यावेळी रमा चिफ सेक्रेटरी यांची पी.ए. म्हणून कार्यरत होती. रमाकडे त्यांच्या बदलीचे पेपर्स आले तेव्हा तिला समजले हा अजून अविवाहीत आहे. असेल ३५ वर्षाचा, पण देखणा गडी. तो प्रथम आल्यावर त्याने मुंबईचा चार्ज स्वीकारला. आणि आपल्या पोस्टींगची वाट पहात होता. पण चिफ सेक्रेटरी दिल्लीला मुख्य मंत्र्यांबरोबर गेल्याने ती ऑर्डर निघायला वेळ झाला. गेले दोन दिवस तो रमाच्या कॅबीनमध्ये येऊन बसे. ओळख झाली. रमा अविवाहीत आहे हे तिच्या बाहेच्या पार्टीवरून त्याला समजले होते. तिही २८ वर्षाची होती. सुंदर, गोरी, रुबाबदार व्यक्तिमत्व लाभलेली. कामात तरबेज. आणि घंटी वाजली.

रमाचे त्याचे बोलणे झाले. मुंबईला फक्त बी.एम.सी. मध्येच एक जागा खाली होती. तेथे त्याची पोस्टींग करायला सांगितले व चंद्रशेखर याची येथे

पोस्टींग करा, मी आल्यावर रेग्युलर ऑर्डर काढू असा निरोप मिळताच तिने चंद्रशेखर यांनी पोस्टींग केली व त्याच दिवशी ते तेथे जॉईन झाले.

त्यानंतर ३/४ वेळा त्यांचे येणे तिच्याकडे झाले ते नेहमी कामात असत म्हणून रमाच्या केबीनमध्येच बसत. गप्पा होत, लंच होई शिवाय तिच्यात इमारतीत त्यांना ॲकोमोडेशम देण्यात आले होते. तेव्हा संध्याकाळी भेठीगाठी होत असत. एकमेकांच्या स्वभावाची ओळख पटली आणि नकळत मने जुळली. एक दिवस चंद्रशेखरनेच मोबाईलवर मॅसेज पाठवला, ''मिस रमा मला तुमच्याशी बोलायचे आहे, माझ्या मनातल्या विचारांना प्रवाहीत करायचे आहे. तुमची हरकत नसेल तर आज भेटता येईल का ?'' चंद्रशेखर.

रमाला आश्चर्य वाटले. पण का ? कशाबद्दल याला उलगडा होत नव्हता. तिने ही मोबाईलवर होकार कळवला. तो दुसरा शनिवार होता. ते समोरच्या संगम हॉटेलमध्ये गेले. किरकोळ गप्पा झाल्या. मग चंद्रशेखर यानेच तिला त्याच्या लग्नासंबंधीचा विचार बराच वेळ घोळवून एकदाचा सांगितला.

''रमा, माझा लग्नाचा विचार आहे. याबाबत तुमचा काय विचार आहे ?'' चंद्रशेखर.

''करा की लग्न ! मी काय बोलणार ?'' रमा.

''तसे नाही !'' चंद्रशेखर

''मग काय ?'' रमा.

''तुम्ही लग्नाबाबत काय ठरविले आहे ?'' चंद्रशेखर.

''मी अजून याचा विचार केला नाही.'' रमा.

''पण करावा असे वाटते का ?'' चंद्रशेखर

''सध्या नाही. माझे प्रमोशन ड्यू आहे. शिवाय ट्रान्सफर ही होऊ शकते. मला आता जराही घाई नाही.'' रमा

''ठिक आहे ! पण जेव्हा असे वाटेल, तेव्हा मला कळवा, तो वर मी वाट पाहीन.'' चंद्रशेखर.

या बोलण्याने रमा चमकली. म्हणजे यांना माझ्याशी लग्न करावेसे वाटते आहे. मग अशा आड मार्गाने बोलण्याची गरज नव्हती.

मग बराच वेळ दोघे काहीही बोलले नाहीत. संध्याकाळचे साडेसात झाले होते. ''रमा मॅडम, आता वेळ झालीच आहे. तेव्हा डिनर घेऊनच, आपण निघूया!'' चंद्रशेखर.

"चालेल ना !" रमा.

आता मात्र सगळा माहोल बदलला होता. आपला साहेबीपणा विसरून तिचे पायही जमिनीवर आले होते. चंद्रशेखर ही खूप चांगला होता. स्वभावाने हे ही गेले २ महिने ती पहात होती. त्याच्या मनात रमा भरली होती. आवडली होती त्याला रमा. तसा चंद्रशेखरची चॉईसही वाईट नव्हती. तो आंध्रमधला होता पण सुशिक्षीत, घरंदाज होता. असा विचार तिच्या मनाला चाटून गेला. पण आपल्या मनातली सगळीच पत्त्याची पाने ही अजून उघडायला तयार नव्हती. सदाशिवच्या धक्क्यातून आता कुठे ती सावरत होती. लग्नाबाबतचे विचार मनात घोळत नव्हते असे नाही. पण मागच्या दहा-वीस वर्षाच्या विचारांची सावली अजून दूर झाली नव्हती. तेव्हा नवे काही अजून सजविण्यासाठी मन परिपक्व झाले नव्हते. आता फक्त वेट ॲन्ड वॉच एवढाच विचार मनात होता.

मधल्या काळात दामुशेठ, त्याची पत्नी निवर्तले होते. आता घरून तसा अडसर नव्हता. भाऊ रमेश आपल्या कुटुंबियांसमवेत अमरावतीला होता. त्याचा फारसा संपर्क नव्हता. जेव्हा तो सचिवालयात येई तेव्हा भेटून जायचा बस एवढेच. ती आता कोठे सदाशिवच्या धक्क्यातून सावरत असताना हा चंद्रशेखरचा धक्का पचवणे शक्य नव्हते. म्हणून तिने विचार अंधातरीच ठेवला. आता तिला २९ वे लागणार होते. केव्हातरी लग्नाचा विचार करावाच लागणार होता. पण आता घाई नको. हा ही मिस कॉल होईल का ? ही मनात शंका आहे अजून माझ्या. तिने आपली उर्मी चेहऱ्यावर आणित.

"निघू या का ?" रमा

"हो, खूप वेळ झालाय." चंद्रशेखर.

"घरी जाऊन काय करणार आहेस ?" रमा.

"सतार वाजवीत बसेन तासभर. तेवढाच विरंगुळा आहे आता मला. खरं सांगू एकट्याने रहाणे या मुंबापुरीत फार जिकीरीचे आहे मित्र तुटले. नवे ठिकाण, नवे मित्र, आपण फिरस्ते भेटतात. व्हॉट-अप, फेस-बुक वर. पण खरं सांगू राम नसतो त्या भेटण्यात, त्यांचा होत असलेला टाईमपास पण माझा जीव घुसमटत रहातो. काहीतरी नवा चेंज हवा जीवनात. तेच तेच तेच. खरे तर सांगू मी रस्ता शोधतो आहे !" चंद्रशेखर.

"चेंज हवाच, तोच देऊ शकतो आपल्याला जगण्याचा प्राणवायू ? आता निघू या कां ?" रमा.

"हो." चंद्रशेखर.

आणि त्यांनी रस्ता क्रॉस केला. समोरच्या इमारतीतच ते रहायचे.

घरी आल्यावर चंद्रशेखर सितारीचे सूर आळवीत बसला, पण रमाच्या मनातल्या वादळाने भयावह स्वरूप धारण केले होते. झोप लागे ना तिला ही तो एकटेपणा नकोसा झाला होता. मन द्विधा झाली, आपण तेव्हाच चंद्रशेखरला सकारात्मक साथ घ्यायला हवी होती. तो मोठ्या आशेने मला घेऊन गेला होता. पण मी... मीच... काय बोलू. आता चेंडू माझ्या अंगणात आहे. त्याला होकार द्यायचा धाडस मला होईल का ? या विचारांनी ती पार ठेचाळली होती.

तो सोमवार होता. ती ऑफीसला जायला निघाली होती. पण टाऊनच्या ट्रॅफीकमुळे गाडी आली नाही. तेवढ्यात चंद्रशेखर समोर दिसला. त्याला घेऊन जाणारी त्याची गाडी समोर उभी होती.

"गाडी आली नाही कां ?"

"नाही."

"मग मी सोडतो तूला ऑफीसला, चालेल ?" चंद्रशेखर.

"हो ! का नाही !" रमा.

ती निघाली. डायव्हरचा फोन आला. गाडी ब्रेक डाऊन झाली आहे म्हणून. मी नाही येऊ शकत. दुसरी गाडी मागवा मॅडम." ड्रायव्हर.

"ठिक ! मी दुसऱ्या गाडीतून निघाली आहे !" रमा.

सचिवालय येईपर्यंत कोणी कोणाशी बोलले नाही. ती उतरली आणि....

"बाय ! थॅंक्स !" रमा.

आणि ती तिच्या कार्यालयात गेली. चंद्रशेखरने आपली गाडी बी.एम.सीच्या हेड-ऑफीसला घेण्यास सांगितली. या प्रवासात ती काहीतरी बोलेल अशी चंद्राची अपेक्षा होती. पण तसे काहीच घडले नाही.

रमाच्या मनाचे वादळ अजून शमले नव्हते. चीफ सेक्रेटरी आज येणार होते. पण अजून आले नव्हते. तातडीची कामे तिने हातावेगळी केली. तोपर्यंत लंच टाईम झाला होता. पण आज काय खावे असेही तिला वाटेना. आपण चंद्रशेखरला फोन करावा असे राहून राहून वाटत होते. म्हणून तिने फोन केला.

"हॅलो ! चंद्रशेखर !" रमा.

"हो, बोलतोय." चंद्रशेखर.

"मी रमा बोलत आहे. लंच घेतला का ?" रमा.

"नाही आज मुड नाही! शिवाय एक व्हिझीट एच वॉर्ड-बोरीवली ती ही रद्द केली. वाटते सरळ घरी जावे !" चंद्रशेखर

"माझीही तीच अवस्था आहे. एक काम करा. घरी निघताना मला फोन करा. मला गाडीची व्यवस्था नाही. तुमच्याच गाडीतून मी घरी निघेन म्हणते." रमा.

"बरं, जरुर !" चंद्रशेखर.

तिला प्रश्न का पडला, असा विचार करीत बसली. कोण चंद्रा, ना मराठी, ना नात्या-गोत्याचा. त्याच्याकडे कल्चर वेगळे, आपले वेगळे, सणवार वेगळे, शिवाय ते लोक एकदम कर्मठ, चंद्रा जरी होय म्हणाला तरी, त्याचा ब्राम्हण समाज, नातेवाईक स्वीकारतील का आपल्याला ? उद्या आपल्याला मुले होतील... त्यांना मुली सापडतील का ? त्यांच्या समाजात. फक्त स्त्री आणि पुरुष संबंध म्हणजे लग्न नव्हते. म्हणजे आपले जीवन नंतर एकटेपणानेच व्यथीत करावे लागणार. आज आपल्या नोकऱ्या इथे. उद्या भारतभर बदल्या होतील. तो आता सेक्रेटरी होईल, आपण फार फार तर डेप्यूटी कमिशनर. छोट्या सिटीमध्ये एकत्र राहणे मुश्कील होईल, असे नाही. वा आपली त्याच्या गळ्यात बांधलेल्या लोढण्यासारखी अवस्था होईल. सरकारी नोकरीत एकत्र रहाण्याचे सुख नाही. सतत फिरतीवर... कसे जमायचे हे आपल्याला.

पण दुसरे मन सांगी, एकदा हे सतीचे वाण स्वीकारले मग मागे यायचे नाही. 'अनंते ठेवीले तैसेची रहावे' त्याला इलाज नाही. बरे नोकरीच्या बाहेरचा मुलगा मिळेल, पण आपण स्थिर कुठे ? आज इथे, उद्या नागपूरला. काय भरवसा. त्यापेक्षा आपल्या क्षेत्रातला माणूस असेल तर सरकारी धोरणाप्रमाणे दोघेही एकाच ठिकाणी ठेवण्याची तरतूद होती.

आता तिच्या मनाची तयारी पूर्णपणे झाली होती. चंद्रशेखर उत्सूक आहे आणि मीही होकार द्यावा असा मनाशी निर्धार करून ती रात्री झोपली. सकाळी ती उठली ती अगदी फ्रेश होऊन, मनाची पूर्ण तयारी झाली होती. फक्त उच्चार करायचा बाकी होता. आज तिच्या चेहऱ्यावर कमालीचा आनंद झळकत होता. तिचा हसरा चेहरा अधिकच सुंदर दिसत होता. ती सकाळी ऑफीसला जायला दोन-पाच मिनिटे अगोदरच तिच्या इमारतीखाली आली होती. तिच्यासाठी नवी ॲम्बेसिटर गाडी ऑफीसने पाठवली होती. चंद्रशेखरची गाडीही तिच्या गाडीच्या बाजूला उभी होती. एवढ्यात तो आला. तिला पाहून त्याला आनंद

झाला, तो तिच्या चेहऱ्यावरच्या तिने केलेल्या स्मित हास्याने.

"गुड मॉर्निंग!" चंद्रशेखर.

"गुड मॉर्निंग सर!" रमा.

आणि दोघेही आपआपल्या गाडीत बसली. गाड्या निघाल्या. रमाला असे झाले होते की, आज संध्याकाळी दोघांनी भेटायचे. तिने मोबाईलवर त्याला फोन केला.

"आज संध्याकाळी तुम्हाला वेळ आहे का ?" रमा.

"नाही, नाही, का ?" चंद्रशेखर

"आपण संध्याकाळी सहा वाजता सचिवालय जिमखान्यात भेटू या" रमा.

"ओके. डन !" चंद्रशेखर.

चंद्राला वाटत होते. हिने का बोलाविले आपल्याला ! मी तिला पूर्वी ट्रिट दिली म्हणून ? तसे नसावे मग कारण काय ? की दुसरे काय कारण ? काही असो त्याने तिला भेटण्याचा निर्धार केला होता. आज त्याने निळा सुट घातला होता. त्यात त्याचे व्यक्तीमत्व अधिकच खुलून दिसत होते. रमा अगोदरच तेथे पोहोचली होती. एवढ्यात चंद्रशेखर आला. ती उठून उभी राहीली.

"तू बस !" रमा.

येथे आल्यावर आपण एक चूक केली आहे. आपण चंद्रशेखरचा पर्सनल लाईफ बद्दल काहीच जाणून घेतले नाही. त्याचे प्रेमप्रकरण, लग्न इ. आपण होकार देऊन पस्तावायला नको म्हणून तिने सावधानतेने पावले टाकायचे ठरवली हातच राखून आणि या सगळ्या गोष्टींचा आपण प्रथम सोक्षमोक्ष लावायला हवा नाहीतर पुन्हा पस्तावायची वेळ येऊ शकते. हे ती जाणून होती.

"सर ! एक गोष्ट तुम्हाकडून मला क्लिअर करून घ्यायची आहे!" रमा.

"काय ! जे काही मनात असेल ते विचार !" चंद्रशेखर.

"तुमचे प्रेमप्रकरण तुटले वा लग्न झालेले... ब्रेक झाले कां ?" रमा.

"सांगतो ! माझे लग्न ५ वर्षापूर्वी झाले होते." चंद्रशेखर.

"मग ?" रमा.

"सांगतो ! सगळी हकिकत सांगतो. ज्या दिवशी लग्न झाले, त्यावेळी हॉलमध्येच रजिस्ट्रेशनचे पेपर सह्या करून रजिस्ट्रार ऑफीसचे लोक गेले व रजिस्ट्रेशन झाले. त्या रात्री माझी पत्नी, मी... आम्ही घरी आलो. बेडरुम सजवला होता. आम्ही दोघे आत आलो, पण ती पलंगावर बसायला तयार

होईना, मला वाटले पीरिएड आले असतील म्हणून टाळाटाळ करत असेल. मग मी पलंगावर झोपलो. मात्र ती खाली झोपली. मला उशीरा झोप लागली. मी सकाळी ८ वाजता उठलो, पण ती रुममध्ये नव्हतीच, ती बाथरुम वा बंगल्याच्या टेरेस वा किचनमध्ये गेली असेल असे वाटले. पण माझ्या रुम मधली तिची बॅग तिथे नव्हती. मी चक्रावलो. पुरे घर शोधले. घरातली सगळी माणसे जागली. तिला सोडायला आलेले तिचे आई-वडील त्यादिवशी आमच्या बंगल्यात होते. तेही गायब झाले. मला संशय आला ती नक्कीच पळाली असणार, आम्ही पोलिस स्टेशनवर तक्रार केली. पण तेवढ्यात ती सांगलीला पोहोचल्याचे समजले.

दुसऱ्याच दिवशी एका वकीलाचे नोटीस आली आणि सगळा प्रकार उघड झाला. तिने माझ्यावर भयंकर आरोप केले होते. मामला कोर्टात गेला. त्यावेळी माझी पोस्टींग दिल्ली सेक्रेटरीमध्ये डेप्यूटी सेक्रेटरी म्हणून होती. मी सगळे सोर्सेस वापरले. पण ती सापडली नाही. कोर्टात फक्त तिचे वकीलच.

या सगळ्यातून निपटताना ३ वर्षे गेली. मला खूप मानसिक ताप झाला. नंतरचे सहा महिने मी डिप्रेशनमध्ये होतो. मेडीकल लिव्ह वर होतो. आता कोठे मी सावरलो आहे. लग्न या प्रकारापासून मी दूर पळत होतो. पण तुमची भेट झाली आणि आता या विचारांनी उचल खाल्ली. यात एक अक्षरही खोटे नाही. कोर्टाने मला निर्दोष सोडले. मी वकीलालाच कोर्टात खेचल्यावर सारा बनाव उघड झाला. तिने दुसरे लग्न केले होते. पण आमचे दागिने व मौल्यवान ऐवज कोर्टाने आम्हाला मिळवून दिले.

मी हे सारे तुम्हाला सांगणार होतो. पण योग्य वेळ आली नव्हती हेच खरे. दुसरी गोष्ट मला तुम्हाला फसवायचे नव्हते.

"सॉरी. पण मला आता लग्न करावेसे वाटत नाही. आय ॲम सॉरी!" रमा.

या सगळ्या गडबडीत तिनेच हॉटेलचे बील भरले आणि चंद्रशेखर उठण्यापूर्वीच निघून गेली. तो बाहेर आला पण तोवर तिची गाडी सिग्नल पार करून गेली होती. तो परत हॉटेलमध्ये आला. न पिणारा ... त्याने खूप दारु ढोसली. अगदी तोल जाईपर्यंत. त्याच्या शॉफरने त्याला घरी सोडले.

रमा घरी आली ती रडवेल्या चेहऱ्याने. तरी तिने आपला रडवेला चेहरा झाकून घेता होता. त्याच सकाळी ती सेक्रेटरीशी फोनवर बोलली आणि ऑफीसला न येण्याचे सांगून आपली बदली रत्नागिरीची कलेक्टर करावी म्हणून

तिने करून घेतली. दोनच दिवसापूर्वी तेथे रुजू झालेल्या शरद पवार यांची पोस्टींग तिच्या जागेवर करून घेतली होती. ती दुसऱ्या दिवशीच तेथे रुजू झाली. चार्ज घेण्याचे सारे सोपस्कर केले आणि दुपारी गणपती पुळ्याला दर्शनासाठी आली. खूप वेळ ती मंदिरात बसली होती. यातून स्वतःची सुटका झाल्याबद्दल. तो शुक्रवार होता. उद्या परवा शनिवार-रविवार असल्याने रजा होती. तिने रत्नागिरीत गर्व्हनमेंट रेस्ट हाऊसमध्ये एक रात्र काढली आणि डॉ.शिंदे या त्यांच्या फॅमिली फ्रेंडला भेटली. त्यांनाही ती आल्याचा आनंद झाला. त्यांच्या मदतीने तीने एक छोटासा बंगला विकत घेतला. टुमदार ७०० स्के.फूटाचा, तेथून ऑफीस जवळच होते. सोमवारी सकाळी ती ऑफीसला रुजू झाली.

लग्नाच्या बाबतीत आपल्याला अशा लपंडावाला का सामोरे जावे लागते आहे. हे तिला समजेना. आपली सगळी हकिकत तिने डॉ.शिंदे यांना सांगितली. त्यांनी तिला धीर दिला. ते म्हणाले...

''बाळ. अशा घटना घडतातच, या वाटेवर लग्नाच्या , खचून जायचे नाही. पुन्हा उभे रहायचे. मार्ग सापडतो.'' महिनाभरानंतर तिचे जीवन अगदी सुरळीत झाले होते. काम खूप, पण हुशार रमाने पूर्ण ऑफीसला शिस्त लावली. भ्रष्ट लोकांच्या बदल्या केल्या. दोन लोकांना पैसे खाताना सापडल्याने सस्पेंडही केले. तिच्या कामाने आणि वचक्याने जिल्ह्यातल्या सहा तालुक्यातील तहसिलदारामध्ये दहशत बसली. तिने जिल्ह्यातल्या सर्व तालुक्यातील शाळा, रस्ते, व इतर गोष्टींचा अभ्यास करून कडक सर्क्युलर काढले. पालकमंत्री आमदार यांच्यावरही तिचा वचक बदला. टक्केवारीच्या राजकारणाला खिळ बसली. प्रत्येक महिन्यात दोन तालुक्यांना ती विझीट करी, कामाची पहाणी करी, लोक दरबार भरवीत असे. त्यामुळे लोकांची तुंबलेली कामे मार्गी लागली.

सहा महिन्यातच तिची ख्याती सर्वत्र पसरली. लोकप्रिय झाली ती. लोकही खूश झाले. अगदी तलाठ्यापासून तहसीलदार ही तिला घाबरून राहू लागले. सगळी गैर कामे बंद झाली.

देवरुखमध्ये आठल्ये या शिक्षण संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा कार्यक्रम त्या संस्थेने आखला होता. त्या कार्यक्रमाला तिने प्रमुख पाहुणे म्हणून यावे असे संचालक मंडळाने ठरविले होते. व त्याचे निमंत्रण देण्यासाठी त्या कॉलेजच्या संस्थापकाचे नातू अजॉय आठले हे निमंत्रण देण्यासाठी गेले. अजॉय

रत्नागिरीमधल्या एका कंपनीचे सी.ई.ओ. होते. त्या कंपनीचे नाव होते जे.के. फाईल्स. अजॉय हा एम.एस.इंजिनिअर करून यू.एस.मधून आला होता. तेथेच त्याने एम.बी.ए. केले होते. आपण आपल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या देशातील उद्योग–धंद्याकरिता करावा त्याचा मानस होता. म्हणून त्याने हिंदूस्तान गाठले.

सकाळी अकरा वाजता त्यांची मर्सीडीज ऑफीससमोर आली. तो उतरला व पूर्वी अपॉन्टमेंट ठरल्याप्रमाणे रमाला भेटला. रमा बद्दल त्याने खूप ऐकले होते. बैठकीला १० मि. ची वेळ होती. अजॉय याने पाचच मिनिटात संस्थेब्द्दल सांगून त्याना एक पत्र दिले व विनंती केली अत्यंत नम्रपणे, की आपण या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून यावे. अजॉय येण्यापूर्वी तिने डॉ.शिंदे यांना या संस्थेबद्दल विचारले. तेव्हा समजले तेही या कॉलेजमध्ये शिकले होते. संस्था उत्तम काम करत आहे. जे.के. फाईल्स कंपनी आणि अजॉय याची ही ख्याती शिंदेपर्यंत आली होती. कारण ते या कंपनीचे मुख्य शेअर होल्डर होते. रमाने त्यांनाही सोबत यायची विनंती केली. त्यांनी होकार दर्शविला. अजॉयने आपली मर्सीडीज त्यांना आणायला पाठविली.

कार्यक्रमाच्या दिवशी ती दोघे वेळे आधी एक तास पोहोचले. अजॉयच्या बंगल्यात त्यांची थांबण्याची व फ्रेश होण्याची व्यवस्था केली होती. अजॉयने त्यांचे स्वागत केले. अजॉयसोबत त्याची आई व काकीही आल्या होत्या. आणि डॉ.शिंदे त्यांना ओळखत होते. तेव्हा परकेपणा केव्हाच दूर झाला होता. रमालाही तो बंगला, बंगल्यातले अजॉयचे कुटुंबीय आवडले. अर्धा तास केव्हाच संपला. मग अजॉय त्यांना घेऊन कार्यक्रमाच्या ठिकाणी आला. खूप गर्दी झाली विद्यार्थ्यांची, पालकांची आणि माजी विद्यार्थ्यांची.

शिक्षणाच्या मुलभूत हक्काबद्दल रमा छान बोलली. तिने या संस्थेसाठी पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. स्टेजवर रमा, डा.शिंदे, डॉ.सुरेश जोशी आणि अजॉयय होते. दृष्ट लागावी असा हा सोहळा झाला. मग कार्यक्रम संपल्यावर अजॉयने त्यांना आपल्या बंगल्यात लंच घेण्याची विनंती केली. सर्वांनी लंच केला. अजॉयच्या आईने स्वत: सर्वांची आस्तेवाईकपणे चौकशी केली व रमा आणि शिंदे रत्नागिरीला आले.

अजॉयच्या आईने अजॉयला लग्नाबाबत विचारले... त्यालाही रमा आवडली होती. या अगोदर निमंत्रणाच्या निमित्ताने दोन वेळा आणि कार्यक्रमात त्याने आईला होकार कळवला होता. आईने डॉ.शिंदेना फोन करून अजॉयचा

होकार असल्याचे कळवले. शिंदे अजॉयला लहानपणापासून ओळखत होते. त्याच्या प्रगतीचा आलेख पहात होते. शिवाय त्याच्या कुटूंबाशी त्यांचा गेल्या ५० वर्षाचा परिचय होताच. चक्रे भराभर फिरायला लागली.

पुढच्याच आठवड्यात जे.के.फाईल्सची ए.जी.एम. होती. डॉ.शिंदे स्वत: रमाला घेऊन त्या सभेला आले होते. अजॉयने अनेक नव्या योजना राबविण्याचा संकल्प सोडला. त्यात सामाजिक योजनांसाठी दहा टक्के कंपनीचा प्रॉफीट देण्याचे ठरले. काय काय उपक्रम या पैशातून करावे याचे सुंदर विवेचन केले. ज्या रत्नागिरीत ही कंपनी आहे, प्रथम तिच्या अडचणी समजावून घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याचे घोषीत केले. प्रथम रत्नागिरी आणि सभोवतालची गांवे यांच्या पाण्याच्या प्रश्नाची तड लावली. यासाठी शासनाने आम्हाला त्याचे विचार सांगावेत व प्रोजेक्ट फायनली पूरा करावा असे जाहीर केले.

प्रथम जेव्हा अजॉय उभा राहिला त्याने सर्व शेअर होल्डर तसेच जिल्हाधिकारी यांचे स्वागत केले, आभार मानले आणि सभेला सुरुवात केली. मृत शेअर होल्डरना श्रद्धांजली वाहून मग रितसर कामाला सुरुवात झाली. सभा अत्यंत शांत वातावरणात संपली. मग डिनर झाले. त्यावेळी अजॉयने त्याच्या कंपनीचा रिपोर्ट व भविष्यातील योजनांचा आराखडा रमा यांना दिला. याच सभेत २०% डिव्हीडंट जाहिर केला गेला. अजून दोन असेच कारखाने रत्नागिरीच्या एम.आय.डी.सी. मध्ये काढण्याचे ठरले. शासनाने याबाबत सहकार्य करावे हे सांगायला अजॉय विसरला नाही. त्यामुळे त्या परिसरातील २०,००० कामगारांना काम मिळणार होते.

आठवडाभरानेच अजॉयच्या आईने डॉ.शिंदे यांनी रमाला जेवणाला बोलावले आणि हा विषय छेडला. तिने तात्काळ त्याला होकार दिला. असा उच्च शिक्षीत, सालस, राजबिंडा, कर्तबगार नवरा तिला अपेक्षित होता. आणि तिने तात्काळ होकार दर्शविला. त्या संध्याकाळी डॉ.शिंदेनी अजॉयच्या आईला निरोप पोहोचवला. तो दिवस शनिवार होता. याबाबत आपण उद्याच भेटू असे त्यांनी सांगितले. तसे रमालाही कळविले. आणि भेटी झाल्या. आठवडाभरात साखरपुडा आणि त्यानंतर लगेच लग्नाची तारीख ठरली.

रमाला अजॉय खूप आवडला होता. तिचे पाय जमिनीवर ठरत नव्हते. या लग्नाचे यजमानपद डॉ.शिंदेना देऊन दोन्ही कुटूंबियांनी त्यांना उपकृत केले. वातावरण आनंदी होते.

साखरपुडा डॉ.शिंदेच्या बंगल्यात पार पडला आणि लग्न जे.के. फाईल्सच्या लॉनवर घेण्याचे ठरले. मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पाडला.

कंपनीच्या कामासाठी अजॉयला लंडनला जायचे होते. त्या तारखाही अचानक ठरल्या, अजॉयने रमाला सांगितले, लंडनला त्याचा मुक्काम एक आठवड्याचा आहे. आपण हनिमूनलाही लंडनलाच जाऊ. रमाला परदेशी जाण्यासाठीची परवानगी चिफ सेक्रेटरीनी दिली आणि ते दोघे लंडनला रवाना झाले.

रमा खूप आनंदात होती. तिच्या पसंतीचा नवरा मिळाला आणि लग्नाचे तारु लंडनच्या किनाऱ्याला लागले.

०-०-०-०

# डि.एन.ए.

दोन वर्षे चालू असलेल्या प्रेम प्रकरणाला आज फुलस्टॉप मिळाला. टेरव गावात ती दोघे राहात होती. तन्वी दुसऱ्या वाडीत तर राजू निमेगावांत. शाळेत असताना पासून त्यांचे प्रेमप्रकरण अख्या गावाला माहित होते. ते दोघेही वेगवेगळ्या जातीचे. अठरा पगड जातीचा गाव. मुले शाळेत हायस्कूलला जात, तेथेच या कुछ कुछ ला सुरुवात झाली. तेव्हा ती दोघे नववीच्या वर्गात होती. दहावी झाली ती दोघे. अजून तशी लहानच होती ती दोघे. पण प्रेमाची ठिणगी पडली आणि गुटरगु सुरू झाले. त्याला दोन वर्षे होऊन गेली. दोघेही आता वयात आले होते, तिची अठरा पुरी झाली होती पण त्याचे एकवीस झाले नव्हते, हीच अडचण होती, त्यांनी पळून जायचा विचार केला. पण वयाने घोळ घातला. आणि हे प्रकरण असेच चालू राहिले. भेटी-गाठी आणि मिठीपर्यंत हे प्रकरण चालू होते.

राजूने खेर्डीला वडापावचा धंदा चालू केला. त्याच्या हातालाही चव छान, दिवसाला चहा-वडापावावर यायचा गल्ला ७/८ हजार. त्याने एक बाईक घेतली. आणि छान चालले होते. राजून तन्वीच्या बापालाही गळाला लावले होते. वडे तिच्या घरी आणून देणे सुरू झाले आणि राजूचा वावर तिच्या घरी सुरू झाला. राजरोसपणे. आजूबाजूच्या लोकांना हे प्रकरण चालू आहे याची इतंभूत माहिती होती. तेव्हा अडसर आला नाही. तन्वीच्या घरचेही राजूवर फिदा होते. अजून त्यांच्या वयाची शिंगे फुटली नव्हती. तोवर सारे कसे अगदी सुरक्षित चालू होते.

ती दोघे एकाच जातीची असती तर अडचण नव्हती, पण वेगवेगळ्या जातीच्या मुलांची लग्ने अजून समाजाने स्वीकारली नव्हती आणि तिच गोष्ट अडचणीची ठरली. हे बापाला आणि समाजालाही मान्य नव्हते, सोनार स्वतः श्रेष्ठ आणि पुढारलेले मानीत, जरी धंदा शेतीचा करीत होते तरी. आणि कुणबी समाज गावंढळ, अशिक्षित. तन्वी गोरीपान, शिकलेली. तिला स्थळे येऊ लागली. लांबची. बापाला तिला जवळ ठेवायची नव्हती. लवकरात लवकर पिवळी करायची होती. नजरेआड राजूच्या. आणि अनेक स्थळांनी होकार कळवला पण तन्वीनेच हे न ते कारण सांगून नन्नाचा पाढा लावला. स्थळे फिसकटत गेली. पण सातारच्या एका स्थळाचा होकार आला. बाप पिसाटला

होता. राजूचे घरी येणे जाणे बंद झाले. तोही नाराज झाला. आपले गेली चार वर्षे चालू असलेले प्रेम प्रकरण संपले याचे त्याला दुःख झाले. पण सातारच्या मुलाशी लग्नाला तन्वी तयार नव्हती. तिला राजूपासून दूर जायचे नव्हते. आणि राजूलाही तिला गमवायचे नव्हते. मात्र मोबाईलवर दोघांचे बोलणे होई चोरून. तो मोबाईल तन्वीने लपवून ठेवला होता. कोणाची नजर त्यावर पडणार नाही अशा जागी. तन्वीचा बाप मात्र लग्नाच्या तयारीला लागला. तन्वी अस्वस्थ होती आणि एक दिवस दुपारी घरातून सटकली. गावच्या सीमेवर राजू थांबला होता. त्याने तिला खेर्डीतील गेस्ट हाऊसवर नेले. ५/६ तास ते तेथे होते. आताही ती आपल्या हातून सटकणार. याच विचाराने राजूने ठरविले. आजवर आपण दूर राहिलो पण तिचा गैर फायदा घेतला नाही. दोघेही तरूण आणि एकमेकांच्या मिठीत पहिल्यांदाच एकरूप झाले. ते सुख काय असते ते दोघांनीही मनमुराद अनुभवले. दोन जीव शांत झाले. दोघांचेही समाधान झाले. आता येणाऱ्या सगळ्या परिणामांची तयारी मनात झाली.

हि गोष्ट तन्वीच्या बापाला समजली. गावात चुघली करणारे थोडे कां ! गावात येताना त्यांना कोणीतरी पाहिले आणि बाप तापला. त्याने राजूला घरी येऊन त्याला बदड बदड बदडला. फक्त जीवंत ठेवला एवढेच. चार दिवस तो घरातूम बाहेर पडला नाही आणि तन्वीचीही तिच गत केली. ती लग्नाला तयार झाली.

आठवडाभरात बार उडाला. राजू अजून उठण्याच्या अवस्थेत नव्हता. खेर्डीचा वड्याचा धंदा १५ दिवस बंद होता. राजूने बँकेतून व इतर मित्रांकडून पैसा उचलला. देणेकरी खेपा मारायला लागले. खूप पैसा राजूने तन्वीवर उधळला होता, पण परिणाम काय ? तरी लग्न करून गेली पार लांब सातारला... नजरेच्या पल्याड. राजूची नाराजी दिवसें दिवस वाढत गेली. तन्वीवर त्याचे सच्चे प्रेम होते. ती सारखी नजरेसमोर येई. रात्री रात्री त्याने जागून काढल्या. पण आता आळस झटकायला हवा. हे त्याने जाणले आणि धंदा सुरू झाला. पण तेवढ्यात दुसऱ्या एका माणसाने वडापाव-चहाचा धंदा सुरू केला. त्याचा धंदा चालत होता... पण राजूला गळती लागली. पण हजाराचा गल्ला दिड हजारांवर आला. पण लोकांना राजूच्या वडा-पावची सवय लागली होती. धंदा दोन महिन्यात वधारला... पण त्या दोन महिन्याच्या काळात राजू दारूच्या बाटलीत बुडाला. दररोज तो तराट् होऊन घरी येई. घरात आई-बाप वृद्ध... कोण काय

बोलणार ! राजूचे व्यसन वाढतच गेले. तन्वीच्या ओढीने, पैसा येत होता. राजूला एका मुसलमान चाचाने जुगाराचा नाद लावला. पैसा असेल तेव्हा धमाल, नसेल तेव्हा उधारी... आणि राजू पूर्णपणे कर्जाच्या ओझ्याखाली डूबला.

देणेकरांचा ससेमिरा चुकवायच्यासाठी राजू अनेक तरकिबी केल्या. काय सांगू तुम्हाला. त्याने खेर्डी सोडली. पण देणेकरी घरापर्यंत पोहोचले. आई-बाप बिचारे परेशान होते. राजूने गावात नवा फंडा सुरू केला. याची गाय घे त्याला विक आणि ढापायचा पैसे मध्येच. बैल घ्यायचे विकायचे, मध्ये कमिशन अव्वाच्या सव्वा. असा हात मारायला सुरुवात केली त्याने. देणेकरी वाढले. दारु पिण्याचे प्रमाणही हाताबाहेर जाऊ लागले. तन्वीच्या बापाला हे पाहून दु:ख झाले नाही तर नवल. पण एका तरुण जीवाच्या वाताहातीला आपण जबाबदार झालो हे त्याला समजत होते पण हातातून बाण निसटला होता. तिकडे महिनाभर तन्वी वेगळ्याच आजाराने अस्वस्थ होती. कसल्याशा नव्या भावनेने तिची झोप उडवली होती. मन फुलारले होते. चेहऱ्यावरची लाली अधिकच वाढली होती.

ती मागची खेर्डीतल्या गेस्ट हाऊसवरची घटनेने हा घोळ केला आहे ते तन्वीला जाणवत होते. कारण त्या महिन्याभरात एक-दोनदाच नवऱ्याशी तिचा संबंध आला होता. तो एस.टी. मध्ये ड्रायव्हर होता कोल्हापूरला. एखादा दिवस थांबे आणि पुन्हा जाई. आताशा त्याला जवळ करु नये असेही तिच्या मनात येई. तो खुशीचा व्यवहार नव्हताच... आणि तिची पाळी चुकली. आपल्यात वाढणारा जीव राजूचाच आहे. आपल्या नवऱ्याचा नाही. हे ती समजून चुकली होती. पण लग्नानंतर सारी सारवा सारव झाली होती. आणि नवऱ्याच्या गळ्यात ती भानगड अडकवून मोकळी झाली होती. त्यानंतर सात महिन्यांनी ती बाळंतपणाला आली पोटात वाढणारे राजूचे मूल घेऊन.

गावात आल्यावर तशी ती बाहेर पडत नव्हती. पण एकदा ती राजूच्या नजरेला पडली त्या अवस्थेत. सातव्या महिन्यात आठ महिन्यांचे पोट दिसे. चिपळूणच्या अपरांत हॉस्पिटलमध्ये तिचे नाव घातले आणि डॉक्टरांनी तिला तारीख दिली. जवळची म्हणजे, सातव्या महिन्यात ही बाळंत होणार हे नक्की झाले. तन्वीने हे जाणले. पण ती नववाच महिन्याची वेळ होती. पण तेरी भी चूप आणि मेरी भी चूप.

एकदाची तन्वी बाळंत झाली. मुलगी झाली सुंदर, राजूचा चेहरा घेऊन

आणि रंग तन्वीचा... गोरापान, निटस. हि बातमी राजूला समजली. त्याला आनंद झाला... ती माझीच मुलगी असणार ! आणि तन्वीही हे रहस्य जाणून होती. तिने त्या मुलीचे नाव 'राजलक्ष्मी' असे ठेवले. जे राजूला अत्यंत प्रिय होते. जे लग्न झाल्यावर आपण तन्वीचे ठेऊ हे त्याने ठरवून टाकले होते.

आता राजू त्रस्त झाला होता. बारा भानगडी निस्तरता. त्याने ठरविले आपण गाव सोडायचे आणि दूर सगळ्यांच्या म्हणजे देणेकरांच्या ससेमिऱ्यातून सुटका होण्यासाठी, त्यानेही सातारला जायचे ठरविले. खेर्डीत धंदा करताना त्याने अनेक माणसे जोडली होती. तिथले दोन मानी आमदार त्याच्या वडापावच्या प्रेमात होते. आता पुन्हा हा धंदा करायचा नाही. कारण त्याची गाडी म्युनिसीपालटीने जप्त केली. आता पुन्हा धंदा सुरू करणे कठीण, तेव्हा काहीतरी नवा व्यवसाय व नोकरी धरावी म्हणून राजूने मा.आमदार यांची चिठी घेऊन तो सातारच्या यशवंतराव चव्हाणांच्या कॉलेजमध्ये आला. आणि त्या चिठ्ठीमुले त्याला त्या कॉलेजमध्ये शिपायाची नोकरी लागली. आताशा राजूचे पिणेही बंद झाले होते. सारे आयुष्य मार्गी लागले होते...

मधल्या काळात राजूने लग्न करायचे ठरविले. एक साधी जवळच्या गावातली पुण्याच्या मुलीशी त्याचे गावातच लग्न झाले. पण अजून मुले झाली नव्हती. एक भाड्याचे घर घेऊम तो साताऱ्यातच स्थायिक झाला होता. आता त्याला १६-१७ वर्षे झाली होती. आयुष्य मार्गी लागले होते. पण तो तन्वीला मात्र विसरू शकला नाही. तिच्या आठवणीशिवाय त्याचा एकही दिवस जात नव्हता. तिच एक गोष्ट त्याच्या आयुष्याला आनंदाचा स्पर्श करून प्रसन्नता देत होती. उचंबळून येई मन तन्वीच्या आठवणीने जरी १७-१८ वर्षे मध्ये गेली. नाही विसरू शकला तो. उलट आता त्या आठवणी, मधला क्षण अधिकच गहिरे होत होते आणि त्यात राजू हरवून जाई.

मे महिन्याची सुट्टी होती. राजू आपल्या पत्नीला घेऊन गावाला आला होता. त्याचे आई-वडिल आता खूपच वयस्कर झाले होते. त्यांना अनेक छोट्या मोठ्या आजारांनी गाठले होते, ते एकमेकांच्या आधाराने दिवस कंठीत होते. शिवाय त्यांचे घरही आता जुने झाले होते. त्याची डागडूजी त्याला करून घ्यायची होती. ते सारे काम आटपून तो सातारला परत आला खरा. पण एका गोष्टीने त्याला घेरले होते, ते म्हणजे त्याने गावातल्या मार्टमध्ये तन्वीच्या मुलीला पाहिले. तो एकदम सावध झाला. त्याचा चेहरा घेतलेली ही मुलगी कोण?

याची चौकशी केली तेव्हा समजले ही तन्वीची मुलगी. बस् त्याच्या काळजाचा ठोका चुकला. ती घरी निघाली आणि राजूही तिच्या मागे निघाला. ती तिच्या आजीच्या घराकडे वळली. त्या वळणावर राजू क्षणभर थांबला आणि आपल्या घराकडे गेला. पण त्यावेळी तिची छबी आपल्या डोळ्यात कधीच साकार केली होती. त्याचे हृदय उचंबळून आले... बापाच्या मायेचा पाझर फुटून. तन्वी आणि तिची मुलगी 'राजलक्ष्मी' दिसायला सारख्याच होत्या. त्या घटनेनंतर राजू पुन्हा तन्वीपर्यंत पोहोचला कारण जुन्या आठवणींना पुन्हा जाग आली होती. त्यानंतर २/३ दिवस तो गावात होता. कधी नव्हे तो गावात उगाच चक्कर मारायचा. पण तन्वी वा राजलक्ष्मी नजरेत पडली नाही. हिच अस्वस्थता राजूला सतावीत होती. सातारला आला तरी तो अस्वस्थच होता.

राजू अकरावी झालेला होता. त्या कॉलेजचा पसारा वाढला. अनेक शाखा त्या संस्थेने काढल्या. साताऱ्यातले ते नामचीन कॉलेज, एकमेव आणि अद्वितीय, असे होते. राजूचे आजवरचे काम पाहून, हुशारी, शिस्त आणि प्रामाणिकपणामुळे राजूला त्यांनी कारकुनाची नोकरी दिली. हि बातमी त्याला कॉलेजमध्ये आपल्यावर समजली. तो खुश झाला. आपण आपल्या मुलीला पाहिले आणि तिच्या पायगुणाने मला कारकुनाची नोकरी मिळाली असा अंतरमनाने त्याला कौल दिला होता. आतातर त्याचे कॉलेजमधले स्टेटस वाढले होते. पगारही चांगला वाढला होता.

जून महिना सुरू झाला. एसएससीचा निकाल लागला. आणि कॉलेजात ॲडमिशन सुरू झाले. राजूची नेमणूक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कॉलेजच्या कॉन्फरन्स रुममध्ये झाली. आजवरचा राजूचा अनुभव त्याच्या कामी आला आणि विद्यार्थ्यांना तो मार्गदर्शन करीत होता. त्यांनी कोणता कोर्स घ्यावा. त्याचे भविष्यातले फायदे इ. बघत. राजूला कॉलेजमधील शैक्षणिक शाखेची माहिती असल्याने योग्य शाखेकडे विद्यार्थ्यांना तो पाठवी. सातारा म्हणजे मुंबई नव्हते. ॲडमिशनची वानवा नव्हती. त्यामुळे तशी गरज नव्हती. विद्यार्थ्यांनी हॉल भरला होता. एक एक करून विद्यार्थी येत व आपले मार्कशीट त्याला दाखवित त्याप्रमाणे राजू त्यांना मार्गदर्शन करी. पहिल्या दिवशीच दुपारी लंच नंतरच्या दुसऱ्या सत्रात एक मुलगी राजू समोर येऊन बसली. राजूने तिचे मार्कशीट पाहिले. ८५% मार्क होते.

''बाळ तुला कोणत्या शाखेला ॲडमिशन हवे !'' राजू.

''सायन्सला सर ! मला डॉक्टर व्हायचे आहे. म्हणून मी ठरवूनच ठेवले आहे सर ! राजलक्ष्मी.

राजू चमकला. आवाज ओळखीचा वाटला त्या गावात त्या मुलीचा. तिच्या मैत्रिणीं जवळ बोलताना ऐकलेला.

''तुझे नाव ?''

''राजलक्ष्मी सर !''

राजूने तिच्याकडे पाहिले, त्याला तन्वीची आठवण झाली आणि त्याच्या डोळ्यातून खळकन अश्रू ओघळले. त्याने डोळे बंद केले आणि थोडावेळ हरवला तो तन्वीच्या आठवणीत. त्याच्या हृदयात तिला पाहिल्यावर पान्हा फुटला!

''तू एकटीच आलीस ? कि सोबत कोणी आणखी आहे !'' राजू.

''नाही ! मी एकटीच आली आले आहे.'' राजलक्ष्मी.

''फॉर्म त्याने वाचला. त्यात आईच्या नावाचा उल्लेख होता.... तन्वी बाळशेट साटविलकर.

बस् हीच तन्वीची म्हणजे माझी मुलगी ! खात्री पटली होती... आणि दुसऱ्याच क्षणी त्याने राजलक्ष्मीला ऑफीसमध्ये नेऊन ॲडमिशनचे सर्व सोपस्कर केले. तो पुन्हा हॉलमध्ये आला.

''मुलांनो, उद्या तुम्ही या. पण तुमचे सगळे फॉर्म आता सबमिट करा. आपण ॲडमिशनचे काम उद्या करू !'' राजू.

असे म्हणून तो पुन्हा राजलक्ष्मीकडे वळला.

''बाळ ! तू उद्यापासून कॉलेजला यायचं ! काही अडचण असल्यास मला भेटा. उद्या तुझे आय-कार्ड तयार असेल. तूला कसलीही गरज पडली तर मला भेटायचे, विसरू नको.'' राजू.

''काका, तुम्ही मला 'बाळ' का म्हणालात ?'' राजलक्ष्मी.

''कारण तू माझ्या मुलीसारखी आहेस. मला दोन मुलगे आहेत पण मुलगी नाही. म्हणून मी तुला बाळ म्हटले. तू मला मुलीसारखीच आहेस !'' राजू.

राजलक्ष्मीचा चूणचूणीत पणा त्याला खूप आवडला. तिच्या आईसारखा-तन्वीसारखा हे रहस्य त्यानेच ओळखले होते. आणि राहून राहून तो सद्‌गदीत होत होता.

दुसऱ्या दिवशी राजूने आपली वर्णी वेगळ्या काऊंटरवर लावून घेतली.

आय-कार्ड सेक्शनला तो सकाळीच कॉलेजमध्ये आला. आणि राजलक्ष्मीचे आय-कार्ड शोधून तयार ठेवले. आणि तिची वाट पहात राहिला.

ती आली. काऊंटरवर लाईन होती. पण तिला पहाताच राजूने राजलक्ष्मीला पुढे बोलविले आणि तिचे आय-कार्ड हातात दिले. काल राजलक्ष्मीने राजूला भेटल्यावर त्याच्या चेहऱ्यावरचे भाव वाचताना तिला वेगळीच जाणीव झाली, आपुलकीचा, प्रेमाचा, मायेचा स्पर्श होता. राजूच्या वागण्यात हे राजलक्ष्मीलाही जाणवले. कॉलेजचा पहिला दिवस संपला.

राजलक्ष्मी घरी आली अगदी आनंदात. आपल्या कॉलेजमध्ये आपले कोणीतरी आहे. काळजी घेणारे, मी एकटी नाही याची जाणीव तिला झाली. घरी आल्यावर तिने आपल्या आईला, तन्वीला सांगितले.

''अग ! आमच्या कॉलेजमध्ये एक सर आहेत. राजेन्द्र त्यांचे नाव. मी ते त्यांच्या टेबलावर ठेवलेल्या प्लेटवर वाचले. खूप प्रेमळ. मला या कॉलेजमध्ये आपले कोणीतरी आहे असे वाटते आहे ! ते म्हणाले, ''तुला काहीही अडचण असेल तर मला भेट..., असे ते म्हणाले ते !'' राजलक्ष्मी.

''वा ! छान !'' आई.

''अगं ! काल माझ्या फॉर्मवरचे तुझे नाव त्यांनी वाचले. आणि त्यांच्या डोळ्यात पाणी आले. हरवले ते... थोडा वेळ, आणि मग, मला ऑफीसमध्ये नेऊन सगळे सोपस्कर पूरे केले. आजही खूप लाईन होती मुलांची आय-कार्ड घ्यायला. त्यांनी मला पाहिले आणि पुढे बोलावून माझे आय-कार्ड दिले. आज ते खूपच खूश असल्याचे जाणवले मला... आई ! कोण असावेत ग ते ?'' राजलक्ष्मी.

''माहित नाही ! पण उद्या त्यांचे नाव विचारून ये !'' तन्वी.

''हो, नक्की !'' राजलक्ष्मी.

तन्वीला थोडा संशय आला होता. राजू साताऱ्यात आहे. कोठेतरी नोकरी करतो म्हणे एका कॉलेजमध्ये. पण त्याच्याबद्दल अधिक माहिती नाही. हे तिला माहित होते, पण तो राजूच असेल असा सुतराम संशय तिला आला नाही.

दुसऱ्या दिवशी राजलक्ष्मी लंचब्रेकमध्ये ऑफीसमध्ये आली. तेव्हा राजू लंच घेत होता. तिला खिडकीत पाहताच... राजूने

''बाळ ! आत ये'' राजू.

आणि ती ही न भिता त्याच्या समोरच्या खूर्चीसमोर येऊन उभी राहिली.

''बैस !'' राजू.

''काय काम काढले ?''

''काही नाही ! काल मी माझ्या आईला तुमच्या बद्दल सांगितले तर ती म्हणाली सगळे नाव विचारून ये.'' राजलक्ष्मी

राजू थोडा वेळ थांबला जेवायचा. तो समजला तन्वीच तिची आई आहे आणि तिनेच माझे नांव विचारले असणार.

''हे बघ ! माझे नाव माझ्या पाटीवर आहे!'' राजू.

राजलक्ष्मीने ते नीट वाचले, पुन्हा पुन्हा विसरायला नको म्हणून....

पण राजू मात्र वादळात सापडला होता ती जवळ हवी होती, पण नको जवळीक असेही त्याला वाटले. आपण खूप पुढे गेलो आहोत. आता भूतकाळ विसरायला हवा आपल्याला. त्या जुन्या आठवणी सतावत राहतील, जगणे नकोसे करतील असे राहून राहून राजूला वाटत होते. त्यासाठी तिला विसरलेच पाहिजे. आपली मुलगी आपल्या समोर आहे, बोलते, भेटते बस, तेच तन्वीचे रूप आहे... म्हणून तन्वीला भेटूच नये असे राहून राहून वाटत होते व आपण नाही स्वतःला रोखू शकणार, माझे स्थिर संसारिक जीवन भरकटेल तन्वीच्या वादळाने...

राजलक्ष्मी संध्याकाळी घरी आली. तिने आईला राजूचे नाव सांगितले आणि तन्वीने बसकणच मारली. सद्‌गदीत झाली ती, डोळ्यातून पाण्याच्या धारा वाहू लागल्या. ते पाहून क्षणभर राजलक्ष्मी घाबरली.

''आई, का रडतेस ? काय झाले सांगना ! आई सांग !'' राजलक्ष्मी.

''काही नाही !'' तन्वी.

''अगं तू रडतेस का ?'' राजलक्ष्मी

''नाही.'' तन्वी.

म्हणत तिने डोळे पुसले. पण पूर्णपणे हरवली भूतकाळात त्या इंद्रधनुष्यात त्या आठवणीत. मग मात्र तिच्या वागण्यात खूप फरक जाणवला राजलक्ष्मीला. आपली आई इतकी भाऊक का झाली? असा प्रश्न तिला पडला. आणि ..... कॉलेजच्या ॲडमिशनच्या दिवशी 'त्या' सरांचाही चेहरा असाच भाऊक झाला. डोळ्यातून पाणी ओघळले. गालावर आणि त्यांनी काऊंटर बंद करून स्वतः माझे ॲडमिशन पूर्ण केले. माझ्या जवळ बोलताना मला बाळ का म्हणतात ? ती थोडावेळ चक्रावून गेली, पण मग ते विचार तिने झटकून टाकले.

त्यानंतर अधे-मध्ये ती (राजलक्ष्मी) राजूला भेटायची, लंचब्रेकमध्ये खूप आस्थेने, मायेने, प्रेमाने तो तिच्या जवळ बोले, अगदी खूप आस्थेने. आपली समजून, जे राजलक्ष्मीलाही जाणवत असे. तिची अभ्यासातली प्रगती छान होती. बारावीनंतर तिला मेडीकलला जायचे होते. त्यासाठी तिने सी.ई.टी. च्या परिक्षेची तयारीही वर्षभर चालू केली होती.

बारावीचा रिझल्ट लागला. राजलक्ष्मी कॉलेजमध्ये पहिली आली. त्या कॉलेजच्या प्राचार्यांच्या हस्ते तिचा सत्कार केला. तेव्हा सत्काराला उत्तर देतानाच्या भाषणात तिने राजूचा खास उल्लेख केला. या सत्कार समारंभाला तिची आई येणार हे राजू जाणून होता. म्हणून तिला भेटणे टाळावे असे राहून राहून राजूला वाटत होते. म्हणून हॉलमध्ये येण्याचे त्याने टाळले. पण तिची भिरभिरती नजर मात्र राजूला शोधत होती.

कार्यक्रम संपला. तन्वी आणि राजलक्ष्मी आपल्या घरी आले. मुलीच्या शिक्षणासाठी तन्वी सातारा शहरात रहायला आली होती. कारण गावात या सुविधा नव्हत्या. आणि एकट्या मुलीला हॉस्टेलमध्ये ठेवणे तिला मान्य नव्हते. तन्वी कॉलेजच्या समोरील एकता कॉलनीत घर भाड्याने घेऊन रहात होती. तिचा नवरा होता कोल्हापूर एस.टी. टेपोत. त्याला काही बदली मिळत नव्हती. तो आठवड्यातून एकदाच यायचा, तशी त्याची परिस्थिती चांगली होती, सहा एकराची उबजाऊ जमीन होती, बागायत होती. सासु-सासरे सारे काम सांभाळीत असत. जेव्हा मुलांच्या शाळांना रजा असे तेव्हा तिही आपल्या गावात येई, कोयना नगरला.

घरी येताच तन्वीने राजलक्ष्मीला विचारले.

''अग ते राजू की काय यांना पाहिलस काय तू ?'' तन्वी.

''नाही ते नव्हते आले, ऑफीसातच असावेत !'' राजलक्ष्मी.

तन्वीच्या चेहऱ्यावरची नाराजी मात्र राजलक्ष्मी ध्यानात आलीच.

''का ग कां विचारतेस, तुला त्यांना भेटायचे होते का ?'' राजलक्ष्मी.

''नाही ! आता यावर्षी हर्शद चे ॲडमिशन येईल, तेव्हा ओळख असलेली बरी. त्याला कसे मार्क येतील सांगता येत नाही. अजून रिझल्ट लागायचा आहे म्हणून !'' तन्वी.

''तू चिंता करू नकोस ! मी आहेच ना !'' सारे काही ठिक होईल. ते तु माझ्यावर सोड !'' राजलक्ष्मी.

तन्वीने ऐकले न ऐकले असे केले, आणि ती घरातील कामा त मग्न झाली. असे आईला का वाटावे याच विचारात राजलक्ष्मी आपल्या 'नीट' च्या परिक्षेच्या अभ्यासाला बसली. अभ्यासाची तयारी चालू होती. अजून १५ दिवसांचा अवधी होता.

एक दिवस दुपारी राजलक्ष्मीला कॉलेजातून राजूचा फोन आला. तो तन्वीने उचलला. पण तिच्या जवळ न बोलता राजूने 'राजलक्ष्मी आहे का ?' म्हणून विचारले. तन्वीने तो आवाज राजूचा आहे हे ओळखले. पण अधिक न बोलता तिने फोन राजलक्ष्मीला दिला.

''कोण बोलत आहे ?''

''सर मी राजलक्ष्मी बोलते आहे. मघाशी फोन उचलला तो माझ्या आईने तन्वीने, हा बोला !'' राजलक्ष्मी.

बाळ तुझी निटची परिक्षा आता होईलच, पण तू बी.एस.सी. ला ॲडमिशन घेऊन ठेव. रिस्क नको. तू मेडीकलला जाशीलच, पण पर्याय म्हणून प्रत्येक विद्यार्थी बी.एस.सी. ला ॲडमिशन घेत आहे. जागा कमी आहेत. पण उद्यापर्यन्त प्रवेश न घेतल्यास आम्ही आपल्या कॉलेजच्या बाहेरच्या मुलांना त्या सिटस् देणार आहोत, न विसरता उद्याच ॲडमिशन घे !'' राजू.

''हो ! सर येते उद्या मी ॲडमिशन घ्यायला. सर फी किती आहे ?'' तन्वी.

''दोन हजार ! पण सकाळीच ये. येताना दोन फोटो आणि १२ वी च्या मार्कशीटच्या दोन झेरॉक्स कॉपीज घेऊन ये. मी तुझे नाव अगोदरच निवडले आहे. मी वाट पहातो आहे !'' राजू.

राजलक्ष्मीने आईला सांगितले. तिला प्रश्न पडला घरात पैसे नव्हते. ती ३० ता. होती आणि वडीलांकडून पैसे येण्याची शक्यता नव्हती. एस.टी. वाल्यांचे पगार गेले २ महिने झालेच नव्हते, केव्हा घेतील हे माहित नव्हते. पैशाचा मोठा प्रश्न होता. ॲडमिशन घेणे जरुर होते. पण पैशाअभावी ते कसे शक्य होणार याच विवंचनेत तन्वी होती.

''कां ग तुझा चेहरा असा का उतरला ?'' राजलक्ष्मी.

''काही नाही उद्याच पैसे कोढून आणू ! आणि उद्याचा शेवटचा दिवस आहे, काय करावे समजत नाही. '' तन्वी.

''ठीक ! तुझ्याजवळ किती आहेत ?'' राजलक्ष्मी.

''सातशे रुपये.'' तन्वी.

"तू ते मला दे ! मी तेवढे भरते आणि पैशे आल्यावर भरीन ! असे मी काकांना सांगते तू चिंता करू नकोस !'' राजलक्ष्मी.

आणि सातशे रुपये घेऊन राजलक्ष्मी कॉलेजमध्ये आली. काऊंटर नं. ३ ला राजू ॲडमिशनचे फॉर्म घेत होता. ती बाहेर थांबली आणि लंच ब्रेक झाल्यावर ऑफीसमध्ये आली. तिने सगळी हकिकत सांगितली.

"तू हे ७०० रु. घरी घेऊन जा. मी सगळे पैसे भरतो. तुझे ॲडमिशन करून देतो. तू निश्चींत हो.'' राजू.

"तसेच नको सर. आईला नाही आवडणार.'' राजलक्ष्मी

"मी सांगितले ते ऐक. असे अर्धवट पैसे घेऊन उधारी नाही ठेवता येणार. तुझे ॲडमिशन मी करून घेतो. घरी थोडे पैसे हवेत ना. तू ते आईला दे !'' राजू.

राजूने तिचे ॲडमिशन प्रोसेस पूर्ण केले आणि पावती तिच्या हातात दिली. तू तुझ्या आईला माझा नमस्कार सांग. जेव्हा पैसे येतील तेव्हा आणून दे आणि नाही दिलेस तरी चालेल. नाही तशी तू माझ्या मुलीसारखी आहेस ना !''

"होय सर, मी येईन माझी नीटची परिक्षा झाल्यावर !'' राजलक्ष्मी.

आणि ती खुशीत निघून गेली. घरी येताच तिने ते ७०० रु. आईच्या हातात दिले. सरांनी माझे पैसे भरले आई ! नाही घेतले हे. ७०० रु. म्हणाले. अचानक खर्च आला तर. म्हणून राहू देत. पैसे येतील तेव्हा मला दे ! असे ते म्हणाले !'' राजलक्ष्मी.

तन्वी तिच्याकडे पहातच राहिली आणि मनातल्या मनात म्हणाली, "तुझ्या बापाने हे केले ते योग्यच ! काही मेहरबानी नाही !''

त्यानंतर नीटची परिक्षा झाली. छान पेपर्स गेले होते. सिलेक्शन होणार यावर तिचा विश्वास होता. आपण राजू सराचे पैसे अजून दिले नाहीत, त्यांना काय वाटेल ? याच विवंचनेत ती होती !

इकडे राजूला चिंता होती की, जे हे फिचे पैसे घ्यायला हिच्याकडे पैसे नाहीत तर उद्या मेडीकलचे ॲडमिशन ही कसे घेणार ? कोण पैसे देणार हिला ? ती माझी मुलगी आहे. आणि तिच्या शिक्षणाचा खर्च उचलणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे. राजूने तन्वीच्या घरी फोन केला...

"हे पहा ! तुम्ही राजलक्ष्मीला कॉलेजमध्ये येऊन भेटायला सांगा.'' राजू.

आणि त्याने फोन खाली ठेवला.

इकडे तन्वी आणि राजलक्ष्मी चिंतेत होत्या. त्यांनी पैसे तर मागितले नाहीत ना ? याच विचाराने तन्वीच्या डोळ्यात पाणी उभे राहिले.

''आई ! तू का रडते आहेस ? तू चिंता करू नको ! मी जाते कॉलेजमध्ये ! भेटते सरांना ! आणि सारी हकीकत सांगते ? ते घेतील मला समजावून.'' राजलक्ष्मी.

आणि राजलक्ष्मी कॉलेजमध्ये आली. लंच होईपर्यंत थांबली आणि मग जेव्हा राजू जेवायला बसणार एवढ्यात याला जाऊन भेटली. बराच वेळ राजूच्या टेबलासमोर ती उभी होती.

''बस ना ! तू जेवलीस का ?''

''नाही सर ! घरी गेल्यावर जेवेन.''

''नाही हा माझा डब्बा आपण दोघांनी खाऊ ! तुला काय आवडते ते सांग ! मी मागवतो कॅन्टीनमधून.'' राजू.

आणि राजूने दोन सॅडवीच मागविले. राजलक्ष्मी अबोल होती. तिला आज खूपच अवघडल्या सारखे झाले होते. तिला गप्प पाहून –

''बाळ तू गप्प का ? तूझे 'नीट' चे पेपर कसे गेले ?

''छान सर ! ॲडमिशन मिळेल याची मला खात्री आहे.''

''व्वा ! छान ! तू पुढची चिंता करू नको ! आता तुझ्या घरच्यानीही काळजी करण्याचे कारण नाही. मी सारे पाहून घेईन. ती माझी नैतिक जबाबदारी आहे. बाळ ! तू निश्चींत रहा !'' राजू.

''नैतिक जबाबदारी ! ती कशी ?'' राजलक्ष्मी.

राज काहीच बोलला नाही. त्याने उठून तिच्या पाठीवरून हात फिरविला.

''कारण तु माझा 'बाळ' आहेस म्हणून !'' राजू.

हे राजलक्ष्मीच्या ध्यानात काही आले नाही. त्या दोघांनी जेवण घेतले. आणि राजू मग तिला कॉलेजच्या गेटपर्यंत सोडायला आला. या गोष्टीचे अप्रुप राजलक्ष्मीला वाटले. हे कोण ? माझे नातेवाईक नाहीत. यांना माझ्याबद्दल एवढे प्रेम का वाटावे ? याच विचारात ती घरी आली.

सगळी हकिकत तिने आईला सांगितली. ते माझी मेडीकलची फी पण भरतो म्हणाले. चिंता नको. पण तू डॉक्टर हो असे म्हणाले ते. हे ही सांगितले.

तन्वी कोड्यात पडली, म्हणजे राजलक्ष्मी त्यांचीच मुलगी आहे हे ही त्यांच्या ध्यानात आले असावे. राजूचाच तोंडावळ घेऊन ती जन्माला आली

होती. अगदी तशीच दिसते. म्हणजे हे गुपीत आता माझ्यापुरते नाहीतर याची जाणीव राजूलाही झाली आहे. त्याने मनोमन राजलक्ष्मीला आपली मुलगी मानली. आता तिच्या भविष्याची चिंता आपल्याला उरली नाही. पण हे गुपीत राजलक्ष्मी पासून तसेच गुपीत राहील याची काळजी ती घेत होती.

'नीट' च्या परिक्षेचा रिझल्ट आला. राजलक्ष्मीला छान मार्क मिळाले. १६४/२००. आणि ती मेरीटमध्ये आली. प्रथम ती पेढे घेऊन कॉलेजमध्ये राजूकडे आली. खूप आनंदात होती.

''बाळ तू आपल्या अर्जात आता सातारा कऱ्हाडमधील ...... कॉलेजला पहिला प्रेफरन्स दे. ते घरापासून जवळ आहेत. तेव्हा हॉस्टेलचा खर्च नाही. घरीच रहाता येईल, अभ्यासही छान होईल आणि तू मला भेटत राहतील!'' राजू.

आठवड्याभरात मेडीकलच्या सीटचे वाटप झाले. राजलक्ष्मीला कऱ्हाडाच्या यशवंतराव चव्हाण या सरकारी हॉस्पीटलात ॲडमिशन मिळाले. निकाल लागताच राजलक्ष्मी राजूला कॉलेजमध्ये भेटायला आली.

''बाळ तू हॉस्पीटलच्या कॉलेजमध्ये जा आणि तुझी फि किती ? इतर खर्च किती याची चौकशी करून मला भेट.'' राजू.

तिने हॉस्पीटलमध्ये जाऊन सगळी चौकशी केली. फी चा आकडा बघून घाबरली. ९०,०००/– आता आपले स्वप्न इथेच संपले. कशी होणार मी डॉक्टर? आणि याच विवंचनेत ती कॉलेजमध्ये येऊन राजूला भेटली.

''तू अर्धा तास थांब ! आपण बरोबर जेवण घेऊ ! मग येथूनच कॉलेजला जाऊन ॲडमिशन घेऊन मग घरी जा !'' राजू.

आता तर प्रश्नांची भिंतच राजलक्ष्मीच्या डोळ्यासमोर उभी होती. काहीही न बोलता राजूच्या टेबला समोरील खुर्चीत बसून होती. दोघांनी बरोबर जेवण घेतले आणि एक डी.डी. तिच्या हातात दिला. ९०,०००/– चा.

''तू आता प्रथम हॉस्पीटलमध्ये जा. ॲडमीशन घे ! तुला काही अडचण आली तर मला फोन कर. माझा मो.नं. ९८९११२२०६८ आहे.'' राजू.

आणि राजलक्ष्मीने जाऊन ॲडमीशन घेतले व ती कॉलेजमध्ये आली. अजून खूप खर्च आहे. पुस्तके, मेडीकल इन्स्ट्रूमेंटस्. ती घेण्यासाठी राजूने अगोदरच आपल्या अकाऊंटमधून २०,०००/– रुपये काढून ठेवले होते. ते त्याने तिच्या हातात ठेवले.

''ही रक्कम तू फक्त तुझ्या कॉलेजमधील खर्चासाठीच वापर. हवे तर एक बँक अकाऊंट उघडून देतो व ते तुझ्या सोईचे होईल !'' राजू.

''होय सर ! म्हणत ती घरी निघाली. ते पैसे तिने जपून आपल्या पर्समध्ये ठेवले होते. जाताना ती म्हणाली. ''सर ही रक्कम मी अमानत म्हणून घेत आहे. मी कमवती झाले की तुमचे सारे पैसे परत करीन!'' राजलक्ष्मी.

राजू फक्त हसला.

या प्रमाणे पुढच्या चारही वर्षाची फी राजूने भरली आणि आपल्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न केला.

खरेतर खेर्डीत घडलेला तो प्रकार हा कायद्याने गुन्हा होता. बलात्कार होता तो. हे तो चांगला जाणत होता. तन्वीने हे माझे पाप आपल्या ओटीत घेतले. हा तिचा मोठेपणा होता. हे ही तो जाणत होता. हे तन्वीचे उपकारच होते राजूवर. हे तो जाणून होता. तन्वीला झालेली पहिली मुलगी ही माझीच मुलगी आहे, हे ही त्याला पटले होते. आणि आपल्या मुलीसाठी तो सारे काही करीत होता. पहिल्या वर्षीची फी त्याने अकाऊंटमधून भरली पण नंतरची फी साठी त्याने स्वतःच्या पी.एफ.मधून कर्ज उचलेले होते. तो एक कारकून होता. कोणी टाटा बिर्ला नव्हता. पण स्वच्छ मनाने आणि जाणीवपूर्वक त्याने ही जबाबदारी स्वीकारली होती.

राजलक्ष्मीचे शिक्षण चालू होते. छान मार्कांनी ती पास होत होती. तिसऱ्या वर्षांनी तिची इंटरनशीप त्याच कॉलेजमध्ये चालू झाली होती.

याच चार वर्षाच्या काळात तन्वीच्या कुटुंबात फार उलथापालथ झाली. तिच्या नवऱ्याचा अपघात झाला. एस.टी. तील नोकरी गेली. पण मिळालेल्या इन्सुरन्स आणि पी.एफ. तसेच ग्रॅच्यूटी त्याला मिळाली. तो घरीच होता. आणि तन्वी तशीच त्या पैशाच्या व्याजावर आपल्या कुटुंबाची गुजराण करीत होती. या हालाकीच्या परिस्थितीत तिला कोणाचा आधार नव्हता. पण राजूने राजलक्ष्मीची जबाबदारी स्विकारल्यामुळे मोठा प्रश्न सुटला होता.

खरेतर राजूवर फारशी जबाबदारी नव्हती. तो आणि त्याची पत्नी दोघेही येथे रहात होती. अजून इतकी वर्षे जाऊनही त्याला मुल-बाळ नव्हते. याबाबत ते कुटूंब दुःखी होते. पण राजलक्ष्मीच्या रुपाने राजूला थोडा दिलासा मिळाला होता. अजून राजलक्ष्मी त्याच्या घरी आली नव्हती. कारण तसा काही योगही आला नव्हता.

राजलक्ष्मीचे शिक्षण चालले होते. खूप हुशार होती ती. त्या संस्थेकडून तिला एक स्कॉलरशीपही मिळाली होती. त्यामुळे तिच्या वरखर्चाला कोणावर विसंबून रहाण्याची गरज नव्हती. राजलक्ष्मी इतर विद्यार्थ्यांबरोबर वावरताना अत्यंत सालस व मर्यादेने वागत असे. तिसऱ्या सेमिस्टरमध्ये तिची जी.एस. नेमणूक झाली. तिचे वाचन अफाट होते. मेडीकलच्या पुस्तकाचे व इतर मराठी वाङ्मयही. अनेक स्पर्धेत तिला पारितोषिक मिळाली होती. तो सर्व प्रोफेसरांची लाडकी होती. याचाही राजूला अभिमान होता. ती दर आठवड्याला एकदा तरी कॉलेजमध्ये येऊन राजूला भेटत असे. कॉलेज मधल्या स्टाफला ही माहीत होते की ही राजूची मानस कन्या आहे. सर्वांना ती आवडायची.

तसेच इतक्या वर्षात राजूची आणि तन्वीची ही भेट झाली नव्हती. पण राजलक्ष्मीकडून राजूबद्दल बरेच काही तन्वीला समजत होते. तिच्या मनातही राजूबद्दल आदर निर्माण झाला होता. तो आपल्या आयुष्यात भले नाही आला, पण एक मसीहा म्हणून देवासारखा उभा राहिला. या त्याच्या उपकाराखाली तन्वी सदैव वावरत होती. नाही तरी त्यांच्या आठवणी नाही विसरू शकली ती. लग्नानंतरचा तिचा प्रवास तसा खडतरच होता. नवरा दूर कोल्हापूरला. आर्थिक संकटांचा सामना करता करताना ती अगदी मेटाकुटीला आली होती. पण ती दैवाला वा कोणालाही दोष देत नव्हती. ही सगळे आपल्या कर्माची फळे हे तिला पटले होते आणि म्हणून ती भोगल्याशिवाय पर्याय नव्हता. हे तिने मनाशी पक्के ठरवले होते. साताऱ्यात आल्याला तिला ८ वर्षे होत आली होती. तीन मुलांची ती आई. राजलक्ष्मी शिवाय दोन मुलगे तेही शाळा कॉलेजात शिकत होते. खर्चाची तोंड मिळवणी करीत भिंतीत, चेहऱ्यावर आनंदाचा मुखवटा, पांघरून वावरत होती.

राजूही आता हेड क्लार्क म्हणून त्या कॉलेजच्या एका दुसऱ्या शाखेत बदली होऊन आला होता. त्याच कॉम्प्लेक्समध्ये ते इंजिनिअर कॉलेज होते. पगारही वाढला होता. ही परमात्म्याची कृपा होती राजूवर. म्हणून त्याने एक सत्यनारायणाची पूजा ठेवलेली होती. इतक्या वर्षात असा योग आला नव्हते. पण तो कॉलेजच्या क्वार्टरमध्ये रहायला आला होता. म्हणून ही पूजा त्याने ठेवली होती.

एक दिवशी राजलक्ष्मी त्याला भेटायला आली होती. राजू तिला आपल्या घरी घेऊन आला. त्यांचे क्वार्टर कॉलेज कॅम्पसच्या बाजूलाच होते. राजूची

बायको तिला प्रथमच भेटत होती, काळी सावळी पण निटस चेहऱ्याची प्रसन्न, ती राजलक्ष्मीला खूपच भावली.

''रजू ! ही राजलक्ष्मी. माझी मानस कन्या. यावर्षी डॉक्टर होईल !'' राजू.

रजूने राजलक्ष्मीला जवळ घेतले आणि तिचा चक्क मुका घेतला. तिही बावरली, पण तिच्या प्रेम वर्षावाने ती सुखावली. खूप उठ बस केली राजलक्ष्मीची आणि तिच्या हृदयात 'आई' या प्रेमळ भावनेची जागा तिने करून दिली.

''राजलक्ष्मी ! उद्या आमच्याकडे सत्यनारायणाचे व्रत आहे. तुम्ही सर्व कुटूंब या जेवायला.'' राजू.

''हो ! जरुर येऊ ! तसेच उद्या माझे कॉलेज बंद आहे. परिक्षेच्या तयारीसाठी १५ दिवसांचा ब्रेक आहे.'' राजलक्ष्मी.

ओके ! राजू.

आणि पूजेच्या दिवशी राजलक्ष्मी, तिची आई तन्वी आणि दोन्ही भावंडे आली. राजू २२/२३ वर्षांनी तन्वीला पहात होता. गोरीपान तन्वी आता सुकलेल्या झाडासारखी दिसत होती. खूप वाईट वाटले त्याला आणि त्याने आवंढा गिळला. पुन्हा तिच्याकडे बघण्याची हिम्मत त्याला झाली नाही आणि ती ही राजूला तिच्या लग्नानंतर प्रथमच पहात होती. त्याचा आनंदी चेहरा पाहून ती ही सुखावली.

राजलक्ष्मीची परिक्षा झाली. पेपर्स खूप चांगले झाले. एम.बी.बी.एस. ची शेवटची परिक्षा होती आणि आता पास झाल्यावर ती साताऱ्यातच तिच्या हॉस्पिटलमध्ये इंटरशिप करणार होती.

महिन्याभरात परिक्षेचा निकाल आला. ती तिच्या कॉलेजमध्ये पहिली आली. तिचा सत्कार त्यांच्या हॉस्पिटलचे डिन डॉ.राव यांच्या हस्ते झाला. या सत्काराला मात्र राजू सपत्नीक हजर होता. तन्वीही आली होती, पण बोलणे झाले नाही, म्हणजे राजूनेच तिची जवळीक टाळली.

डॉ.राजलक्ष्मीची नेमणूक त्याच कॉलेजमध्ये झाली. ही इंटरशिप दोन वर्षाची होती. तिला सरकारतर्फे चांगले स्टायपेंडही मिळणार होते. ती सगळ्या स्टाफ आणि प्रोफेसरांची लाडकी होती. छान काम व्हायचे, ती खूप सेंसेटीव्ह होती. हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या पेशंटची खूप चांगली काळजी घेई. त्यांना आधार देई, प्रसंगी गरीबांना औषधेही देई. या काळात ती आपल्या एम.डी. परिक्षेचा

एंटरंन्सचा अभ्यास ही करीत होती.

काय झाले राजूला समजले नाही, पण गेला महिनाभर त्याच्या पोटात दुखत होते, त्याने राजलक्ष्मीच्या हॉस्पिटलमध्ये जाऊन ओ.पी.डी.ला दाखविले. सगळे रिपोर्ट आले, पोटात अल्सर आहे हे सिद्ध झाले आणि औषधाने बरे वाटेल असे निदान झाले. तो मे महिना होता. कॉलेजच्या परिक्षा चालू होत्या. राजूने एक महिन्याची रजा घेतली. राजलक्ष्मी राजूला घरीच उपचार करीत होती. तिने तिच्या एका हुशार सर्जनना राजूला दाखविले. त्यांनी त्या दुखण्याचे वेगळेच निदान केले. त्याला असाध्य अशा व्याधीने ग्रासले होते. औषधे चालू होती. पण पुन्हा पंधरा दिवसांनी राजूला हॉस्पिटलात ॲडमिट करावे लागले. डॉ.नरीयानी, हेड ऑफ द सर्जन डिपार्टमेंट यांनी ती त्याच हॉस्पिटलमध्ये केली. गेले आठ दिवस तो आय.सी.यु.मध्ये होता व मग जनरल वॉर्ड म्हणजे स्पेशल रुममध्ये हलविण्यात आले. त्याची रिकवरी छान चालू होती.

एक दिवस त्याला बघायला तन्वी आली. सोबत तिचे पतीही होते. ते कुबड्या घेऊन चालत असत. फारशी नाही, पण त्याची मुव्हमेंट होत असे. त्यांची ट्रिटमेंट त्याच हॉस्पिटलमध्ये चालू होती. राजलक्ष्मी तेथे असल्याने सारे काही सुरळीत चालले होते. पण तरी हालचालींना मर्यादा होत्याचना.

जेव्हा तन्वी राजूला बघायला आली, तेव्हा तेव्हा राजू ग्लानीतच होता. आणि सारखा राजलक्ष्मीचे नाव घेत होता. आणि डॉ.राजलक्ष्मी त्याच्या शेजारी होती. अहोरात्र तिने तिची ड्यूटी आय.सी.यू.मध्येच लावून घेतली होती. हे त्याला आठवडा भराने समजले.

त्या आजारपणात जी शस्त्रक्रिया झाली त्यामुळे भविष्यात तरीही त्याला मुल होण्याची शक्यता होती. डॉक्टरांनी तसे त्याला सांगताच त्याला खूप आनंद झाला. हि माझ्या कर्माची फळे हेच त्याच्या मनातून जात नव्हते. मी माझ्या पत्नीला मातृसुख देऊ शकणार नाही हिच भावना त्याच्या मनात घर करून बसली होती. पण सारे काही दैवाधीन हे ही तो मानत होता. हे माझ्या कर्माचे भोग आहेत हे त्याने जाणले होते आणि स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न केला. या आजारानंतर त्याच्यात चांगली सुधारणा झाली होती.

तो जनरल वॉर्डमध्ये आल्याची बातमी राजलक्ष्मीने आईला दिली. त्याच्या दुसऱ्याच दिवशी ती राजूला बघायला हॉस्पिटलमध्ये आली. आज प्रथमच त्याचे तिच्याजवळ बोलणे झाले. सोबत डॉ.राजलक्ष्मीही होती. राजू अजून पूर्ण

बरा झाला नव्हता. पण डॉक्टरांनी दिलेल्या बातमीने तो आनंदात होता. तो तन्वीजवळ फारसा बोलला नाही कारण बोलायला तसा काही विषय नव्हताच. तो बराच वेळ डोळे मिटूनच पडून होता. डॉ.राजलक्ष्मीने त्याला उठून बसायला सांगितले. पण त्याच्यात त्राण नव्हते आणि मनावर प्रचंड दडपण होते. तो कॉटला टेकून बसला, तर समोर अजून तन्वी बसलेली पाहिली. राजलक्ष्मी त्याच्या शेजारी बसली होती त्याला धरून तोल जाऊ नये म्हणून. आणि तन्वी मात्र उभी होती.

एकाएकी राजूमध्ये काय संचाले माहिती नाही त्याने तन्वीचे दोन्ही हात पकडले...

''एक काम कराल माझे, ही तुमची मुलगी... तुम्ही मला दत्तक म्हणून द्यावी अशी माझी इच्छा आहे, नाही म्हणू नका. मला लग्नानंतर मुले झाली नाहीत. एवढी माझी विनंती मान्य करावी... कराल का ?'' राजू.

राजलक्ष्मीची आई गडबडली. काय बोलावे समजेना तिला... मात्र त्याने तिचे हात आपल्या हातात अजून तसेच पकडून ठेवले होते.

''बोलाना !''

पण तन्वीच्या डोळ्यातून अश्रुंच्या धारा वाहू लागल्या होत्या. त्या पुसण्याचे भानही तिला झाले नाही. तिचे दोन्ही हात अजूनही राजूच्या हातातच होते. मनाची तयारी करून ती म्हणाली –

''हो ! दिली ! ही तुमचीच आहे ! आणि तुमचीच राहील.'' तन्वी.

आणि एक दिर्घ श्वास सोडून राजूने तिचे हात सोडले आणि तिला नमस्कार केला. तन्वीपण भावविवश झाली या प्रसंगाने आईच्या भावना उचंबळून आल्या. ती समोरच्या स्टूलावर बसली आणि ओक्साबोक्शी रडू लागली. त्याने राजलक्ष्मी गडबडली. या घटना इतक्या वेगाने घडल्या की काय बोलावे हे तिला कळेना, तिची प्रतिक्रिया काय ? याची राजू वाट पाहत होता...

तन्वीने राजलक्ष्मीचा हात राजूच्या हातात दिला. ''हि तुमची मुलगी ...''

आणि राजलक्ष्मीने राजूला... ''बाबा'' अशी हाक मारली... या सगळ्या घटना इतक्या वेगाने घडल्या की राजू, तन्वी आणि राजलक्ष्मी सारेच भावूक झाले क्षणभर... तिघांच्याही डोळ्यातून अश्रूंच्या धारांना त्यांनी वाट करून दिली.

असे काही होईल याची राजलक्ष्मीला कल्पना नव्हती. सारे काही घडले ते

अघटीतच.

थोड्या वेळाने तन्वी निघाली.

‘‘येते मी !’’ म्हणत.

आणि राजलक्ष्मीही पाठोपाठ, कारण आता मोठे सर्जन व्हिजीटला येणार होते, तत्पूर्वी संपूर्ण दिवसाची बीपी, पल्स, लघवीचे प्रमाण यांची नोंद करायची राहून गेली होती, ती तिने वॉर्डरूमध्ये जाऊन केली व पुन्हा राजूच्या रुममध्ये आली. अजून राजू डोळे मिटूनच बसला होता.

‘‘बाबा !’’ राजलक्ष्मी.

या हाकेने त्याला जाग आली. एवढ्यात डॉ.नरीयानी आले. राजूला कॉटवर बसलेला बघून त्यानाही आश्चर्य वाटले.

‘‘छान रिकव्हरी ! आता काही दिवसांनी घरी सोडता येईल. पण पुढचे सहा महिने तुम्हाला काळजी घ्यावी लागेल आणि प्रत्येक महिन्यात सगळे रिपोर्ट करून पहावे लागेल काय डेव्हलपमेंट होते आहे ती !’’ डॉ.नरीयानी.

‘‘हो सर !, मी यांची चांगली काळजी घेईन सर !’’ राजलक्ष्मी.

‘‘बरं... !’’ डॉ.नरीयानी.

राजलक्ष्मीची इंटरशिप महिन्याभरात संपणार होती. पण तिने याच हॉस्पिटलमध्ये नोकरी करावी अशी इच्छा तिने डॉ.नरीयानी जवळ व्यक्त केली आणि त्यांनीही त्याला होकार दिला.

‘‘डॉ.राज मी तुम्हाला माझे रजिस्ट्रार म्हणून नेमणूक केली तर चालेल ना ?’’ डॉ.नरीयानी.

राजलक्ष्मीने, त्वरीत त्याला होकार दिला. आणि नोकरी सोबत आता आपल्याला एम.डीच्या अभ्यास ही करता येईल. या विचाराने ती आनंदी झाली. ही बातमी तिने आईलाही दिली. आता राजलक्ष्मीने तिच्या कुटुंबाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतलीच पण रोजच्या रोज त्यांच्या घरी येऊन त्याला औषधोपचार ही करीत होती.

पण एक गोष्ट प्रकर्षाने राजलक्ष्मीला जाणवत होती; आणि त्याची छटा तिच्या चेहऱ्यावर, रोजच्या रोज वागण्यातही तिला जाणवू लागली, न राहून तिने....

‘‘आई ! तुला कसली चिंता, माझी ? अगं मी तूझीच मुलगी आहे आणि आपल्या कुटूंबाची जबाबदारी मी घेतली आहे ! त्या बाबांना मी बाबा मानले.

मी त्याची मानस कन्या आहे. या दोन्ही कुटूंबांची जबाबदारी मला टाळता येणार नाही. तू चिंता सोडून दे आणि शांत हो !'' राजलक्ष्मी.

तन्वीलाही हायसे वाटले. कारण आपली मुलगी आपल्या हातून निसटते की काय ? या चिंतेने ती ग्रासली होती पण आता तिची चिंता मिटली होती. आणि तिच्या चेहऱ्यावर हसू दिसू लागले. हे राजलक्ष्मीला समजले नाही असे नाही.

राजूच्या तब्येतीत खूपच सुधार दिसू लागला होता. आता तो ऑफीसलाही जाऊ लागला होता. कधीकधी ऑफीसची कामे तो घरूनच करीत असे.

आता या दोन कुटूंबातली दरी हळूहळू मिटत होती. राजूने आपला भूतकाळ विसरायचे ठरवले आणि तोही आता आनंदात होता. पण तरीही राज आणि तन्वी यांच्या जीवनातले गुपीत त्या दोघानीही जपले. त्याची छटाही कोठे जाणवणार नाही. याची काळजी दोघे घेत होते.

डॉ.राजलक्ष्मी एम.डी.झाली ती गायनॉलॉजी या शाखेत आणि त्याच हॉस्पिटलमध्ये तिला हॉस्पिटलने मानद डॉ. म्हणून नेमणूक केली.

राजलक्ष्मीच्या मनात अनेक दिवस एक विचार घोळत होता... राजूच्या पत्नीला मुल का होत नाही ? तिने तिच्या आणि राजूच्या सगळ्या टेस्ट करून घेतल्या. त्याचवेळी तिने आपला आणि राजूचीही डी.एन.ए.टेस्ट केली होती. त्यात राजू आणि तिचा डी.एन.ए. जुळला होता. म्हणजे मी यांचीच मुलगी असावी. असा कयास तिने केला. ती या निर्णयापर्यंत्न आली होती.

राजूच्या पत्नीच्या विधानामध्ये एक अडचण होती. तिच्या गर्भाशयाचे मुख बंद होते असे राजलक्ष्मीला जाणवले. मग तिने राजूला या सर्व गोष्टीची माहिती दिली आणि एक छोटीशी सर्जरी करून तो मार्ग मोकळा केला. तिचे वयही काही जास्त नव्हते. या वयात प्रेग्नसीं शक्य आहे हे तिने जाणले होते.

आणि पुढच्या सहा महिन्यात तिचा कयास खरा ठरला. राजूची पत्नी गरोदर राहिली. खूप आनंद झाला राजलक्ष्मीला आणि राजूलाही.

स्त्रीच्या जीवनात मातृत्व येणे ही स्वर्ग सुखाहून खूप मोठा आणि वेगळा आनंद स्त्रीला होता. आज राजलक्ष्मीचा पहिला प्रयोग अनुभवाचा एक टप्पा होता. खूप आनंद झाला तिला आणि दोन्ही कुटूंबांना.

पण अजूनही डि.एन.ए. ची गोष्ट डॉ.राजलक्ष्मीच्या मनात घोळ घालीत होतीच. माझी आई ही राजूच्या गावातली, तेव्हा काही संबंध आला असावा

का ? कारण माझा चेहरा मोहरा राजू सरांसारखा आहे. काहीतरी गौड बंगाल असावे. शिवाय त्यांना माझ्याबद्दल आणि मला त्यांच्याबद्दल एवढी ओढ का असावी ? शिवाय आमचा डी.एन.ए.ही जुळतो. काही असो, हा योगायोग ही असावा. अशी आपल्या मनाची समजूत डॉ.राजलक्ष्मीने करून घेतली आणि विचारांचे हे जंजाळ भिरकाऊन दिले भूतकाळाच्या गर्भात.

राजूच्या पत्नीची डिलीव्हरीही डॉ.राजलक्ष्मीनेच केली, मुलगा झाल. राजूची निपुत्रीक ही विवंचनाही संपली. डॉ.राजलक्ष्मीने राजूने तिच्या शिक्षणासाठी केलेल्या मदतीची परतफेड केली होती.

सारे काही ठीक झाले होते. डॉ.राजलक्ष्मीने साताऱ्यामध्येच एक क्लिनिक चालू केले. ग्रामीण भागातल्या लोकांची चांगली सोय झाली आणि कुटूंबाची आर्थिक कोंडीही आता संपली होती. आता दोन्ही कुटूंबाचा घरोबाही वाढला होता. संशयची जळमटे सगळ्यांच्या मनातून दूर झाली होती आणि गोकूळातला आनंद नांदत होता.

आता राजलक्ष्मीचे नांव सगळीकडे झाले होते. एक आधार त्या लोकांना वाटत होता. पण डॉ.राजलक्ष्मीच्या मनातले डी.एन.ए. चे भूत काही केल्या उतरत नव्हते... शेवटपर्यन्त...

०-०-०-०

# वारस

अनेकांच्या जीवनामधल्या खडतर परिस्थितीशी सामना करता करता या मार्गावरची अनेक वळणे घ्यावी लागतात आणि जेव्हा माणूस एका वळणावर येतो त्या सुटलेल्या दुव्यांची खंत त्याला सतावीत रहाते. त्याला कारणेही बरीच असतात. बहिणींच्या लग्नातून न मिळणारी सवड, आई-वडिलांचे आजार अशीच समस्या यातून बऱ्याचशा पुरुषांना आपले लग्न करता येत नाही. काहींची वडीलोपार्जित खूप संपत्ती असते पण वारसा चालवायला कोणी नसते. दत्तक घेणे त्याना पसंत नसते. अजूनही मुले होण्यास ते सक्षम असतात. पण उतारवयात लग्न करणे अडचणीचे असते. अनेक वेळा प्रेमभंगातून मन पुन: सावरणे कठीण होते व वेळ निघून गेलेली असते. अशा वेळी खरेतर अनेक पर्याय असतात पुढे, पण लग्न करून मुल झालेच नाहीतर ! म्हणून आपल्या देशात सरोगसीचा पर्याय पुढे आता व गेला १५ वर्षात त्याने बाळसे घेतले.

पण लग्नाबाबत त्यालाही अनेक अडचणी असतात. सरोगसीचा निर्णय पुरुष व स्त्रिया स्वीकारायला तयार नसतात. मनात असतानाही पण एक वेळ अशी येते की तो पर्याय स्वीकारुन ती व्यक्ती पुढे जाते. लग्न न करता, तेव्हा सरोगसी या मार्गाचा अवलंब करणे, मनाची तयारी झाल्यावर स्वत:चे मूल असावे. आपल्या घराण्याला वारस हवा. व आई-वडिलांच्या मनात येणारे विकल्प टाळण्यासाठी हा पर्याय पुरुष स्वीकारतात. त्यासाठी सरोगटच्या शोधा शोधीला सुरुवात होते. ती स्त्रीतही सुंदर, सुशील, सुदृढ, संस्कारणीय असावी. व यापेक्षा ती गरजू हवी. यामुळे तशा स्त्रीचा शोध सुरु होतो.

त्यामध्ये प्रत्यक्ष शरीर संबंध न येता पुरूष बिजांच्या माध्यमाने गर्भ धारणा होते. व त्या स्त्रीला मुल होते व त्या मुलावर पुरुषाचा हक्क रहातो. तशी कायद्यामध्ये त्या गरजू स्त्रीला पैशाच्या स्वरुपात काही रक्कम देण्याची कबूलीवर ती स्त्री त्या पुरुषाच्या बीजाचे रोपण करुन घेते व गर्भधारणा होते. पून: ते मुल जन्माला आल्यावर एका विशिष्ट काळात त्या पुरुषाच्या हवाली केली जाते. व त्याचे संगोपन तो पुरुष व्यवस्था करुन करतात. आपल्या आई-वडीलांच्या मदतीने वा कोणी बाई कामाला ठेवून किंवा पाळणा घरात त्या मुलाची तात्पूर्ती व्यवस्था करुन तो मुल वाढते, पण आईचा सहवास, संस्कार, मातेचे दुध यापासून ते वंचीत होते. पुरुषांना त्याचा फरक जाणवत नाही. या सरोगसी

प्रकरणातून त्याची मुलाची, वारसाची इच्छा पूर्ण होते. अशा वेळी ज्या स्त्रीला ते मूल होते तिच्या मातृप्रेमाला मुकणारे ते मुल भविष्यात अनेक प्रसंगाना सामोरे जाते. त्या स्त्रीला लाभलेले ते मातृत्व जरी कायद्याच्या चौकटीत राहून होत असले, आर्थिक मजबुरीतून ती तो पर्याय स्वीकारीत असेल तरी 'मातृत्व भावनांचा' काहीच किंमत उरत नाही का ? ते मुल त्या स्त्री पासून वेगळे करताना तिला किती यातना, दुःख होत असेल याचा विचार समाज वा ते पुरुष करीत असतील कां ? त्या मुलाला ना समज असताना वेगळे केले जाते. पण जर त्या मुलाला त्या मातेचा लळा लागला तर ? त्याला वेगळे करणे, ही ते मुल आणि आई याना भावनात्मक दृष्ट्या जड जाते. ही वस्तुस्थिती आपल्याला कोठे तरी वैचारिक भोवऱ्यात दडपते. व पुढे काय असे प्रश्न निर्माण होतात. अनेकदा पुढे त्या स्त्रीबद्दल त्या पुरुषाला आकर्षण, प्रेम निर्माण होते व विवाहापर्यंत मजल जाते. पण अशी उदाहरणे फारच कमी. सरोगसी प्रकरणातून दोघांचीही इच्छा पूर्ण होते. पण पुढे होणारा **भावनांचा खेळ** खूपच दुःखदायक होऊ शकतो. आपले मुल, आपण जन्म दिले, आपल्या रक्तामासाचे विलग करताना तिला होणाऱ्या यातना आपण शब्दात पकडू शकत नाही. कायम ओढ त्या आईची मुलाकडे होणारच हे आपण कधीच ध्यानात घेत नाही. मातृत्व ही नैसर्गिक देणगी आहे. शरीराच्या पलीकडे जाऊन भावनात्मक दृष्टीने विचार होणे गरजेचे असते. पण कधी कधी निसर्गच श्रेष्ठ ठरतो तो असा की.......

बॅ.रावसाहेब देशमुख. एक मोठी आसामी, श्रीमंत, खानदानी म्हणून सातारा जिल्हयात मातब्बर घराणे सर्वांना परिचीत होते. मुंबई उच्च न्यायालयात उत्तम प्रॅक्टीस, पुढे महाराष्ट्र सहकारचे सरकारी वकील व पुढे ॲडव्होकेट जनरल या चढत्या आलेखाने आपले व्यावसायिक श्रेष्ठता सिध्द करणारे. पण धामधुमीत लग्न न केल्याने त्यांचे एकाकी जीवन असह्य झाले. त्यांच्या तरुणपणात शाळेत शिकत असताना, एका मुलीवर त्यांचे प्रेम बसले. अगदी हाडामासात भिनली ती पण, लग्नाची वेळ आली तेव्हा तिने कच खाल्ली. आईवडीलांच्या दबावात येवून तिने नकार दिला. तेव्हा राव साहेब दिल्लीला भारत सहकारचे वकील म्हणून काम करीत होते. एक क्रिमीनल क्षेत्रातला निष्णात वकील म्हणून त्यांचा बोलबाला होता. दहा वर्षाच्या प्रॅक्टीस मध्ये येवढ्या मोठ्या नावलौकीकामुळे अनेक स्थळे चालून आली पण त्यांनी ती नाकारली. आणि एकाकी जीवन जगू लागले. त्या मुलीच्या प्रेमाच्या जाळ्यात ते अजून अडकलेच होते. एक तर कामातून

वेळ नाही. शिवाय मित्रमंडळी कमी. निर्व्यसनी वकील साहेबाना त्यांच्या जगण्याचा वीट आला होता तो पंचेचाळीशीत आल्यावर. मग त्यांची नेमणूक महाराष्ट्र सरकारचे ॲडव्होकेट जनरल म्हणून झाली. आणि ते मुंबईला आले. तेव्हा ते पाली हिल वरच्या आपल्या बंगल्यात रहात होते. बांद्रा ते चर्चगेट रोजचा प्रवास ते सरकारी गाडीने करीत. जेवण हॉटेल मधून येई. घराला घरपण नव्हते. ना कोणाची मैत्री, पण अनेक वेळा वकील, वेळीअवेळी येत त्यातच त्यांचा वेळ जात असे. सकाळी आठ ते रात्री ११ पर्यंत ते व्यस्त असत.

सहकारने त्यांना असिस्टंट म्हणून वकिलांची फौज दिली होती. त्यात एक पारसी वकील बाईचा समावेश होता. फिरोज रुस्तम. त्या होत्या वयस्क. साठी ओलांडलेल्या. त्यांच्याकडे महा. सहकारच्या रेव्हेन्यू खात्याच्या केसेस होत्या. त्या कुटुंब वत्सल होत्या. केव्हा केव्हा एकादी केस अवघड असे अशावेळी त्या बान्द्र्याला त्यांच्या घरी येत. नुकतेच ते मुंबईला आल्याला एक महिना होऊन गेला होता. एका रविवारी त्या देशमुख यांच्याकडे आल्या. त्या प्रथमच त्याना भेटत होत्या. फिरोज बाईंचाही बोलबाला होता. अनेक अवघड केसेस त्यानी जिंकल्या होत्या. त्यांना हे माहिती पडले की देशमुख साहेब अविवाहीत आहेत. एकटे रहात आहेत. त्याना कौटूंबिक स्वास्थ नाही ते हल्ली फार चिडचीड करीत, बेफीकीर वागत. फिरोज बाईनी त्यांच्या या गोष्टीचा अभ्यास केला व एक दिवस हा विषय एका वेगळ्या वकिली अँगलने उकलण्याचा प्रयत्न केला. यापूर्वी कोणीही देशमुख यांच्या वैयक्तिक जीवनात ढवळा ढवळ केली नव्हती. फिरोज मॅडम ६० वर्षे वयाच्या वयस्कर कुटूंब वत्सल अशा होत्या. त्यांची दोन मुले त्यांच्याबरोबर वकीली करीत होते. त्याचे मिस्टर एका मोठ्या कंपनीचे डायरेक्टर होते. सुखी कुटूंब. त्या घरी आल्यावर देशमुखांनी त्यांचे स्वागत केले. थोडा वेळ त्या येऊन विसावल्या.....

देशमुख सर !

''हॉ ! बोला मॅडम !

''तुम्ही एकटेच रहाता या बंगल्यात ? कुटुंबीय कोठे आहेत ?

हो ! कां ?

''नाही! तुमचे कुटूंब कोठे आहे ? दिसत नाही कोणीये ?

''नाही ! मी लग्न केले नाही, मी अजून सिंगलच आहे.

''कां बरे !

''जाऊ द्या हो ! बोला, कामाचे बोला ! देशमुख.

आणि नंतर अर्धा तास मालाडच्या जमीनीच्या अफरातफरीच्या केसवर चर्चा झाली. एका कलेक्टरने केलेली हे भ्रष्टाचाराचे प्रकरण होते.

''ओके ! सर उद्या कोर्टात ही केस उभी राहणार आहे. तुम्हाला कळवीनं सारा वृत्तांत'' फिरोज.

आणि ती निघून गेली, तेव्हा रात्रीचे दोन वाजून गेले होते. आजच्या वकील फिरोज आणि त्यांच्या बोलण्याने ते कमालीचे अस्वस्थ झाले होते. आजवर आपण पत्नीच्या, मुलांच्या प्रेमाला वंचित झालो. आपल्या प्रेमाची नशा आणि त्या प्रेयसीला नाही विसरु शकलो. रात्री रात्री आपण त्यानंतर जागून काढल्या. पण शेवटी फलीत काय नशिबाला आले ते म्हणजे एकाकीपण. आज माझ्याकडे रग्गप पैसा आहे. सगळ्या सोई आहेत गाड्या, बंगले, खूप स्थावर जंगम, नावलौकीक पण हे एकाकीपण आज त्यांना नकोसे झाले होते. ती रात्र त्यांनी जागूनच काढली. माझी प्रेयसी संध्याने जर मला लग्नाला नकार दिला नसता तर... एक कुटूंब वत्सल म्हणून मी सुखात राहिलो असतो. पत्नी, मुले यांचा सहवास मिळाला असता. कौटुंबिक सुखाचा एक वेगळा अनुभव आपल्याला आला असता. जीवापाड प्रेम केले आपण आपल्या प्रेयसीवर. पण एका नकाराने मनातले सारे मनोरे कोसळून पडले. भुईसफाट झाले. आणि एक जीवंत मढे म्हणून आपण जगत आहोत हे एकाकी जीवन तिच्या आठवणींना उजाळा देत राहील. नाही गेली ती अजून माझ्या हृदयातून, मनातून. ती नशा अजून तशीच सतावते आहे मला. पण आज फिरोज वकील हीने त्यांच्या रोजच्या जगण्याला धक्का दिला होता. त्यामुळे त्यांचे विचारचक्र एका वेगळ्या दिशेने सरकताना त्यांना जाणवले आणि आपल्या आजवरच्या एकाकी जगण्यातून अनेक विचाराना कोंब फूटले.

दुसऱ्या दिवशी देशमुख सर हायकोर्टमधून लवकरच घरी आले. दूपारचे जेवणही त्यांनी घेतले नाही. संध्याकाळी जूनियर वकील सगळी मॅटर्स कशी ॲर्ग्यु झाली. याचे रिपोर्ट देत होते. काहीतरी फोन करुन, काहीनी मेलद्वारे, संध्याकाळी ७ वाजता वकील फिरोज यांचा फोन आला. त्या केसमध्ये जज्जनी उद्या तुम्हाला कोर्टात बोलाविले आहे. काही किचकट पॉईटवर चेंबरमध्ये भेटण्यासाठी – असा निरोप त्यांनी देशमुखाना दिला. या मॅटरमध्ये राज्य घटनेतील प्रोव्हीजन्सूचा संबंध येत असल्याने आणि उद्या ही केस हायकोर्ट

शिवाय सुप्रीम कोर्टातही जाऊ शकते म्हणून जजमेंटमध्ये बेसीक चूका नव्याने होऊ नयेत हा त्यामागचा उद्देश होता.

दुसऱ्या दिवशी देशमुख सकाळी लवकर उठून बोरीवली कोर्टात आले. कोर्ट सुरु होण्याआधि त्यानी जज्ज-जुन्नरकर यांची चेंबरमध्ये भेट घेतली. सोबत फिरोज मॅडम होत्या. व नंतर आज हायकोर्टात काही मॅटर नसल्याने बांद्र्याला निघाले. फिरोज वकील याही बांद्र्यालाच रहात होत्या. तेव्हा सोबत त्यांच्या गाडीतून निघाल्या.

गाडीत बसल्यावर कालच्या विषयाने उचल खाल्ली. फिरोज वकील हिनेच तो विषय काढला.

''देशमुख सर ! तुम्ही लग्न करा. तुमचे वयकाही फारसे झाले नाही. अजूनही तुमचा संसार फुलेल, मुले होतील. कौटूंबिक सुखाने पुढचे दिवस ओसंडून वहातील'' फिरोज.

पण देशमुखांनी त्यावर काहीच उत्तर दिले नाहीत. पण त्यांच्या विचार चक्राला मात्र गती आली होती. ते डोळे मिटून आपल्या गाडीत बसून होते. आता हा खुराक फिरोजने त्यांच्या डोक्याला दिला होता. आता वय होते ४५. येथून पुढे लग्न कधी करणार ? मुले कधी होणार ? आणि त्यांचे संगोपन उतार वयात कसे जमणार. उगाच जबाबदारी वाढवून अडचणींचा सामना करण्यापेक्षा हा विषयच ड्रॉप करावा. निदान आता आहे तो एकटेपणा आपल्याला साथ देत राहील. दुसरा एक विचार त्यांच्या मनाला स्पर्शून गेला. एखादा नोकर ठेवावा. जेवणाला बाई ठेवावी म्हणजे घराची स्वच्छता होईल घराला घरपण येईल. निदान घरचे चांगले खाणेतरी मिळेल. खानावळीतला डबा बंद होईल. खरेतर तेच जेवण जेवून त्याला कंटाळा आला होता. जगण्यात नाविन्य काहींच उरले नव्हते. याच विचारधारेत ते घरी येवून पोहोचलो. फिरोज पूर्वीच तिच्या घराजवळ उतरली.

रात्री झोपतानाही हे विचार त्यांची पाठ सोडायला तयार नव्हते. बरे, आपण सुखाचे जीवन जगत होतो. पण या फिरोज वकील बाईने सारी दिशाच बदलवली. कधीवाटे की तिचे काय चुकले. एक स्त्री जी प्रपंचात आहे, सुखी आहे, कुटूंब वत्सल आहे. ती दुसरा काय विचार करणार ? उलट फिरोज ने तो विचार त्यांच्या मनात पेरला तो खरेंतर वस्तुस्थितीला धरुन होता. त्यात त्यांचे काहीच चुकले नव्हते.

नुकताच पावसाळा सुरु झाला होता. देशमुखानी आपल्या बंगल्याची डागऊजी केली. सगळ्या अद्ययावत सोईनी बंगला सुसज्ज केला. आता त्या भागातला तो एक अद्ययावत सुंदर असा एक बंगला होता. देशमुखांचे वडीलही वकील होते. हा बंगला एका त्यांनी पारशाकडून विकत घेतला होता.

एक दिवस रविवारी फोर्बस ॲण्ड फोर्बस या कंपनीचे सी.ई.ओ.- विकास बापट भेटायला आले. तो रविवार होता. सकाळी १० वा. ते आले. देशमुखांचे ते वर्ग मित्र, समवयस्क, त्यांची ती कंपनी देशमुखांचे क्लाईंट होते. कायदेशीर सल्ला त्यांना ते देत असत. तेही याच भागात रहात होते. देशमुख मुंबईला आल्याचे त्याना समजले म्हणून ते भेटायला आले होते. बंगल्याची नव्याने केलेली डागडूजी त्याना आवडली. बंगला खूपच छान दिसत होता. बापटानी सगळा बंगला पूनः एकदा बघितला. त्याना वास्तुचे चांगले ज्ञान होते. ते स्वतः सिव्हील इंजिनीयर होते. आणि म्हणून काही गोष्टी त्यांना खटकल्या. त्यानी त्या त्यांना सांगितल्या.

''मि. देशमुख ! मी तुम्हाला काही गोष्टी सांगू इच्छितो. एक माझे मित्र म्हणून हा बंगला छान आहे ! पण या बंगल्यात काही न्युनता आहेत. या वास्तुच्या बांधकामातील त्रुटीमुळे तुम्हाला 'कौटुंबीक सुख' अजिबात मिळू शकत नाही. तुमचे वडील येथे रहात, तेही एकटे. काही जुजबी बदल करुन ही वास्तू परिपूर्ण करता येईल. हा माझा प्रेमाचा सल्ला आहे. शेवटी निर्णय तुम्हाला घ्यावे लागतील. वा कौटुंबिक स्वास्थ हवे असेल तर ही वास्तु सोडावी लागेल. शेवटी वास्तु तुमची आहे. निर्णय तुम्ही घ्यायचे आहेत''! बापट

बऱ्याच वर्षानी या त्यांच्या मित्राची भेट होत होती. अनेक वेळा त्यांचे येथे येणे झाले, पण अगत्यानी दिलेला सल्ला ऐकून देशमुखही विचार करु लागले. काय हरकत आहे बदल करायला.

''हे बघा, मि.देशमुख हा माझ्या अनुभवाचा सल्ला आहे. नको तर सोडून घ्या''! बापट.

''खरे आहे ! मी बरीच वर्षे या गोष्टीचा विचार करीत होतो. पण वेळ आली नव्हती. गेले पंधरा दिवस या माझ्या एकाकी जीवनाचा विचार करुन काही बदल करता येतील का ? या विचारांचा मार्ग शोधीत होतो. बरे झाले आपण आज आलात, ठीक ! काय हवे ते बदल करुन या आणि पाहू या जगण्याचा योग्य मार्ग सापडतो का ?'' देशमुख.

पडत्या फळाची आज्ञा म्हणून बापटानी काही बदल, अगदी जूजबी, सुचवले व पुढच्या पंधरा दिवसात ते करुनही घेतले. आता या बदलचा काय चमत्कार होतोय ? याची वाट देशमुख पहात होते. आणि बापटा नाही तो बदल तपासायचा हवा.

त्यांच्या चेंबरमध्ये जे चर्चगेटला होते. तेथेही काही बदल करुन घेतले. सरकारने त्याना एक 'पीए' म्हणून आय.एस.अधिकारी महिला म्हणून वाढविली. तिचे नाव उल्का महाशब्दे. ती सरकारच्यावतीने सगळ्या केसेसचे नियंत्रण, नव्या अडचणी व त्यावर देशमुखांचा सल्ला. असे ती मध्यस्थाच्या भूमिकेचे काम सांभाळीत होती. असेल ती ३८/४० वर्षाची. कायद्याचा अभ्यास केलेली, सरकारी नोकरीत येण्यापूर्वी मुंबई हायकोर्टात वकिली करणारी. तशी ती तरुण, महिला होती. मोहक व्यक्तिमत्व तसेच देशमुखही राजबिंडे हुशार कायद्याचे तज्ञ, बोलवाला असणारे तेव्हा ती त्याच्याजवळ आदबिने वागत असे. ती महाराष्ट्र सरकारच्या लॉ डिपॉर्टमेंटची डेप्युटी सेक्रेटरी होती. येथे येण्यापूर्वी तिने देशमुख यांच्या बद्दल सारी माहिती जमा केली. त्यांचा स्वभाव, कौटूंबिक माहिती व ते असे एकटे का रहातात याचीही माहीती घेतली.

त्यानंतर तीन महिने गेले. देशमुख 'मराठा आरक्षण' या केससाठी महिनाभर दिल्लीला ठाण मांडून होते. त्यांना महाराष्ट्र सरकारची भूमिका व घटनेतील तरतूदीचा अभ्यास करुन ही केस सुप्रिम कोर्टामध्ये लढायची होती. त्याना मदत व्हावी म्हणून त्यातही मुंबईहून दिल्लीला उल्काला बोलावून घेतले. त्यावेळी ते महाराष्ट्र भवन मध्ये रहात होते. व उल्काही तेथे एक सूट मध्ये रहात होती. त्या केसची सगळी तयारी देशमुख त्याच्या सुटमधेंच बसून करीत होते. उल्काच्या येथे येण्याने त्यांचें बरेचसे काम सोपे झाले होते. सकाळचा लंच व रात्रीचे डीनर ते उशीरा घेत. तो दोघे सोबतच झाले होते. या पंधरा दिवसाच्या काळात त्यांची एकमेकांशी ओळख वाढली. स्वभावाची ओळख झाली. ती केस सुप्रिम कोर्टात उभी रहायला अजून एक महिना होता. त्या पूर्वी, त्याना सर्व पेपरर्स बूक व जरुरी डॉक्युमेंट ची पूर्तता करायची होती. काम खूपच किचकट आणि दबाव तंत्रात अडकले होते. ही खरेतर देशमुख यांची परिक्षाच होती. महा. सरकारच्या मागच्या सरकारने त्याबाबत कायदे केली होते व त्यालाच घटनात्मक स्वरुप देवून काही फिर्यादांनी अटकाव करण्यासाठी सुप्रिम कोर्टात केस फाईल केली होती. मुंबई हायकोर्टाने महा. सरकारच्या फेवरमध्ये आपले निर्णय दिले होते.

आता ही केस सुप्रिम कोर्टात पाचजणांच्या खंडपिठापुढे येणार होती. तगडा विरोध होणार हे ग्रहीत धरुन देशमुखांची खरेतर ही सत्व परिक्षा होती. आजवर एकाही फेसर्मचे त्याना अपयश महित नव्हते. ही केस खरेतर त्याना चॅलेंज होते. महाराष्ट्र सरकारच्या अस्मितेचा प्रश्न होता. व तमाम मराठा समाजातील नव्या पिढ्याना यातून एक सोईस्कर मार्ग मिळणार होता. कारण मराठा समाजाची सरकारी खात्यातून होणारी पीछेहाट थांबवायची होती. IAS MPSC मार्गाने तरुणांचे सरकारमध्ये येणारा असा हा विषय तसा किचकट व अस्मितेचा होता. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र सरकारकडून येत्या वीस वर्षातील सगळे स्टॅटीस्टीक्स्ची माहिती मागविली होती. हे बॅक फूटवर प्रकरण स्वत: उल्का सांभाळीत होती, की देशमुखाची काहीही अडचण होऊ नये, यासाठी रात्र-दिवस ती या केसवर काम करीत होती. तिच्या कामाच्या पध्दतीवर स्वत: देशमुखही खूश होते.

कामा व्यतिरिक्त अनेक-वेळा त्यांचा गप्पांचा फडही रंगे. उल्का ही एक हुशार मुलगी होती. कामात तत्पर होती. तिच्या बद्दल देशमुखानाही आदर वाटत होता. तिच्या वैयक्तिक जीवना बद्दल त्यांना काहीही माहीती नव्हती. अगोदर ती जाणून घेण्याचा प्रश्नच नव्हता पण उल्काच्या बोलण्यातून काही गोष्टी पुढे आल्या.

आय.ए.एस. होण्याआधी ती मुंबई हायकोर्टात प्रॅक्टीस करीत होती. एक नायर नावाच्या आय.ए.एस. अधिकाऱ्याबरोबर तिचे प्रेम प्रकरण जमले व लग्न झाले. पण त्याचे तीन वर्षात निधन झाले. त्यानंतर गेली ८ वर्षे ती एकटीच रहात होती आणि एकाकी जीवन जगत होती. ती दिसायला खूप सुंदर, बांधेसुद, सुशील अशी स्त्री होती. तिच्या लग्नानंतर गरोदरपणात मोठी ट्रॅजीडी झाली आणि मुलाच्या प्रेमाला ती मुखली. हेही तिने देशमुखाना सांगितले.

''मग तुम्ही लग्न का केलेत नाही ! तुम्ही अजून तरुण आहात. तेव्हा....''! देशमुख

''नाही सर माझी परिस्थिती लग्न करण्याच्या उपयोगाची नाही ! तशी अनेक स्थळे आली, पण मी ते टाळले'' ! सरोज.

''अरे पण कां ? असे काय कारण ? देशमुख

''नाही सांगता येणार सर ! माझ्या मातृत्वाच्या झराच आटला आहे सर ! लग्न करुन काहीही उपयोग नाही !'' सरोज.

ओके ! म्हणत देशमुखानी तो विषय पुढे अधिक ताणला नाही. पण गेले

दोन महिन्यांच्या सहवासातून त्यांच्या मनात मात्र प्रेमाला पाझर फूटला होता. पण व्यक्त करता येत नव्हता. गेल्या महिना भराच्या त्यांच्या मनातल्या लग्नाच्या विचारांना पंख फुटले होते येवढे मात्र खरे.

आता सुप्रिम कोर्टाने हे मॅटर सलगपणे ५ जज्जेसच्या समोर तीन दिवसात संपविण्याचा इरादा कोर्टाने जाहीर केला. तशी नोटीस महा. सरकारला व त्यानाही आली. आता खरेतर ॲर्ग्युमेंटसच्या दृष्टीने सगळ्या पुराव्यांचा पुन्हा अभ्यास, नोटस् काढायला हवी होती. अवधी फक्त वेळ १ महिन्याचाच होता व आता हे प्रकरण पंधरा दिवस अगोदर संपवायला हवे होते. रात्री ११/११ वाजेपर्यंत ती दोघे सगळे काम उरकण्याच्या मागे लागले होते. उल्काची देशमुखाना खूपच मदत होत होती. महा. सरकारकडून सतत त्याना सूचना येत होत्या. या सगळ्या कामात उल्काच्या मदतीमुळे कामाचा निचरा होत होता. अर्धा दिवसाचा वेळ त्याला सुप्रिम कोर्टाने ॲर्ग्युमेंटस दिला होता व अर्धा दिवस समोरच्या ॲपीलन्टला नंतर निकाल येणार होता.

एका रविवारी दूपारी लंच केल्यावर उल्का आणि देशमुख गप्पा मारीत होते. उल्का  ही एक उत्तम लेखिका होती. तिचा एक कथा संग्रह ही प्रसिद्ध झाला होता. त्याची एक प्रत तिने आज देशमुखांना दिली. हा नवा फंडा त्याना खूपच आवडला. त्या दिवशी संध्याकाळच्या डिनर पूर्वी त्यानी तो वाचून काढला. तिच्या सेंसीटिव्ही भावनांचा ठसा प्रत्येक कथेत उमटलेला त्यांना जाणवला. या कथा संग्रहात बहुतांश कथा ह्या प्रेमाच्या ट्रॅजीडी आहेत असे त्याना जाणवले. म्हणजे ती प्रेमाची भुकेली आहे, पण परिस्थितीच्या भोवऱ्यात अडकली आहे. आपण अजूनही लग्न करावे या विचाराने ती प्रेरित आहे. हेही त्याना जाणवले. संध्याकाळी ती डिनरला त्यांच्या सुटमध्ये आली.

''उल्का ! छान, मातृत्व ! मला खूप आवडला तुमचा कथा संग्रह. त्यातून तुमच्या मनाचा कलही जाणवला !'' देशमुख

''ठीक ! माझ्या भावनांचे प्रतिबिंब प्रत्येक कथेत उमटली आहे. हे खरे... पण !'' उल्का.

''पण काय ? मॅडम मला प्रश्न पडला आहे, की या सगळ्या कथांचा शेवट नकारात्मक  का केला गेला ?'' देशमुख.

''सर ! खरे सांगू....'' उल्का

आणि ती थांबली... तीने डोळे मिटले आणि तिच्या डोळ्यातून अश्रुंच्या

धारा वाहू लागल्या. हे देशमुखाना जाणवले ते झटकन उठले, उल्का जवळ गेले आणि तिच्या डोळ्यातून वहाणाऱ्या अश्रुंचे ओहळ त्यानी पूसले....तिनेही त्याला विरोध केला नाही. मग तिच्या शेजारी बसून त्यांनी तिच्या पाठीवरुन हलकाच हात फिरवला... पुन्हा एक हुदका देऊन उल्काने आपले डोके देशमुखांच्या खाद्यांवर ठेवले.

''सॉरी !'' म्हणत बराच वेळ त्याच अवस्थेत ती दोघे होती. त्यानी तिला सोडले आणि आपल्या खुर्चित बसले. उल्का अजून डोळे मिटूनच होती. रात्रीचे १२ वाजून गेले होते. येवढ्यात.....''

''उल्का मॅडम ! तुम्ही आज बाजूच्या बेडरुमवर झोपा. हा फ्लॅट तसा मोठा आहे. मी एकच बेडरुम वापरतो. दुसरा बेडरुम बंद आहे. आज तुम्ही तेथे झोपा. अशा अवस्थेत तुम्ही तुमच्या रुमवर जाणे मला ठीक वाटत नाही !''

बराच वेळ ती काहीच बोलली नाही. मग १०/१५ मिनीटांनी उठून ती त्या दुसऱ्या बेडरुममध्ये जाऊन झोपली. दरवाजा तसाच सतार उघडा होता. देशमुखानाही आज रात्रभर झोप लागली नाही. सकाळी त्यांच्या पूर्वीच सरोज उठली. तीने कॉफी करुन आणली....

''सर ! उठा...कॉफी घेऊ या ! सरोज.

देशमुखाना सकाळी कधी झोप लागली हे त्यांना समजले ही नाही...

''छान ! झालेय कॉफी !

''ओके सर !

''आता कशी आहे तब्बेत !

ठीक ! ती

आणि ती आपल्या रुममध्ये निघून गेली व फ्रेश होऊन १०.३० वाजता देशमुखांच्या सुटवर आली. आज त्यांनी सगळे काम संपवले चार वाजताच...

''उल्का ! आज आपले काम मनासारखे संपले आहे. रहाता राहिला ॲर्ग्युमेंटसचा भाग मी त्याची तयारी पुढच्या चार पाच दिवसात करीत. गेले दिड दोन महिने आपण खपत आहोत. खूप कंटाळा आला आहे. तुम्ही तुमच्या लॉ डिर्पाटमेंट मधून गाडी मागवा आपण म. गांधींच्या आश्रमात जाऊन येवू. तेथे थोडा वेळ ध्यान करु व आज डिनर बाहेरच घेवू.

''ओके ठीक सर ! मी गाडी मागवते !'' उल्का

उल्काने गाडी मागविली आणि ते गांधी आश्रमात आले. अत्यंत पवित्र

वातावरणात देशमुखानी अर्धा तास ध्यान केले ती त्यांची विरंगुळ्याची आवडती जागा पण गेल्या दोन महिन्यात उसंत नव्हती. ते ध्यानाला बसल्यावर उल्का त्यांच्याकडे पहात राहिली व निवांतपणे बसून होती....

''कशी वाटली ही जागा !'' देशमुख

''छान ! खूप आवडली, येथे मन:शांती मिळते. मनातल्या विचाराना दूर करीत आपण एकाग्रचित्ताने आपल्या मनाशी एकाग्र होतो''! उल्का.

मग ताजमध्ये जाऊन दोघांनी डिनर घेतले. व महाराष्ट्र भवनमध्ये परत आले. रात्रीचे ११.३० वाजले होते. आजही सरोज दुसऱ्या बेडरुम मध्ये झोपली.

देशमुखांबरोबरचा येवढा प्रदिर्घ सहवास आता मैत्रित परिवर्तीत झाला होता. आता त्यांच्या स्वभावाचे सगळे पैलू तिच्या परिचयाचे झाले होते. दूरावा दूर होऊन एक वेगळीच जवळीक निर्माण झाली होती.

नंतरचा देशमुख पूरा दिवस वाचनात गर्क होते. उल्का तेथे होती, पण आज तिला कमालीचा कंटाळा आला होता.

''उल्का ! तुम्ही बेडरुममध्ये जाऊन पडा. मी माझे काम संपल्यावर तुम्हाला बोलाविन मग सोबतच कॉफी घेऊ ! प्लीज निघा ! देशमुख

''यस सर ! थँक्यू !

ती निघून गेली ५ वाजता काम संपल्यावर त्यांनी उल्काला उठवले. तीने कॉफी करुन आणली व त्यांनी जोडीने कॉफी घेतली. देशमुख खूष होते. केसचे काम समाधानकारक मार्गी लागले होते. आणि ते गप्पात रंगून गेले... येवढ्यात

''उल्का ! गेले अनेक दिवस मला एक प्रश्न भेडसावीत आहे. आपण दोघेशी सम दु:खी आहोत. तुमच्या मनाची सल मी ओळखली आहे. मोठ्या योगायोगाने आपण येथे आलो. ओळख वाढली एकमेकाला समजावून घेतले. गेले अनेक महिने मला एक गोष्ट सतावीत आहे. आज माझ्या मागे गडगंज संपत्ती आहे. पण याला कोणी वारस नाही. कामाच्या जंजाळात याचा विचार मी कधी केला नाही. एकाकी जीवन जगत राहिलो. हे एकाकी पण आज मला रात्र दिवस छळीत आहे !'' देशमुख.

''मग !'' उल्का.

थोडा वेळ कोणीही काही बोलले नाही. आणि मग देशमुख बोलले नाही, उल्काकडे न बघताच ते म्हणाले...

''आपण विवाह बध्द झालो तर ?''

''सर ! मलाही आवडेल ! पण...!''

''पण काय ?''

''सर लग्नापर्यंत ठीक. पण मला अपत्य होणार नाही. पहिल्या डिलीवरांच्या वेळी माझे युटॅरस फाटले म्हणून काढून टाकले. ते बाळही गेले. काय उपयोग लग्न करुन ? तुमची वारसाची इच्छा सर मी पूर्ण करु शकणार नाही !'' उल्का.

त्यांच्या नजरेला नजर न देता झटक्यात बोलून गेली... देशमुखही अस्वस्थ झाले...

''नो प्रॉब्लेम ! आपण यासाठी दुसरा पर्याय काढू पण लग्न करुया ! मला तुमचा होकार कळवा !'' देशमुख

''सर ! तुम्ही मला आवडता आहात. मी तयार आहे. तुम्हाला माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत ती साथ देईन. वैवाहिक जीवनाचे सुख मलाही हवे आहे. मीही एकाकी जगण्याला कंटाळले आहे सर, पण तुमच्या वारसाचे काय ?'' उल्का.

ते आपल्या जाग्यावरुन उठले. सरोज जवळ आले आणि त्यानी तिला मिठीत घेतले. तिनेही स्वतःला त्यांच्या मिठीत झोकुन दिले. दोन अस्वस्थ हृदये एकरुप होऊ पहात होती.

आज मात्र सरोज आपल्या सुटमध्ये निघून गेली. दोन अस्वस्थ जीव दोन धृवावर सताड उघडे ठेवून डोळे स्वप्न रंगवीत झोपी गेले.

सकाळी लवकर उठून सरोज देशमुखांच्या सुटमध्ये आली. कॉफी केली व कॉफी पिऊन की पुन: आपल्या सुटमध्ये गेली ती १०.३० वाजता परत आली. आज तिला समजते की मराठ्याना आरक्षण मिळू नये म्हणून ओ.बी.सी. व इतर ज्ञातीच्यावतीने अजून एक पीटीशन फाईल केले आहे. आणि त्यामुळे तारीख अजून एक महिना गेली आहे.

''मी हे पीटीशन वाचले. त्यात फारसी अडचण नाही. ओ.बी.सी. चे म्हणणे आहे की आमच्या रिसर्वेशनला धक्का न लावता निर्णय घ्या. पण घटनेतील तरतुदींचा अडसर आहे. उद्या जशी हाय-कोर्टाने फेवर मध्ये दिली. तशी घटनेत बदल झाल्या शिवाय त्याची अंमलबजावणी करता येणार नाही. हे अडचणीचे होते खरे. आता सरकार आपले आहे तेव्हा अशक्य काहीच नाही...!'' देशमुख

''बर सर !'' उल्का.

''अजून दोन महिन्याचा अवघी आहे. आपल्याला ओ.बी.सी. संदर्भात

किती लोकसंख्या किती याची माहिती देणाऱ्या स्टॅटीस्टीकचे पेपर्स गरजेचे आहेत. हे आपल्याला अल्पसंख्यांक आयोगाकडे मागावे लागतील. मिनिस्टर लेव्हलवरच ते शक्य आहे. कारण अल्पसंख्यांक आयोग विरोधी पक्षाचे प्यादे आहे. तेव्हा...!'' देशमुख.

''सर आपण उद्याच मुंबईला निघू या !'' उल्का.

आणि ती दोघे मुंबईला आली.

आपण होकार तर दिला लग्नाला...पण यातून काम साध्य होणार ? देशमुखांच्या गडगंज संपत्तीला वारस ? या विचाराने येथे आल्यावर तिला पछाडले होते. वारसासाठी दोन पर्याय आहेत. नात्यातला कोणी मुलगा दत्तक घेणे वा सरोगसीच्या माध्यमातून स्वतः पासूनचा वारसदार स्वीकारणे. पहिला पर्याय देशमुखाना कबूल नव्हताच. पण दुसऱ्या पर्याया संदर्भात त्यानी काहीच पर्याय निवडला नव्हता. म्हणजे तो कितपत सोयीचा वगैरे या कारणाने. त्यात अनंत अडचणी आहेत. यावर देशमुखानी इतर कोणी तरी स्त्रीशी विवाह करावा हाच पर्याय निवडायला हवा असे उल्काच्या मनाने पक्के केले व देशमुखांना योग्य वेळी हे सांगावे कसे ठरवून एका रविवारी ती देशमुखांच्या बंगल्यावर बांद्र्याला आली. त्याचवेळी सरोज वकील ही मालाडच्या प्रॉपर्टी ची ऑर्डर घेऊन आली होती. ती ऑर्डर जशी आपल्या फेवर मध्ये होती पण त्यात एक मेख होती. म्हणून सेकंड अपिल करावा लागणार होता. ते पुढच्या ८ दिवसात. त्यांनी ती ऑर्डर वाचली.

आज सरोज ही आली होती. तिला बघून उल्काही चक्रावली. ही बया नवी आहे. येथे कशासाठी ? कोण ही. देशमुखांची पाहुणी की कोण ?

''फिरोज मॅडम ! या बाई आय.ए.एस. अधिकारी असून, लॉ मिनिस्ट्रीमध्ये डेप्युटी सेक्रेटरी म्हणून आहेत !'' देशमुख.

''गुड मॅम !'' फिरोज, उल्काकडे पाहून.

आणि त्या निघून गेल्या.

आज देशमुखानाच कॉफी बनवून डिनर टेबलावर ठेवावी लागते. शिवाय बिस्कीटस् होती.

''चला कॉफी घेऊ या !'' देशमुख

आणि दोघेही डिनर रुम मध्ये पोहोचले. बसून कॉफी घेतानाच,

''सर ! मला तुम्हाला एक सूचना करायची आहे !

तुम्ही दुसऱ्या एकाद्या स्त्रीशी लग्न करा ! सरोज

''नाही ! ते शक्य नाही...देशमुख

''पण ! सर... तुमच्या वारसाचे काय ? उल्का.

''तो नंतरचा पर्याय...आता याच महिन्यात आपण नोंदणी पध्दतीने विवाह करु या ! दिल्लीला पून: जाण्यापूर्वी वारसा बघायचा विचार सध्या बाजूला ठेवूया. तुम्ही नाही म्हणू नका !'' देशमुख

''ओके ! माझी तयारी आहे !'' उल्का

आणि रितसर नोंदणी करुन विवाहात दोघेही अडकले. फिरोजला त्यानी विटनेस म्हणून बोलावले होते. ती ही चक्रावून गेली. आणि बापटही हजर होते. हा कसला परिणाम वास्तुतील बदलचा, कि प्रेमाचा ? काहीही असु दे, देशमुख आता वैवाहिक जीवनाचा आनंदात पूर्णपणे बुडून गेले होते.

विवाहानंतरही उल्काच्या मनात वारसाच्या बद्दलची देशमुखांची इच्छा मनाशी सतावीत होती. शेवटी सहा महिन्यानंतर त्या दोघांनी सरोगेट मातेचा पर्याय निवडायचा निर्णय घेतला. दोघांच्या सम्मतीने सगळ्या कायदेशीर बाजुंचा अभ्यास करुन प्रकरण मार्गी लावायचे ठरले त्यासाठी सरोगीसी स्त्रीचा शोध सुरु झाला. पण तीन महिने झाले तरी काही मार्गी लागेना. त्यासाठी न्यूज पेपर मध्ये जाहीरातही दिली गेली. तरीही कोणी पुढे आले नाही. देशमुख दामप्त्यांची चिंता काही संपत नव्हती.

उल्काच्या ॲबॉरशन नंतर महिनाभरातच तिचा नवरा गेला. या धक्क्यातून सावरायला तिला वर्ष दीड वर्ष गेली. तिचे तिच्या नवऱ्यावर नितांत प्रेम. घरच्यांच्या विरोधाला न जुमानता तिने लग्न केले. सहाजीकच माहेर दूरावले. सासरचा काहीही संपर्क नव्हता. अशा अवस्थेत दिवस काढणे भाग पडले. तिने IAS ची परिक्षा दिली आणि IAS झाली. मुंबईत तिची नेमणूक झाली. मुळात कायद्याची तज्ञ म्हणून तिला मिनिस्ट्री ऑफ लॉ मध्येच ठेवण्यात आले. आता प्रथमच पाच वर्षानंतर ती ऑफीस मधून बाहेर आली आणि देशमुखांची भेट झाली. लग्नाचा विचार तिने कधीच तिच्या केला नव्हता, त्याचे कारणही तसेच होते. ॲबॉर्शन दरम्यान तिच्या गर्भशियाला जखमा झाल्या. पून: जर मुलाला जन्म द्यायचा असेल तर जीवाला धोका असे डॉ. नी सांगितले. हेच मुळचे एक कारण तिने गेली अनेक वर्षे आपल्या लग्नाचा विचार मनाला शिवू दिला नाही.

आपल्या गर्भाशयाची अवस्था काय आहे हे तिने तपासून घेतलेच नव्हते.

काही अनर्थ होईल म्हणून तिने टाळले. लग्न म्हणजे मुल होणे आणि यातून जीवाला धोका म्हणून उल्काने लग्नाचा विचार मनाला शिवून दिला नव्हता.

पण देशमुख याची ओळख, मैत्रित्व प्रेम या मुळेतीने तो धोका स्वीकारायचे ठरवले. खरेतर मला मूल होणारच नाही या समजामुळे ती बिनधास्त होती व म्हणून देशमुखाना हवा असलेला 'वारस' प्रकरणातून मार्ग काढण्यासाठी तिचे प्रयत्न होते. तिचे वैवाहिक जीवन खूप सुखात चालले होते. त्यानी हनीमून लंडन मध्ये साजरा केला. व तेथून परतल्यावर पून: दिल्लीची वारी करावी लागली. सहाजिकच उल्का सोबत होतीच.

दिल्लीतील सुप्रिम कोर्टातील मराठा आरक्षणाचे मॅटर संपले. मराठ्यांच्या फॅवरमध्ये पण त्यांचे इम्पलीमेंटेशन पण अशक्य होते. त्याला भारत सरकारची परवानगी हवी होती. घटनेतील तरतूदींच्या अडचणीमुळे आता देशमुख मुंबईतच होते. उल्काने एका निवांत दिवशी त्याना 'वारसा' संबंधी आठवण करुन दिली.

एक दिवस सकाळीच रुईया कॉलेज चे प्राचार्य डॉ. शिरोडकर त्याना भेटायला आले. देशमुख त्या कॉलेजचे विद्यार्थी. त्यांनी डॉ.शिरोडकर यथोचित स्वागत केले. उल्काचेही तेच कॉलेज. प्राचार्य तिला ओळखत होते. आय.ए.एस. झाल्यावर रुईयाच्या माजी विद्यार्थी संघटनेने तिचा सत्कार केला होता. तेव्हा ते प्रमुख पाहुणे होते.

''सर ! आमच्या संस्थेचा व कॉलेजचाही ७५ वा वाढदिवस पुढच्या महिन्यात आहे. आपण या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व्हावे अशी आमची सगळ्यांची इच्छा आहे. तेव्हा हे निमंत्रण स्विकारावे. आपण उभयता व आमच्या कॉलेजचे माजी विद्यार्थी म्हणून आम्हाला आपला अभिमान आहे. !'' डॉ. शिरोडकर

''एस् सर ! व्हाय नॉट ! मी हे निमंत्रण स्वीकारतो आहे ! ''देशमुख''

ते गेल्यावर उल्काने पुन्हा: तो विषय काढला. आणि देशमुखाना तो टाळता आला नाही.

''पाहुया ! आपण आठवड्याभरात निर्णय घेऊ'' ! देश

''ठीक ! सरोज.

याच रुईच्या कार्यक्रमात देशमुखानी त्यांची पहिली प्रेयसी संध्या हिला पाहिले. चौकशी अंती त्याना समजले तिने एम.ए. करुन प्राध्यापिकेची नोकरी धरली. तिच्या पतीचे अकाळी निधन ॲक्सीडंटने झाले. तेव्हा पासून तिने लग्न

केले नव्हते. याच कार्यक्रमाच्या वेळी ती देशमुखाना भेटली. पण देशमुखानी तिला फारसी किंमत न देता टाळले. आता आपले लग्न झाले आहे. तेव्हा तिने ज्या पध्दतीने त्याना उडवले. त्यामुळे तिच्या बदल कमालीचा तिटकारा त्यांच्या मनात होता. खरेतर आता तो विषय संपला होता. इतिहास जमा झाला होता. हे खरे पण संध्या मात्र कमालीची दूरावली होती. तिला तिची चूक उमगली होती. पण तरीही देशमुखांची छबी मनातून पुसली गेली नसावी. ते बाहेर निघताना तिने देशमुखांजवळ क्षमा याचना केली पण तिच्याकडे न बघताच देशमुख आणि उल्का आपआपल्या गाडीतून निघून गेले. घरी गेल्यावर उल्काने देशमुखाना त्या स्त्रीबदल विचारले. प्रथम त्यानी तो विषय टाळला पण तेव्हा ती हेका सोडीना तेव्हा त्यानी तिला सारी हकीकत सांगितली.

उल्का कॉलेजमध्ये असताना प्रा.संध्या या उल्काच्या शिक्षिका होत्या. ती त्यांची विद्यार्थीनी म्हणून ओळखची होती. पण आता त्या विषया पासून बाजूला रहावे असा निर्णय तिने घेतला.

देशमुखानी एका एजन्सी मार्फत 'सरोगसी' मदर संदर्भात वर्तमान पत्रात जाहिरात दिली होती. त्या गोष्टीला आता पंधरा दिवस झाले होते. पण कोणाचाही होकार आला नाही व विचारणा केली नव्हती. देशमुखांना हा विषय एकदाच संपवायचा होता. कारण उल्कालाच या गोष्टीची घाई लागली होती. तिने सरोगसी मदरच्या वतीने येणारे मुल सांभाळण्याची मानसिक तयारी केली होती. ती तिची वैयक्तिक जबाबदारी तर होतीच. हा 'वारसाचा' विषय सोडला तर देशमुख उभयतांचा संसार दृष्ट लागावा असा होता. मुळात दोघेही सुशील, संस्कारीक व समजंस होते. खरेतर प्रेमाचा पूर वहात होता देशमुखांच्या घरी.

दोनच दिवसानी एजन्सीने त्याना बोलावले. आपल्या जाहीरातीला उत्तर म्हणून एक प्रपोझल आले आहे. त्यांची काहीही अट नाही. वय आहे ३२ वर्षे, पण नाव मात्र लिहिले नाही पण पत्ता, फोन नंबर आहेत. आपण जर आम्हाला परवानगी दिलीत तर आम्ही संपर्क करतो असे एजन्सीवाले म्हणाले.

''नको ! तुम्ही संपर्क करु नका / आम्हाला सगळे डिटेल द्या. आम्ही संपर्क करु त्या महिलेला ! देशमुख.

कामाच्या ओझ्या खाली देशमुख ती गोष्ट पार विसरुनही गेले, पण उल्काने या गोष्टीचा शोध घ्यायचे ठरवले. आणि तिला फोनवरून दादरच्या कोहिनूर हॉटेलात तो भेटीसाठी बोलविले. संध्याकाळी ६ वाजताची वेळ ठरली होती.

सरोज अर्धा तास अगोदरच हॉटेलात आली होती. तिने आपला नंबर त्या महिलेला दिला होता.

ती महिला दूसरी-तिसरी कोणी नसून प्रा. संध्याच होती. त्याना सरोज ओळखत होती पण ओळख न दाखवता तिने 'सरोगसी' चा विषय काढला.

"ताई ! आपण मला ही संधी द्या. मला माझ्या मनातून उतरायी व्हायचे आहे. माझी घोडचूक मला उमगली आहे. प्लीज, मला संधी द्या. त्यांच्या मुलाची आई होण्याची. माझे एक स्वप्न होते. पण सारेच भरकटले. मी जीवनात दु:खी आहे. माझे भोग मी भोगत आहे. त्यांचे प्रेम मी लाथाडले. त्यामुळेच मी लग्नानंतर सुखी होऊ शकले नाही. प्लीज, मला संधी द्या. आणि माझे जीवन मला सार्थकी लागल्याचे पुण्य माझ्या पदरात घाला." ! संध्या.

हा सगळा प्रकार ऐकून उल्का सर्दच झाली. माझ्या नवऱ्याची ही प्रेयसी. सरोगीट होऊ इच्छिते. याच कारणाने ती हादरुन गेली. समोरची कॉफी झटक्यात संपवून सरोज बाहेर आली. आणि आपल्या गाडीत बसत.

"मी तुम्हाला कळवते ! उल्का.

वाटेतल्या दादर-बांद्रा या प्रवासात तिचे विचारचक्र प्रचंड वेगाने फिरत होते. हा तिच्या वैवाहिक जीवनाला धोक्याचा इशारा होता. येवढे तिने जाणले. आणि आता या अवघड प्रश्नाला कसे सामोरे जायचे याचा ती विचार करीत घरी पोहोचली. यातले काहीही देशमुखाना माहिती नव्हते. हे लचांड शक्य तो दूर ठेवायचे. जगातली कोणतीही स्त्री ही सोडून चालेल या निर्णयाला ती आली होती. व तिच्या स्वत:च्या प्राकृतिक अपूर्णतेच्याविषयी ती विचार करीत होती. या द्विधा अवस्थेत ती सापडली होती. इकडे आड तिकडे विहीर असे उल्काला झाले होते. मला मुल होणार नाही. आणि या सरोगीट महिलेला झाले तर देशमुख कदाचित तिच्याकडे झुकतील व आपल्या सुखी संसाराला सुरुंग लागेल याच भितीने ती देशमुखांशी जराही बोलली नाही.

मे महिन्याची कोर्टाची रजा सुरु झाली. आज देशमुख घरीच होते. आता या १५ दिवसाच्या रजेत या 'सरोगसी' विषयाबद्दल विचार करायचा असे त्यांनी ठरवले होते.

"उल्का ! ते सरोगसी मदरच्या प्रपोझलचे काय झाले. आपल्या लग्नाला आता सहा महिने झाले. याबाबत आपण काहीतरी ठोस निर्णय घेता येतो का 'पहावे ! देशमुख

"हो ! नको मी दोन दिवसात सगळी माहिती आपल्या समोर ठेवते !" उल्का.

याच वेळी महा.सरकारचे पावसाळी अधिवेशन सुरु झाले होते. काही महत्वाचे विषय होम मिनीस्ट्रर कडे येत असत. तेव्हा त्याना तातडीचे लिगल ओपिनीयन हवे असते. म्हणून देशमुख पूरादिवस मंत्रालयात असत. त्यांच्यासाठी एक खास कॅबीन सरकारने तयार ठेवली होते. तेथे ते बसत असत. कधीकधी अधिवेशन रात्री ११ पर्यंत चाले व देशमुखांना घरी यायला वेळ होई. उल्काने मात्र १५ दिवसाची रजाच घेतली होती.

शनिवार, रविवार अधिवेशन बंद असे. आज रविवार होता. देशमुख घरीच होते.

"उल्का ! त्या सरोगसीचे काय झाले ? देशमुख.

"सांगते ! आपण संध्याकाळी निवांत बोलू या !" उल्का.

उल्काला प्रचंड टेंशन आले होते. त्या बाईची भेट घेतल्यापासून कारण... जसे की, जशी ते मूल आपल्या नवऱ्याचे होते. त्याचे त्याच्या आईकडे आकर्षण असेल. ते मूल मला 'आई' म्हणेल काय ? आणि भविष्यात त्याना सत्य माहीती झाल्यावर तो आपला आईकडे निघून जाईल. 'वारसाचा' प्रश्न ती पार विसरली होती. पण तिच्या मनातले वादळ आता काही शमायला तयार नव्हते. ती अस्वस्थ आहे हे देशमुखांच्या ध्यानात आले.

आज आपल्याला मुल झाले असते किंवा आपण त्या सक्षम अवस्थेत असते तर मी माझ्या मुलाची आई झाली असते. पण या 'वारस' चक्राने तिची झोप पार उडाली होती.

"उल्का ! तू आज खूपच अस्वस्थ आहेस, आपण याबाबत उद्या बोलू, आता झोपू या !" देशमुख.

हे टेन्शन तर होतेच पण गेले १० दिवस तिची तब्बेतही ठीकच नव्हती. अंगात उष्णता वाढली होती. उमासे येत होते. उलटी होईल असेही वाटत होते. म्हणूनच तिने १५ दिवसाची रजा टाकली होती.

"अहो ! सर माझी तब्बेत गेले १० दिवस ठीक नाही. काही वेगळीच लक्षणे दिसत आहेत. ते मला जाणवत आहे. आपण डॉ. कडे जाऊया कां ?" उल्का.

"उद्या ! सोमवार ! आपण डॉ. (Mrs.) नरीयाना बॉम्बे हॉस्पिटल मध्ये दुपारी जाऊन भेटू या आणि पूर्ण तपास करु या. आता तुला विश्रांतीची गरज

आहे. तेव्हा आता झोपू या !'' देशमुख.

आणि ती देशमुखांच्या कुशीत सामावली.

ती दोघे, डॉ. नरीयाना भेटले. त्यानी सरोजला तपासले.

''सर ! गुड न्यूज, तुम्ही आई बाप होणार !'' डॉ. नरीयानी

बस ! त्यांच्या या निश्कर्षाने उल्काला घाम फुटला. तिला तिच्या गर्भाशयांतील ऑपरेशनची आठवण झाली. खरेतर तिला आनंद बघायला हवा होता. पण प्रचंड टेंशन आले. ती आता खूपच अस्वस्थ झाली होती. डॉ. ती तिला समजावले.

''ठिक ! आपण गर्भाशयाची आताच सोनोग्राफी करु. मग तुमच्या शंकेला पूर्णविराम मिळेल. मी आहे आपण जराही घाबरण्याचे कारण नाही. मी काळजी घेईन. चला आपण सोनोग्राफी करु या !'' नरीयानी म्हणत त्यानी अर्धा तास सोनोग्राफीचा रिपोर्ट मिळविला.

''मॅडम ! काही घाबरण्यासारखे नाही ! मुळीच. आपले गर्भाशय छान आहे. फाटलेल्या भागाला टाके मारले आहेत. त्याची आता अडचण नाही. तुम्ही काळजी घ्या ! ओके, गुड लक''! नरीयानी.

सरोजचे टेंशन उतरले होते. पण पूर्णपणे नाही. ती दोघे घरी आली. उल्काला मात्र घरच्या कामाचा नको म्हणून त्यानी एक वयस्कर बाई जेवण व इतर कामासाठी ठेवली. ती वयस्कर बाई. प्रापंचिक होती. तिला तीन मुले झाली. होती तेव्हा ती नक्कीच उल्काची काळजी घेईल याची खात्री देशमुखांना होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी चहा पिताना उल्काने त्या 'सरोगेट' बाईचा विषय काढला.

''थांब ! घाई नको, तुझे बाळ माझा वारस होईल अशी मला खात्री आहे. हा सरोगसीचा विषय सध्या प्रलंबीत ठेव !'' देशमुख.

उल्काचे गर्भारपण रोज वाढतच होते. पण टेंशनने आत तिला बीपीचा त्रास होऊ लागला होता. औषधे चालू होती. ती सध्या पूर्णपणे आराम घेत होती. ऑफीसमधून तिने दोन वर्षाची रजा घेतली होती. आता मी स्वतःला वाचन, लिखाण यातच गुंतवून ठेवीत होती. पण तरीही ते 'सरोगेट' मदरचे भूत काही तिचा पिछा सोडायला तयार नव्हते. पण देशमुख मात्र विसरुन गेले होते. उल्काला दररोज त्याची आठवण होत होती. जर माझी सुरक्षित डिलेव्हरी झाली तर ठीक. मी माझ्या स्वतःच्या मुलाची आई होईन अन्यथा देशमुखाना दुसरा

पर्याय आपण निवडायला सांगू असे ती स्वत:ला समजावित होती.

सात महिने ठीक गेले पण आठव्या महिन्यात सरोजला त्रास होऊ लागला. पोटातला पिडं एकाएकी फिरायला बंद झाला. तिला तातडीने बॉम्बे हॉस्पिटल मध्ये ॲडमीट केले. डॉ. नरीयानी यानी तिला तपासले. प्रॉबलेम तसा सिरयिस नाही. पण कदाचित प्रि-मॅटरनीटी डिलेव्हरी होऊ शकते असे त्या म्हणाल्या. आणि डिलेव्हरी झाली. मुलगा झाला, त्याला महिना भर पेटीत ठेवावे लागणार होते. पण बाळ सुखरुप होते असे डॉ. म्हणाल्या.

उल्काला आनंद, दु:ख अशा दोलायमान अवस्थेत तो महिना गेला. दररोज ती मुलाला बघायला जात होती. देशमुखांच्या मनात काय चालले असेल ? या विचारांनी तिला टेंशन आले होते ते आपल्या कामात व्यस्त होते.

दोन महिन्यानंतर त्यानी मुलाला घरी आणले. एक नर्स ठेवावी. त्या मुलाने गोरेपण आईचे म्हणजे उल्काने घेतले होते. आता त्या मुलाचे नाव सुरज असे ठेवले. घरात नव्या पाहुण्याच्या आगमनाने घरचे वातावरण पार बदलून गेले होते. आणि सुरज कले-कलेने वाढत होता.

आणि एक दिवस उल्काला संध्याचा फोन आला.

''ताई ! तुमचा काय निर्णय झाला. मी पुढच्या महिन्यात कॉलेजमधून वॉलेन्टरी निवृत्ती घ्यायचा विचार करीत आहे. प्लीज ! मला कळवा हे पहा माझ्या अपेक्षा नाहीत. मला त्यांच्या ऋणातून मुक्त होऊ द्या !''संध्या.

''हो ! कळवते !'' उल्का.

उल्का समोर टू बी ऑर नॉट टू बी अशा विचारांचा दबाव होता. अडचणीचा डोंगर उभा होता. पण तिच्या सुखरुप बाळंपणामुळे हा प्रश्न सुटला होता. तिने सगळा प्रकार देशमुखाना सांगितला. त्याचेशी कुतुहल जागे झाले होते. आणि त्यातून संध्याच्या त्यागाची भावना, बिना मोबदला सरोगसी होण्याची तयारी आणि मला मुक्त होण्याचे विचार, देशमुखांच्या भुवया उंचावल्या. वीस वर्षापूर्वीची घटना जेव्हा तिने त्यांनी नकार दिला होता. या वीस वर्षात देशमुखांच्या आयुष्याची झालेली ससे होळपट तिला दिसली असणार. पण आता त्याचा उपयोग नव्हता. उल्काच्या त्यांच्या जीवनात येण्याने त्यांच्या जीवनात वेगळा मोड आला होता. उल्काला मुलगा झाला हाही एक चमत्कारच म्हणायला हवा. याला नशीबाचा खेळ म्हणावे नाहीतर काय ? माणूस ठरवतो एक आणि घडते वेगळेच. तिचा तरी दोष काय, वडीलांच्या आहारी गेलीसनी

माझ्या प्रेमाचा विचका झाला. पण तिच्याशी वैवाहिक जीवनाचे तीन तेरा झालेच की, तो होणार होता अशी समजूत देशमुखानी करुन घेतली. आता संध्याला उपरती आली. पण उशीरा तोवर माझा वारस आला आहे. तोही सरोजकडून हाही देवयोगच ना. ती माझ्या जीवनात येते काय, प्रेम जमते काय, मग विवाह आणि आम्हाला लाभलेले मातृत्व पितृत्व आणि 'सरोगसी' च्या पर्यायला फाटा हे काय तरी पूर्ण संचीत असावे. अशी समजूती त्यानी करुन घेतली.

त्यानी उल्काचा नंबर सरोज कडून घेतला. आणि तिला फोन केला. ती आनंदी झाली, पण क्षणभरच.

''धन्यवाद आपल्या दातृत्व वृत्तीबदल पण. आता उशीर झाला. 'सरोगीट' ची गरज नाही... धन्यवाद ! देशमुख.

आणि त्यानी फोन खाली ठेवला.

देशमुखांच्या वारसाचा प्रवास असा आडमार्गाने होईल असं ध्यानीमनी नव्हते त्यांच्या, पण झाला येवढे मात्र खरे !!

o–o–o

# अपघात

''मुलांनो ! काल तुम्ही 'आई' वर निबंध लिहिलात, छान, त्यात अरुणचा निबंध उजवा ठरला. आता उद्या तुम्ही 'माझे बाबा' या विषयाचा निबंध लिहून आणा.'' गुरुजी.

टेरव गावची जिल्हा परिषदेची शाळा. नव्यानेच आलेले साटम गुरुजी वर्षभरातच मुलांमध्ये खूप हवेहवेसे वाटणारे, प्रेमळ असे शिक्षक होते. ते हेडमास्तर म्हणून या शाळेत आल्यापासून शाळेला शिस्त तर लागलीच पण मुलेही अभ्यासात लक्ष घालू लागली होती. त्या शाळेतले सर्व शिक्षक साटम गुरुजींचा कित्ता गिरवीत होते.

अरुण हा सातवीचा विद्यार्थी. खूप हुशार, त्याच्याकडून शाळेला खूप अपेक्षा होत्या. या वर्षीच्या बोर्डाच्या परिक्षेत तो शाळेत अव्वल ठरेल व तालुक्यातही काढील. खूप आशा त्याच्याकडून साटम गुरुजींना होत्या. यावर्षी मार्चमध्ये त्यांची निवृत्ती होणार होती. गेल्या वर्षी त्यांना जिल्ह्यातले उत्तम शिक्षक म्हणून सन्मानाचा किताब मिळाला होता व यावर्षी महाराष्ट्र सरकारच्याही वतीने पुरस्कार मिळण्यासाठी जिल्ह्याधिकऱ्यांनी त्यांची शिफारस केली होती.

त्याच शाळेत अरुणची आई रंजना साने ही शिक्षीका होती. दोन वर्षांपूर्वी ती या शाळेत बदली होऊन आली होती. अर्थात अरुण हा तिचा एकमेव मुलगा तिच्या बरोबर या गावात आला व या शाळेत शिकत होता.

अरुण शाळेतून घरी आला. त्याने साटम गुरुजींनी सांगितलेला 'माझे बाबा' या विषयीच्या निबंधाबद्दल आईला सांगितले. या गावात अरुण आणि त्याची आई रंजना एका घरात रहात होती. त्या घराचे मालक मुंबईला रहात होते. घर खाली होते. सहाजिकच ती दोघे या घरात रहात होती. आजवर अरुणने आपल्या वडिलांना पाहिले नव्हते. कदाचित ते मृत झाले असतील असे वाटून अरुणने आपल्या आईला या बाबत काही विचारले नव्हते. पण आज हा विषय ऐरणीवर आला आणि रंजनाही चक्रावून गेली. आपल्याला अरुणने या विषयी कधीच विचारले नाही. आणि आपण त्याला काय उत्तर देणार ? ती गांगरून गेली होती. याला काय सांगावे त्याच्या वडीलांबाबत, हा तिढा तिला काल रात्रीपासून सतावीत होता.

ज्या घटनेने हे पोरगे तिच्या पदरात पडले तो प्रसंग तिला आज बऱ्याच वर्षांनी आठवला. तिचे वडील लहानपणीच गेले. तेव्हा ती राजापूरच्या एका खेड्यात होती. लहानसे घर. घरी कमालीची गरीबी. शेती होती, पण अनेक अडचणी, ना नांगर, ना बैल. सगळे आकाशच उजाड होते. त्यावेळी ती होती १६ वर्षाची. त्या काळी राजापूरचे 'काळी' धरण बांधण्याची सुरुवात होणार होती. गावातली बरीचशी पुरुष, बाया त्या धरणावर कामाला गेली. आई आणि रंजना यांनी जायचे ठरवले. त्यावेळी ती नऊवीला होती. मे महिना होता. शाळेला रजा होती. म्हणून त्या दोघींनी त्या धरणाच्या कामावर मजूर म्हणून गेल्या. ते ठिकाण गावापासून दूर होते ५/६ मैल असेल. म्हणून तेथे काम करणाऱ्यांची व्यवस्था कनातीत केली होती. रोज दिवसभर थकून कनातीत आल्यावर अंग टाकून द्यायचे हा परिपाठ. आई जाळ करायची दोन भाकऱ्या थापायची नी त्या रित्या पोटात ढकलून पुन्हा झोपायचे मढ्यासारखे. आणि उठायचे ते सकाळी. पुन्हा तेच रहाट गाडगे. पावसाळा तोंडावर आला होता. धरणाची कामे लवकरात लवकर संपवायचे होते नी त्या धरणाचा कॉन्ट्रक्टरही आजकाल आपल्या शेजारच्या कनातीत रहायला आला. सकाळपासून तो उभा राही तो संध्याकाळीच कनातीत जाई. मला त्याने पाहिल्यापासून त्याची नजर सतत माझ्यावर असे. तो बघून तिला हसे. मधाळ चेहऱ्याने. महिनाभर तो धरणावर ठाण मांडून होता.

एक दिवस अचानक वादळी पाऊस आला. सगळ्या कनाती पार भिजून गेल्या होत्या. आमचीही. काही हवेने उडून गेल्या. सगळे कामगार उघड्यावर पडले. आमची कंथान तशी ठीक होती कारण ती कातळावर होती. खाली चिखलाचे नांव नव्हते. आणि अचानक तो कॉन्ट्रक्टर शंभू आमच्या आमच्या कनातीत आला आसऱ्याला. नाही म्हणता येईना त्याला. जागा भरपूर होती. कारण आमच्या कनातीतल्या तीन बाया कालच गावाला गेल्या होत्या. तो येऊन बसला. तीच आई म्हणाली....

''साहेब आज जेऊनच जा ... मी भाकरी घालते चालेल ना ?'' आई.

''हो, का नाही !''

तो जेवेपर्यंत मी कंथानीच्या एका बाजूला उभी होती. तो सारखा मला बघत होता. त्याना वाटले कालच आम्ही परतलो असतो घरी तर बरे झाले असते. हे लचांड चूकले असते. तो जेवणाची ढेकर देत निघून गेला. त्यांच्या दिव्यातले

तेलही संपत आले होते. भराभर त्या दोघी जेवल्या. रंजना कंथानीतून बाहेर आली. बाहेर सारे सामसूम होते. आजूबाजला कोणतीच झोपडी नव्हती. मग ती आत गेली. मिट्ट काळोख होता, दिवा गेला. ती व आई झोपल्या. मग तासाभराने कोणीतरी आमच्या कंथानीत आल्याचा भास झाला. पण डोळ्यावर झोप होती आणि ती झोपली. सकाळी पहाते तर तिला रक्त स्त्राव झाला होता. ती घाबरली. गेल्याच आठवड्यात पाळी येऊन गेली होती. मग पुन्हा असे का ? ती गोंधळली. पण तिला काहीच समजले नाही. खरे तर तिच्यावर झोपेत असताना बलात्कार झाला होता. कोणी कसा याचा तिला मागमूसही नव्हता. त्या दोघी दुसऱ्या दिवशी सकाळी निघून गावाला गेल्या. दोन तीन दिवसात रक्त स्त्राव थांबला. असे का झाले हे ही विसरून गेली.

या महिन्यात तिची पाळी चुकली. होईल ४/५ दिवसात म्हणून तिने वाट पाहिली. पण त्यातही पुन्हा एक महिना होऊन गेला. जून मध्ये शाळा सुरू झाली ती आता १० वीला होती. पुन्हा दोन महिने गेले. पोट दिसू लागले. आणि त्या दोघी हादरून गेल्या. तालुक्याला डॉक्टरकडे जाऊन तपासणी केल्यावर समजले की तिला दिवस गेले आहेत. त्या दोघी कमालीच्या घाबरल्या. व त्यांनी पुढचा बभ्रा नको म्हणून गाव सोडले. तिच्या आईने तिला रत्नागिरी येथील अनाथाश्रमात सोडली नी ती पुन्हा गावाला आली.

रंजना त्या अनाथाश्रमातच बाळंत झाली. मुलगा झाला तो अरुण. ती व बाळ दोघेही अनाथाश्रमातच रहात होते. त्या लोकांनी तिला तेथेच नोकरी दिली. रंजनाने बाहेरून एस.एस.सी.ची परिक्षा दिली. मग डी.एड्. केले. अनाथाश्रमात राहून तिला जिल्हा परिषदेच्या शाळेत नोकरी मिळाली व तिने अनाथाश्रम सोडले. या नोकरीतले तिचे चौथे वर्ष होते. आणि यावर्षीच ती या शाळेत आली होती. कपाळाला ठसठशीत कुंकू आणि एक नकली मंगळसूत्र घालायला ती विसली नाही. आजवर अरुणने तिला त्याच्या वडीलांबद्दल विचारले नव्हते. आणि रंजनानेही ही गोष्ट गुलदस्त्यात ठेवली. मधल्या काळात तिची आई गेली. हे तिला नंतर समजले आणि तिने गाव सोडले कायमचे. आपले एक गांव होत हे ही ती विसरली पण तो 'अपघात' विसरु शकली नाही.

आज अरुणने वडीलांबद्दलच्या निबंधाच्या संदर्भाने त्याच्या बाबांबद्दल विचारल्यावर ती कमालीची अस्वस्थ झाली. अरुण तसा लहान. सहावीत शिकत होता. १२ वर्षाच्या मुलाला हा 'अपघात' कसा सांगणार ती पार

चक्रावून गेली होती.

"तूला उद्या सकाळी या निबंधाबाबत सांगेन आता झोप !'' रंजना.

म्हणत ती त्या अस्वस्थ अवस्थेत झोपण्याचे सोंग करून अंथरुणावर झोपली. याला काय सांगावे या कल्पनेने तिला रात्रभर झोप लागली नाही. सकाळी केव्हातरी डोळा लागला. दुसरा दिवस रविवार होता. शाळेला सुट्टी होती. काय सांगावे याला ? खरे सांगणे शक्य नव्हते. त्याला अनाथ आश्रमातून आणले हेही सांगणे कठीण. त्याचे वडील वारले हे ही सांगणे शक्य नव्हते. अरुणने आपल्या वडीलांबद्दलच्या निबंधात काय लिहावे. दुपार टळून गेली. उद्या निबंध द्यावाच लागणार. रंजनाने स्वतःला कामात व्यस्त केले, पण अरुण काही ऐकायला तयार नव्हता.

"आई ! सांग ना माझ्या बाबांबद्दल.'' अरुण.

सांगते ! म्हणत रंजनाने मन सावरले.

"हे बघ बाळ आपण अनाथाश्रमात होतो हो की नाही. मी तूला तेथून आणले आहे. तुझ्या आई-वडीलांनी तुला तेथे सोडून पोबारा केला. मग मी तुला वाढवले. तुझी आई झाले!''

मनावर दगड ठेवून तिने हा खोटे बोलण्याचा प्रयास केला नाईलाजाने. अरुणने तो निबंध रात्री लिहिला व सकाळी तो रंजनाबरोबर शाळेत गेला. आपण खोटे बोललो खरी वस्तुस्थिती सोडून याचे तिला मनोमन दुःख झाले पण तिला दुसरा पर्याय दिसत नव्हता. पोटच्या पोराला अनाथ ठरवणे तिच्या जीवावर आले होते. पण आज तरी या प्रकरणावर पडदा पडला होता.

ही आपली आई नाही. मग आपली आई कोण ? कोठे असेल ? त्यांनी मला तेथे का सोडले असेल ? आपण अनौरस तर नाही ना, अनैतिक संबंधातून आपला जन्म झाला नसेल ना ? आपल्या आईने आपल्याला का टाकावे ? तिला मी जड झालो होतो का ? असे अनेक प्रश्न अरुणच्या मनाला चाटून गेले. तो अबोल झाला होता, जेव्हा तो घरी परत आला, आज त्याने रंजनाला आई म्हणून हाक मारली नाही. ती चरकली. अस्वस्थ झाली. पण अरुण मात्र अस्वस्थ होता. त्याला आणि रंजनालाही रात्री झोप लागली नाही. अरुणच्या वागण्यात आज अमुलाग्र बदल झाला होता. हे त्याच्या वागण्यावरून रंजनालाल जाणवले. आज तिचा शाळेत जाण्याचा मुड नव्हता. तिने एक चिठ्ठी लिहून अरुणजवळ दिली हेडमास्तरांना देण्यासाठी. अरुणसाठी पोळी भाजी तिने

सोबत दिली, पण स्वत: त्या दिवशी ती उपाशी राहिली. पुरा दिवस विमनस्क अवस्थेत ती बिछान्यावर पडून होती. काय करावे आपण म्हणजे अरुणचा हा रुसवा जाईल. तो पूर्वीसारखा आनंदी होईल. त्याच्या मनातील संशयाची जळमटे दूर करता येतील. की अरुणला सगळे खरे सांगून टाकावे ?

संध्याकाळी अरूण घरी आला. तो रंजनाला म्हणाला –

''माझा निबंध अव्वल झाला.'' अरुण.

आता त्याने रंजनाला अरुणने आई म्हणायला टाकले होते. ती खूपच अस्वस्थ झाली. आणि काहीही न बोलता ती जेवणाच्या कामाला लागली. अरुण खूश होता खरा पण त्याने मला 'आई' म्हणणे का टाळावे याच विचारात ती अधिकच अस्वस्थ झाली.

''अरुण बाळ तुझे अभिनंदन हं !'' रंजना.

अरुणने काहीही न बोलता जेवण संपवले व तो झोपी गेला. त्याच्याकडे पहात पहात राहिली. आज अरुण शेजारी न झोपता तिने खाली अंथरुण टाकले आणि ती झोपली. पण आजची रात्रही तिने तळमळतच काढली. पण अरुण मात्र छान झोपला होता. रात्री ३ वाजता तिला जाग आली. पहाते तर अरुण कॉटवर बसला होता.

''अरुण ! बाळ तुला झोप नाही का येत !'' रंजना.

''नाही ! आईची आठवण येतेय !'' अरुण

रंजना उठली तिने अरुणला जवळ घेतले आणि थोपटत त्याला झोपवले आणि आपणही त्याच्या शेजारीच झोपली. सकाळपर्यंत अरुण छान झोपला होता तिच्या कुशीत. पण रंजना मात्र जागीच होती. अरुण उठला आणि त्याने आपली कामे आटोपली. अरुणही तयार झाला व ती दोघे शाळेत गेली.

संध्याकाळी शाळेतून ती दोघेही आली. जाताना वा येताना अरुण मात्र अबोल होता. का ? याचा उलगडा होत नव्हता. अरुणने सारे रंजनाने सांगितले ते खरे मानले का ? तसे असेल तरी ठीक. हे ही सत्य रंजनाने आपल्या मनात साठवून आवंडा गिळला होता. पण आणखी काही विपरीत होऊ नये. आता तो लहान होता. पुढे मोठा होईल. सत्य शोधण्याचा प्रयत्न करील. आणि पुन्हा अस्वस्थतेच्या भोवऱ्यात अडकेल. याचेच तिला दु:ख वाटत होते. ते पोटचे पोर पण एकाएकी त्या निबंधाच्या निमित्ताने अस्वस्थ झाले होते. त्या विचारांच्या दृष्टचक्रातून तो बाहेर यावा असे मनोमन तिला वाटत होते. पण अरूणच्या

मनातून तो विचार काही निघत नव्हता. उलट तो अधिकाधिक घट्ट होत गेला होता.

ती शाळेत गेली. ती दोन दिवसाच्या रजेनंतरच. त्यांच्या शाळेतले हेड मास्तर साटम गुरुजी रिटायर्ड होणार होते. आणि त्यांच्या जागी कांबळे नावाचे एक शिक्षक हेडमास्तर म्हणून येणार होते. साटम गुरुजी हे एक देव माणूस पण येणाऱ्या कांबळे गुरुजींबद्दल बऱ्याच गोष्टी शाळेतल्या शिक्षकांच्या कानावर आल्या. हि ब्याद येथे येऊन शाळेचे सगळे वातावरण नासवेल याची भिती सर्व शिक्षकांना आणि रंजनालाही होती. रंजना ही त्या शाळेत एकच स्त्री शिक्षिका होती. आणि येणाऱ्या कांबळे गुरुजींच्याकडून त्यांना खूप भीती वाटत होती. हा सरळ नजरेचा नाही.त्याची ख्याती संपूर्ण तालुक्यात आहे आणि त्यामुळेच रंजनाला असुरक्षित वाटत होते. त्या दिवशी शाळा सुटल्यावर ती घरी आली.

जाण्यापूर्वी साटम गुरुजींनी रंजनाला याबाबत सावध केले होते.

''तुम्ही सावध असा, या कांबळे गुरुजींपासून दूर रहा. शक्यतो जवळीक टाळा. आपली शाळा बरी आणि आपण बरे शिवाय मी सर्व शिक्षकांना याबाबत सांगितले आहेच ते ही तुमची काळजी घेतील. त्याच्या वाऱ्यालाही उभे राहू नका.'' साटम गुरुजी.

आणि त्यानंतर साटम गुरुजींना निवृत्तीनंतर निरोप समारंभ शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि त्या गावातले प्रतिष्ठित मंडळी यांच्या मार्फत दिला गेला.

जाता जाता साटम गुरुजी सर्व शिक्षकांना रंजना मॅडमची काळजी घ्या असे सांगितले आणि रंजना मॅडमनाही सांगितले की तुम्ही बारीक सारीक गोष्टी आपल्या शिक्षक बंधूना सांगायला विसरू नका असे सांगितले. आज त्या समारंभानंतर घरी आल्यानंतर रंजना अधिकच अस्वस्थ झाली. ती कांबळे गुरुजींच्या येण्याने.

दुसऱ्या दिवशी कांबळे गुरुजींचे आगमन झाले. पार बेरक्या माणूस. त्याची नजरच भिरभिरती. आणि हे शिक्षकांनी आणि रंजनानेही जाणले. कांबळे गुरुजींनी रंजनाला आपल्या ऑफीसमध्ये बोलवले....

''मॅडम, तुम्ही असे करा.... की मी खूप लांबून येत असल्यामुळे मला सातवीचा वर्ग घेता येणार नाही. तेव्हा तुम्हीच या वर्गातल्या विद्यार्थ्यांना शिकवा. शिवाय शाळेतल्या इतर कामामुळे मला वेळ मिळणार नाही. निदान

सायन्सचा विषय तरी तुम्ही त्या वर्गाला शिकवा.'' कांबळे गुरुजी.

''पण सर माझ्या वर्गाचा लोड खूप आहे. सहावीतून सातवीत जाणारी मुले त्यांना वेळ द्यावा लागेल. कृपा करून हे काम कोणातरी सिनिअर शिक्षकांना द्यावे.'' रंजना.

''ते नाही चालणार ! ही माझी ऑर्डर आहे. तुम्ही काम आजपासूनच सुरू करा.'' कांबळे गुरजी.

''पण सर त्या नवीन आहेत हे काम आम्हापैकी कोणा सिनिअर शिक्षकांना द्या आम्ही ते आनंदाने करु.'' एक शिक्षक.

''नो... नो... हि माझी ऑर्डर आहे. हे काम त्यांनीच करावे.''

हे ऐकून इतर सर्व शिक्षक चिडीचूप झाले. आता रंजना मॅडमचे काही खरे नाही. हे बेणे त्यांना त्रास देणार, जवळीक करण्याचा प्रयत्न करणार असा कयास सर्व शिक्षकांनी केला.

रंजना आपल्या घरी आली. प्रचंड टेन्शनमध्ये. अगोदरच या कांबळे मास्तराचे कारनामे तिने ऐकले होते आणि आता उद्यापासून तिला सातवीच्या वर्गावर शिकवणे भाग होते आणि कांबळे सरांची कॅबिन सातवीच्या वर्गाच्या बाजूला होती. आणि म्हणून उठल्या-बसल्या त्यांचे तेथे येणे होईल. रंजना कमालीची घाबरली होती. पण तरीही इतर शिक्षकांच्या मदतीने आपण निभावून जावू या अडचणीतून निभावून जाऊ याची रंजनाला खात्री होती.

''आई तू अशी चिंताग्रस्त का ?'' अरुण.

''काही नाही ! आता पुढच्या दोन दिवसात तू शिरगांवला हायस्कूलमध्ये पुढच्या अभ्यासासाठी जाणार आहेस. येथून जाण्याचा प्रवास तुला परवडणार नाही. मी तुला शाळेच्या हॉस्टेलमध्ये ठेवीन वा साटम गुरुजींच्या घरी.'' रंजना.

''तेच बरे होईल ! सर खूप चांगले आहेत. मला आवडेल तेथे रहायला त्यांच्या घरी.'' अरुण.

''पाहू या.'' रंजना.

त्या दिवशी रात्रभर तिला झोप लागली नाही. आपण आता एकटे आहोत. ज्या घरात आपण राहतो ते घरही अगदी खाली आहे. आजूबाजूला फारसा शेजार नाही. आणि हे खाली घर बघून कांबळी या घरात येण्यासाठी प्रयत्न करीन. मी विरोध करेनच काहीतरी कारण देऊन. असे तिला वाटले. पण दुसऱ्याच दिवशी कांबळी सरांनी तिला गाठले.

''रंजना मॅडम, तुम्ही रहाता त्या घरात तुमच्याशिवाय कोणी नसते. तेव्हा माझ्यासाठी त्या घरात एखादी खोली मिळेल का ?'' कांबळे गुरुजी.

''नाही नाही ते शक्य नाही. घर मालकाने मला सांगितले आहे की, कोणाही त्रयस्थ व्यक्तीला घरात घ्यायचे नाही. मी हे घर तुम्ही एक स्त्री आहात आणि लहान मुलाबरोबर एकट्या रहाता म्हणून दिले आहे. शिवाय ते पोलीस ऑफीसर आहेत तेव्हा ते शक्य नाही.'' रंजना.

कांबळे निघून गेले आणि रंजनाला हायसे वाटले.

दुसऱ्या दिवशी रंजना अरुणला घेऊन शिरगावच्या शाळेत गेली. सध्यातरी तात्पुरती व्यवस्था म्हणून तिने साटम गुरुजींच्या घरी अरुणची रहाण्याची व्यवस्था केली होती. आणि अरुणही आता खूष होता.

कांबळे गुरुजींची शिक्षकांना त्रास देण्याचा प्रकार भयानक होता. सगळे शिक्षक त्रस्त होते. त्यांनी ही गोष्ट साटम गुरुजींच्या कानावर घातली. साटम गुरुजींच्या ओळखी जिल्ह्याच्या शिक्षण विभागात होत्या आणि त्याचा वापर करून त्यांनी कांबळे सरांची बदली केली. त्यांना पार दूर राजापूरला पाठवण्यात आले. सगळ्यांना आनंद झाला. ह्या खविसाच्या तावडीतून सुटल्याचा. त्याने साटम गुरुजींचे आभार मानले.

अरुण साटम गुरुजींच्या घरी राहूनच आपले शिक्षण करीत होता. आता तो दहावी पास झाला आणि रंजनाच्या फिरत्या नोकरीमुळे आणि पुढे कॉलेज जवळपास नसल्यामुळे तिने त्याला रत्नागिरीच्या गोगटे कॉलेजमध्ये सायन्सला घातला व त्याची रहाण्याची व्यवस्था त्याच महाविद्यालयाच्या हॉस्टेलमध्ये केली. त्याचवेळी रंजनाची नेमणूक मालगुंडच्या शाळेत झाली होती. ती त्याला शनिवार रविवार घरी घेऊन येत असे. व सोमवारी अरूण रत्नागिरीला जात असे.

दोन वर्षांनी तो बारावी झाला. आणि त्याने मेडीकलला जाण्याचा निर्णय घेतला व त्याला एम.बी.बी.एस. ला पुण्याच्या ससुन हॉस्पिटलमध्ये ॲडमिशन मिळाले होते. पंधरा दिवसांनी तो घरी येत असे. त्याची पहिली दोन सेमिस्टर पार पाडली. व एक महिन्याची रजा पडली म्हणून तो रंजनाकडे आला. आता अरुण चांगला समंजस झाला होता. मागे घडल्या त्या सगळ्या गोष्टी त्याने विसरण्याचा प्रयत्न केला. पण मनाच्या पृष्ठभागावर उमटलेले ओरखडे त्याला पुसता येत नव्हते. रत्नागिरीला आल्यावर तो आपल्या महाविद्यालयात गेला. व घरी येताना

त्याच्या नजरेला गोगटे रोडवरची अनाथ आश्रमाची इमारत पडली आणि त्याला आपले बालपण आठवले. त्याला मोह झाला आपण उद्या या इमारतीत जावे म्हणून पण त्याने तो विचार झटकून टाकला.

आता रंजना रत्नागिरीच्याच कन्या शालेत शिक्षीका म्हणून आली होती. तिने रत्नागिरीतच स्वतंत्र घर घेतले होते. आता ती हेडमास्तर झाली होती. आणि पुढची ५/६ वर्षे तरी येथून बदली होणार नव्हती. आता दोन वर्षांनी अरूण डॉक्टर होईल. त्याला रत्नागिरीतच आपण दवाखाना घालून देऊ. आणि निवृत्ती घेऊन येथेच स्थायीक होऊ असा विचार तिने तिच्या मनात पक्का केला होता.

अरुण एम.बी.बी.एस. झाला आणि त्याची नेमणूक दोन वर्षाच्या एन्टरन्स ट्रेनिंगसाठी रत्नागिरीच्या सिव्हील हॉस्पीटलमध्ये झाली होती. त्याची ड्युटी शिफ्टमध्ये असे. कधी दिवसा तर कधी रात्री. असा सगळा दिनक्रम होता. तेथे त्याचे एक वर्ष निघून गेले . हॉस्टेल होते सगळ्या रेसीडेन्ट डॉक्टरांना पण तरी तो रंजना बरोबरच रहात होता. एक दिवस काय झाले माहीत नाही. पण अरुण अस्वस्थ झाला.

''माझा जन्म या सिव्हील हॉस्पिटमध्ये झाला होतांना ? अरुण.

''असावा ! मला माहिती नाही. पण असावा !'' रंजना.

''म्हणजे माझ्या जन्माची नोंद येथे झाली असणार !'' अरुण.

''असेल ही'' रंजना.

या त्याच्या विचाराने रंजनाची झोप उडाली. अरुण आता या हॉस्पीटलमध्ये काम करतो. हॉस्पीटलच्या जुन्या रेकॉर्डवरून त्याला हे सत्य सहज माहित होईल जे सत्य ती गेली अनेक वर्षे उराशी ठेवून जपत होती, त्याचा स्फोट तर होणार नाही ना ? या विचाराने ती हादरून गेली होती.

मध्ये एक आठवडा गेला. दिवाळीची रजा होती शाळेला. अरुणनेही आठवड्याची रजा घेतली होती. जेणेकरून त्याला रंजनाबरोबर घरीच दिवाळी साजरी करता येईल.

दिवाळीत रंजना आणि अरुण त्या अनाथाश्रमामध्ये मिठाई घेऊन गेली. हा तिचा दरवर्षीचा परिपाठ होता. पण यावेळी अरुण तिच्या बरोबर होता. तो परिसर पाहिला तेव्हा अरुणला आपले बालपण आठवले. रंजना डी.एड्. होईपर्यंत येथेच रहात होती. त्यावेळी अरुण पाच वर्षाचा होता. मग नोकरी

लागल्यावर ती व अरुण चिपळूणला आले. तिची पोस्टींग चिपळूणला शहरातल्या शाळेत झाली होती.

आपले बालपण या अनाथाश्रमात गेले याची सगळी घटना अरुणला आठवायला लागली व तो क्षणभर हरवून गेला. आणि आपल्या जन्माचा उलगडा करून घ्यावा असे त्याला प्रकर्षाने जाणवू लागले. आणि आपण हे गुपीत उलगडायचेच या विचाराने पुरता पछाडला होता. आपले आई–वडील कोण? हे त्याला शोधायचे होते. ती दोघे या आश्रमात रहात असतानाचा काही स्टाफ अजून तेथे होता. त्यांनी अरुणला ओळखले. आणि याच गोष्टीचा फायदा घ्यायचा असे त्याने ठरवले. मिठाई देऊन ती दोघे घरी गेली.

दुसऱ्या दिवशी अरुणची रजा संपली. म्हणून तो हॉस्पीटलला गेला. रत्नागिरीत कोरोनाने कहर केला होता. म्हणून त्याला आठवडाभर हॉस्पिटल बाहेर पडता आले नाही. त्याने ठरवले प्रथम या हॉस्पीटलच्या रेकॉर्डमध्ये आपल्या जन्म तारखेला झालेल्या मुलांचा शोध घेतला. अरुणने एका वॉर्डबॉयला सांगून त्या तारखेचे रजिस्टर मागवले. त्या दिवशी एकाच मुलाने जन्म दिला होता. मग त्याने हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झालेल्या पेशंटची यादी व भरलेले फॉर्म तपासले आणि तो हादरला.

रंजनाच त्या दिवशी बाळंत झाली होती. तिने त्या फॉर्मवर वडीलांचे नाव लिहिले नव्हते. ती जागा कोरी होती. म्हणजे रंजनाच, आपली आई आहे. एवढे सत्य त्याला उलगडले होते. हॉस्पिटलच्या रेकॉर्डवर 'अरुण' हे नाव होते म्हणजे आता हे कोडे पूर्णपणे उलगडले होते. त्याला खूप वाईट वाटले. गेली १२/१३ वर्षे आपण आपल्या आईचा शोध घेत होतो आपली आई सोबत असताना, तिला आई मानण्याची टाळाटाळ करीत होतो. तिला 'आई' म्हणायचे ही टाकले आपण. तो पूरता खजील झाला. आपण आपल्या आईवर अन्याय केला आहे. तिच्या मातृत्वाबद्दल शंका घेतली. त्या दिवशी हॉस्पीटलच्या डॉक्टर कॉर्टरसवर त्याला झोप येईना. दुसऱ्या दिवशी त्याने दोन दिवसांची रजा टाकून घर गाठले.

घरी येत असताना रिक्षात त्याच्या विचार चक्राला सुरुवात झाली. ज्याअर्थी आईने वडीलांचे नाव नाही लिहिले म्हणजे काहीतरी अपघाताने माझा गर्भ राहिला असेल आणि म्हणून ती अनाथआश्रमात आली एवढे त्याने जाणले. पण त्यात अधिकच न गुंतता तो घरी आला. त्यावेळी रंजना किचनमध्ये होती. तो रविवार होता. अरुण शनिवार, रविवार घरी येई. पण आज तो अचानक येईल

याची सुतरामही शक्यता नव्हती. कोरोनाच्या कामाच्या लोडमुळे.

"आई!" अरुण.

म्हणत त्याने रंजनाला मिठी मारली...

"मला क्षमा कर आई ! मी निर्दयी आहे ! तु माझी आई असताना मी उगाच आई ! आई ! म्हणून वास्तवापासून दूर गेलो होतो ! आई मला क्षमा कर!" अरुण.

हा प्रकार काय ? या अचानक अरुणच्या वागण्याने रंजना गडबडून गेली. तिच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या होत्या. अरुणही रडत होता.

"आई, मला क्षमा कर !" अरुण.

म्हणत त्याने तिला पुन्हा मिठी मारली व तिच्या पायाला हात लावला....

"आई !" मला क्षमा कर !" अरुण.

"अरुण ! तू माझाच मुलगा आहेस ! हे सत्य तुला समजले हे बरे झाले. गेली १०/१२ वर्षे माझ्या मनाला अनंत यातना झाल्या. तूला मी गमावले म्हणून" रंजना.

"माय लेक अजूनही मिठीत होते नी दोघांच्या डोळ्यांतू गंगा यमूना मुक्तपणे वहात होत्या.... आणि रंजनाचा ऊर 'आई' या उच्चाराने धन्य झाला होता.

"अरुण, आता हा शोध येथेच संपू दे ! तुझे वडील कोण ? हे शोधण्याच्या भानगडीत पडू नको. काण ते मलाही माहित नाही ! बाळ तो एक 'अपघात' होता. एवढेच !!!"

०-०-०

# परिवर्तन

ज्या शाळेत तो शिकला, त्याच शाळेत शिक्षक म्हणून त्याची नेमणूक झाली होती. शंतनु एक चांभार समाजातला अतिशय हुशार, चौकस बुद्धीचा तरुण होता. त्याच त्या पेढांबे गावच्या शाळेत आपल्या नोकरीवर रुजू होण्यासाठी निघाला होता.

त्याच पेढांबे गावच्या भराडे वाडीवर त्या चांभार समाजाची घरे दाटीवाटीने बांधून त्यांचे समाज बांधव रहात होते. त्या वाडीच्या दर्शनी भागातच त्यांचे एक छोटेसे घर होते. दोन पाकी त्या घरात वडील रंगा, आई आणि त्याच्या नंतरची चार भावंडे गुण्या गोविंदाने रहात होती. रंगाचा व्यवसाय चामड्याच्या चपला बनवून गावात विकणे व त्यातून मिळणाऱ्या पैश्यावर आपल्या कुटूंबाची गुजराण करणे. गेली अनेक शतके याच जागी रंगाचे पूर्वज आले आणि हाच व्यवसाय करून आपल्या पोटाची खळगी भरत होते. होती दहा बारा घरे त्या समाजाच्या लोकांची. शेती फारशी नव्हतीच. पण गावातून मिळणारे भात, नाचणी, वरी आणि भाताचे कणकुट यावरच त्यांची गुजराण होत होती. रंगाच्या अनेक पिढ्यान अर्ध पोटी राहून हा व्यवसाय करून पोट भरीत होते.

खरे तर स्वातंत्र्यापूर्वीचा काळ होता तो. या समाजाला 'अछुत' या सदरात मोडत असल्याने, अत्यंत निकृष्ठ वागणूक दिली जात होती. शिवा शिव तर शिगेला पोचली होती. जर कोणाला स्पर्श झाला तर लाखोली वाहिली जायची. आणि आंघोळ करूनच लोक घरात जात असत. रंगाला हा प्रश्न भेडसावीत असे. तो काही शिकलेला नव्हता, पण व्यवहार ज्ञान खूप चांगले होते. आता तर चामडे चिपळूणच्या बाजार पेढेत मिळत असे. पण त्याच्या मागच्या पिढीला चामडे मेलेल्या गुरांपासून, कमावून वापरावे लागे. रंगाने हा सगळा प्रकार त्याच्या बालपणात पाहिला होता. अगदी हिडीस प्रकार होता. एकाचे गुरु मेले तर त्याला मुठमाती देणे, अशीही कामे उच्चभ्रु समाजातले लोक करायला लावीत असत. वाईटवाटे पण. पापी पोटाची खळगी भरण्यासाठी अशी कामे करावी लागत. रंगाच्या वडीलांनी ही कामे करताना रंगाने पाहिले होते. पण त्याच्या वेळी ही व्यवस्था थोडी फार बदलली होती. पण अस्पृश्यतेची प्रथा चालू होती. जी पूर्वी होती तशीच. रंगाला या गोष्टीचा प्रचंड राग येई पण समाजाची मानसिकता बदलण्याची त्याची ताकत नव्हती. शिवाय त्या वाडीतले

सगळेच लोक जुन्या वळणाचे होते. त्यानाही ही चाकोरी तोडून बाहेर येण्याची हिम्मत होत नव्हती. कारण पापी पोट पिढ्यान पिढ्या हाच व्यवसाय करीत हा सगळा समाज पिचला जात होता. उच्चवर्णीयांच्या जोखडा खाली, परावलंबीत्वाचे ते जोखड झुगारण्याची ताकद कोणासच नव्हती. त्यांचा मुलगा शंतनुच्या मनात मात्र या समाजातील पिळवणूकीचे, अपमानाचे, निकृष्ठ जीवनाला छेद देता येऊ शकतो. असा विचार त्याच्या मनाला छेदून गेला. अनेकवेळा. पण मार्ग काही सापडत नव्हता.

त्या पेढांबे गावात एक जिल्हा परिषदेची शाळा होती सातवीपर्यंत. गावातला बहुतांश समाज मराठा व थोडी कुणब्यांची घरे. या कुणब्यांना राब-राब राबवले जाई. शेतात, घरात, नांगर धरणे, कुंपण करणे, पाणी आणणे, दळण-कांडण हीच कामे त्या समाजातल्या लोकांना करावी लागत होती. त्यांची जमिन नव्हती, जीवनभर राव लोकांच्या शेतात राबायचे, ते देतील ते खायचे बस. त्या समाजातही तशी फारशी जाग आलेली नव्हती. पण कसणाऱ्यांची जमीन हा कुळ कायदा आला. आणि थोडी फार जमीन त्यांच्या मालकीची झाली खरी तरी पण तुटपूंजी. तेव्हा मुलेही खूप होत पाच, सहा. या सगळ्या तोंडाना खायला घालायचे म्हणजे पुन्हा वेठबिगारीच की. पण रंगाच्या समाजातले लोक व्यवसायाने सशक्त होते. चांगली कारागिरी करीत दामही मना जोगते मिळू लागले आणि समाज परिवर्तनाची व त्या विचारांची थोडी फार जाणीव होऊ लागली. त्या काळी मुलानाही त्याच व्यवसायात दडपले जाई.

रंगालाही पाच मुले त्याला मोठा शंतनु. जात्याच हुशार. त्याच्या मागची चार भावंडे. शंतनुलाही रंगाने याच चपला बनवण्याच्या कामाच्या जोखडाला जुंपले होते. त्याच वाडीत आड मराठ्यांची ३/४ घरे होती. तिथली काही मुले. त्याच पेढांबच्या शाळेत जात असत; पण तेवढ्यात त्याच वाडीत ४ थी पर्यंतची शाळा नव्याने सुरू झाली आणि शंतनुला रंगाने शाळेत घातले. ततपूर्वी त्याच्या समाजातले एकही मुल शाळेत जात नव्हते. शंतनु हा पहिलाच मुलगा त्या शाळेत गेलेला. ती शाळा तरी कसली कोणाच्या तरी पडवीला भरणारी ७/८ मुलांची. शिकवायला एक शिक्षक यायचे. १ ली ते ४ थी ची मुले एकत्रच बसत. पण चांभार समाजाच्या शंतनुला मात्र वेगळे बसवले जाई. त्याचा स्पर्श कोणी करून घेत नसत. येरव्ही त्या वाडीतली सगळी मुले एकत्र खेळत. त्यांना विटाळ माहिती नव्हता. पण शाळेत गेल्यावर हा प्रकार शंतनुला प्रथम ध्यानात आला.

शंतनु जात्याच हुशार होता. बुद्धी तल्लख. त्याला व्यवसायाचे व व्यवहारी ज्ञान, थोडे फार असल्याने तो इतर मुलांपेक्षा हुशार होता. त्यावेळी तो. ९ वर्षाचा होता. आपल्या मुलाने खूप शिकावे, आपल्या समाजाचे नाव काढावे, सरकारी नोकरीत जावे व बापजाद्यांपासूनच्या पिळवणूकीतून त्यांच्या कुटूंबाला व पर्यायाने त्यांच्या सगळ्या समाजाला नवी दिशा द्यावी असे रंगाला वाटे. तसे गाव तालुक्यापासून लांब. पण चामड्याच्या खरेदीसाठी, हत्यारांसाठी तालूक्याच्या गावी चिपळूणला जावे लागे. दहा मैल चालत. प्रवासाची कोणतीही साधने नव्हती. तेव्हा चालणे हा एकच पर्याय होता.

शंतनु पहिलीच्या परिक्षेत वर्गात पहिला आला. आणि त्याचा ऊर भरून आला. रंगालाही आनंद झाला. रंगा अशिक्षीत. अंगठे बहाद्दर. पण आपला मुलगा शिकायला लागला याच गोष्टीचे त्याला खूप अप्रुप होते. शंतनुनंतरचा सोनु, त्या शाळेत जाऊ लागला. तोही हुशार, चौथी पास झाल्यावर शंतनु पेढांबे गावच्या प्राथमिक शाळेत जाऊ लागला. त्याच्या बरोबर इतर समाजाची दोन मुले होती. त्या काळात शिक्षक वर्ग एक तर ब्राम्हण उच्च वर्णीय मराठा समाजातले होते व ते जुन्या पिढीचे संस्कार घेऊन आलेले. भराडेच्या शाळेत जसे शंतनुला वेगळे बसवले जाई तोच प्रकार येथेही होता. उलट अति कडक शिवाशीव पाळणारी. शिक्षक त्याला स्पर्शही करीत नसत. लांबूनच त्याच्या वह्या तपासीत. आपल्या टेबलाजवळ त्यांना येऊनही देत नसत. अस्पृश्यता कडक पाळली जाई.

शंतनु त्या शाळेत त्याच्या वाडीतल्या दोन मुलांबरोबर आला. तो त्याचा त्या शाळेतला पहिला दिवस होता. त्यावेळी शंतनु ११ वर्षाचा होता. इतर मुलांपेक्षा त्याची समज खूपच चांगली होती. पहिल्याच दिवशी त्याची बसण्याची जागा शिक्षकांनी इतर मुलांपासून दूर ठेवली होती. तो एकटाच त्या जागेवर बसत असे. त्याला शिकवणारे मास्तर होते म्हसकर. तेही ब्राम्हण समाजातले, सोवळे ओवळे पाळणारे. या वर्षी शंतनु हा पहिलाच विद्यार्थी अस्पृश्य समाजातला आला आणि त्यांना प्रश्न पडला की याला बसवावे कोठे? तो चांभार समाजातला आहे, अस्पृश्य आहे ही बातमी इतर मुलांना समजली व शंतनु एकटा पडला. त्याच्याजवळ कोणी बोलेना. पाणी प्यायला ही व्यवस्था वेगळी. घरातून आणलेली भाकरी तो एकटाच खाई. या अशा अवस्थेत सहा महिने गेले. त्याकाळी कोणीही शिक्षक महार, चांभार समाजातले नव्हते, एक

जात ब्राह्मण, मराठ. म्हसकर मास्तरांना शंतनुचा हुशारीची चमक सहा महिन्याच्या परिक्षेत आली. तो पहिला आला. अक्षर मोत्यासारखे सुंदर, वळणदार, त्यामुळे म्हसकर गुरुजीही शंतनुच्या प्रेमात पडले. त्यांनी शंतनुला इतर मुलांसोबत बसविण्याचे ठरविले. मुलांनी हे घरी सांगितले व आपल्या घरी सांगताच सगळ्या मुलांचे पालक शाळेत हजर झाले. त्यांनी म्हसकर मास्तरांना खडसावले. आम्ही आमच्या मुलांना उद्यापासून या शाळेत पाठविणार नाही असा सज्जड दम त्यांना दिला. गावातले सगळे प्रतिष्ठित लोकही येऊन गेले आणि म्हसकर गुरुजींच्या या पुरोगामी विचारांना खिळ बसली. बिचारा शंतनु सर्व मुलांपासुन दूर बसू लागला. ते वर्ष पाचवीचे होते. तो पुन्हा वार्षिक परिक्षेत पहिला आला. म्हसकर गुरुजींचा तो तसा लाडका विद्यार्थी. ते पुरोगामी विचारांचे होते. पण गावातल्या जूनाट अशिक्षीत लोकांपुढे त्यांचे काही चालेना. ते वर्ष गेले. आता शंतनु सहावीत गेला होता. तो जात्याच हुशार होता. त्याकाळी एक वर्ग शिक्षक सगळे विषय त्या वर्गाला शिकवत असत. गणित हा विषय त्यांचा आवडता. त्यामुळे शंतनूलाही त्या विषयाची आवड निर्माण झाली. आणि तो १०० पैकी १०० मार्क मिळवू लागला. त्या मानाने इतर मुले तशी हुशार नव्हती जेमतेम पास होणारी.

शंतनु सातवीत गेला. डोंगरे नावाचे शिक्षक त्यांचे वर्ग शिक्षक होते. हुशार, श्रद्धाळू, पापभिरु तसेच पुरोगामी विचारांचे. तेही ब्राह्मण समाजातलेच होते. पण अस्पृश्यता न पाळणारे. त्यांचे वडील हे त्याकाळी काँग्रेस पक्षाचे सावंतवाडी तालुक्यातले मोठे कार्यकर्ते होते. तेव्हा सहाजिकच त्यांनाही घरी पुरोगामीत्वाचे बाळकडू मिळाले होते. त्यामुळे जातीयवादाचे भूत त्यांनी केव्हाच गाडून टाकले होते. डोंगरे गुरुजी गावात आले. त्यावर्षी शंतनु सहावीला होता. त्या वर्गावर वर्ग शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. अत्यंत साधु वृत्तीच्या डोंगरे गुरुजींनी पाहिले या गावात अजून अस्पृश्यता पाळली जात आहे. ही गोष्ट त्यांच्या मनाला लागली. त्यांनी ती बदलून टाकण्याचा पक्का विचार मनात केला. पण कर्मट गावकऱ्यामुळे फारसे यश आले नाही. पण शंतनुची आणि त्यांची गट्टी लौकरच जमली. शंतनु नेहमी पहिला येई. अनेक शंका कुशंकानी त्यांना सतावीत असे. अजूनही त्या शाळेत महार, चांभार मुलांना बसण्याची वेगळी व्यवस्था होती. ती तोडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पण गाववाले बाप निघाले आणि त्यांचे प्रयत्न निष्फळ निघाले.

परंतु शंतनुकडे त्यांचे मन ओढले जात होते. ते त्याला आपल्या घरी बोलावीत. तो अनेक वेळा गेलाही पण बिंग फुटले आणि ज्या घरात ते रहात होते त्या घर मालकाने त्याला घर खाली करण्यास सांगितले आणि त्यांनी चक्क महार वाड्यात जाऊन एक पडके घर आपल्यासाठी निवडले. आता मात्र शंतनुला तेथे जायला काहीच अडचण राहिली नाही. या गोष्टीचा परिणाम शंतनुच्या मनावर फार खोलवर झाला. ही जाती व्यवस्थेची घाणेरडी प्रथा ज्या मानवतेला कलंक लावणारी आहे. ही बदलायला हवी हा विचार शंतनुच्या मनात रुजला. आणि दिवसेंदिवस तो घट्ट होत गेला.

शंतनु सातवीला गेला आणि त्यावर्षी हेड गुरुजींनी त्यांचा वर्ग डोंगरे गुरुजींकडे दिला. तसा हट्ट त्यांनी धरला होता हेड गुरुजींकडे. त्यावेळी हेड गुरुजी होते कामेरकर गुरुजी. त्यानाही ही कटकट नको होती. एकतर ते दूर चिपळूणला रहात सायकलने येत. शिवाय सातवीच्या वर्गाची .... परिक्षेची चांगली करून घेणे त्यांना शक्य नव्हते. शिवाय डोंगरे गुरुजी अविवाहीत, सडा फटींग, ते रात्री मुलांची शिकवणी शाळेतच घेऊ लागले. हे कामेरकर गुरुजींच्या पथ्यावर पडले आणि आयताच तो वर्ग डोंगरे गुरुजींकडे आला. त्या वर्गात हुशार मुले होती. त्यांच्यावर चांगले संस्कार डोंगरे गुरुजींनी केलेच. पण चांगला अभ्यास करून घेतला. त्यावेळी ती सातवीची परिक्षा शिरगावच्या सेंटरला झाली. सर्व मुलांना घेऊन डोंगरे गुरुजी शिरगावच्या एका घरात भाड्याने राहिले. रात्री जागून मुलांकडून घोटून अभ्यास करून घेतला व सगळी म्हणजे वीसच्या वीस मुले पहिल्या वर्गात पास झाली. आश्चर्य म्हणजे शंतनु रत्नागिरी जिल्ह्यात पहिला आला. शाळेचे नाव तालुका, जिल्हा स्तरावर झाले. शंतनुचे अनेक सत्कार गावात, तालुक्यात झाले. शाळा बंद झाली तरी शंतनुचे डोंगरे गुरुजींकडे जाणे बंद झाले नाही. त्याच्या सारख्या हुशार मुलाचे शिक्षण ७ वी नंतर बंद होता कामा नाही. हा मुलगा मुळात हुशार आहे. तो पुढे आपल्या गावाचे आणि आपल्या ज्ञातीचे नाव अव्वल करू शकतो अशी खात्री डोंगरे गुरुजींना होती. त्यांनी पुढचे एस.एस.सी. पर्यंतचे शिक्षण त्याला देण्याचे मनात ठरवले. व त्याचे नाव शिरगावच्या शाळेत घातले व स्वत:ची बदलीही शिरगावला करून घेतली.

डोंगरे गुरुजींच्या संस्कारातून चांगले पैलू शंतनुच्या मनावर पाडून त्याला उत्तम शिक्षक बनवावे यासाठी ते स्वतः त्याला शिकवीत. त्याचा सगळा खर्च त्यानीच उचलला होता. शिवाय शिरगावला ते व शंतनु एकाच घरात रहात होते.

त्यामुळे चांगले पुरोगामी संस्कार शंतनुवरही झाले.

त्यात डोंगरे गुरुजींनी बाहेरून शिक्षण घेत. बी.ए.ची पदवी संपादन केली होती. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातून व पुढे त्यांनी बी.एड्.ला ॲडमिशन घेतले होते. त्या चार वर्षात शंतनु एस.एस.सी. झाला. तालुक्यात पहिला आला. घरची गरीबी. तेव्हा पुढचे शिक्षण न घेता आपण शिक्षक व्हावे हा विचार त्याच्या मनात पक्का बिंबवला होता डोंगरे गुरुजींनी. पण त्याच बरोबर पुढचे शिक्षण ही घ्यावे असाही विचार त्याच्या मनात पक्का बिंबवला, तो डोंगरे गुरुजींनीच.

शिक्षकाच्या नोकरीसाठी अर्ज केला व त्याला नोकरी जिल्हा परिषदेच्या प्रायमरी शाळेत मिळाली. आपण जी वाईट वागणू अनुभवली ती पूर्णपणे पुसून टाकायचीच. गावातल्या लोकांची मानसिकता बदलायची हे त्यांनी मनात पक्के ठरवले होते व त्यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांची पहिली नेमणूक पेढांबे शाळेत झाली. आपण येथे न थांबता आपल्या पुढच्या चारही भावंडांना शिकवायचे, शिक्षकच करायचे हा विचार मनात पक्का केला. त्यांच्या भावंडांनीही शंतनु सारखाच अनुभव त्या शाळेत घेतला होता. ही व्यवस्था बदलण्याचे आवाहन घेण्याची त्याची मानसिकता हळूहळू तयार होत होती.

शंतनुला त्याच्या शाळेत शिक्षक म्हणून नेमणूकीची ऑर्डर मिळाली शुक्रवारी आणि त्याला सोमवारी पेढांबच्या शाळेत जाऊन चार्ज घ्यायचा होता. पेढांबची शाळा सोडल्याला शंतनुला चार वर्षे होऊन गेली होती, पण त्याची भावंडे, त्याच्या वाडीतली अनेक मुले त्याच्यानंतर याच शाळेत जात होती. त्यांच्याकडून खरी हकीकत समजत होती. त्यानंतरच्या काळानंतर डोंगरे गुरुजींसारखे शिक्षक काही लाभले नाहीत. अधिक तर ब्राह्मण, उच्चभ्रू, मराठेच असत. मागासवर्गीय एक शिक्षक आले होते, पण शाळेतले, गावातले वातावरण पाहून त्यांनी पळ काढला. त्यांचे नाव संतोष तांबे. त्या मास्तरांना कोणीही जुमानेना. शाळेतले इतर शिक्षकही दूर दूरच रहात. ना बोलणे, हसणे, शेवटी ते वातावरणाला कंटाळले आणि बदली करून गेले. या सगळ्या गोष्टीची चीड शंतनुला होतीच. शेवटी आपण शिक्षक झालो आणि आपली पहिलीच पोस्टींग त्याच्याच शाळेत झाली. या गोष्टीचा त्याला आनंद झाला होता. आणि पाचवीपासून सातवी पर्यंतच्या शाळेतल्या सगळ्या घटनांची सारी हकीकत त्यांच्या डोळ्यासमोरून सरकू लागली. बहुजन समाजातल्या मुलांना मिळणारी

तुच्छतेची वागणूक यात शंतनूलाही झोंबली होती. ही व्यवस्था बदलण्याचे ठरवूनच त्याने शिक्षकी पेशा स्वीकारला होता. हे काम तसे सोपे नव्हते. शिवाय तो काळही पोषक वातावरणाचा नव्हता. पण एक जमेची बाजू होती ती म्हणजे तो पेढांबे गाव त्याचा होता. बस येवढ्या भांडवलावर त्याला ही लढाई जिंकायची होती. त्याने मनाची तयारी दोन दिवस विचार करूनच केली आणि सोमवारी तो त्या शाळेत आला.

ती शाळा ही जिल्हा परिषदेची पूर्ण प्राथमिक शिक्षण शाळा होती. पहिली ते सातवी. शंतनु जात्याच हुशार होता. गणित, सायन्स या विषयावर त्याचे प्रभुत्व होते. मराठी भाषेची अनेक पुस्तके त्याने शालेय जीवनात वाचली होती तेव्हा वाङ्मयाची उत्तम ओळख त्याला होती. त्याने ठरवले की आपण सातवीचा वर्ग मागायचा. कारण कोणीही शिक्षक ही ब्याद गळ्यात बांधून घ्यायला तयार नसायचे. याच शाळेत त्याच्या वाडीतली ४ मुले यावर्षी शाळेत होती ती सातवीलाच. त्यात त्यांचा एक धाकटा भाऊ होता. तेव्हा सातवीचाच वर्ग मागायचा हे त्याने ठरविले होते. पण नाही मिळाला तर सहावीचा. कारण ही मुले मोठी असतात. १५/१६ वर्षाची, समंजस असतात म्हणून.

तो आज सोमवारचा दिवस होता. सकाळी लवकर तो घरून निघाला सोबत वाडीतली चार मुले होती. आज चार वर्षांनी आपल्या शाळेत पहिले पाऊल टाकताना आणि तेही एक शिक्षक म्हणून त्याचा ऊर भरून आला होता. ती शाळा म्हणजे शाळेची इमारत होती तशीच होती. थोड्याफार सुधारणा झाल्या होत्या. मुलांना नळाचे पाणी मिळत होते. बसायला अजून मुले गोणपाटच वापरत असत. अजूनही महार, चांभार मुलांना वेगळी जागा होती. ती एकमेकांत फारशी मिसळत नसत. भेदभाव पूर्वीसारखाच होता. या सगळ्या मानसिकतेला बदलण्याचा विडाच शंतनुने उचलला. पार पुसून टाकायची जातीयवादाची पिलावळ, शीवाशीव आणि माणसामाणसातला उच्च निचतेचा भेदभाव. शाळेत प्रवेश करण्यापूर्वी तो थोडावेळ कंपाऊंडच्या बाहेर थांबला. त्याच्या वाडीतले विद्यार्थी मात्र पुढे निघून गेले होते. कारण शाळा भरण्याची घंटा घणघणत होती.

मोठ्या निर्धाराने आणि सकारात्मक विचाराने शंतनुने शाळेत प्रवेश केला. आज तो आनंदात होता. कारण नोकरीचा पहिला दिवस. शिवाय आवडती शिक्षकाची नोकरी. त्याच बरोबर घरच्या आर्थिक चणचणीवर उपाय ही नोकरी

होती. कारण गेली दोन वर्षे त्याच्या वडीलांना वयोमानापरत्वे त्यांच्या व्यवसायातून निवृत्ती घेतली होती. त्या काळात चामड्याच्या चपला बुट या शिवाय पर्याय नव्हता. तसे व्यवसायाला मरण नव्हते पण कष्टाची किम्मत नव्हती. शिवाय वेळेवर पैसेही लोक देत नसत. तुच्छतेची वागणूक. साऱ्या चांभार समाजाला उच्चभ्रूंनी वेठीला धरले होते. अडला हरी अशी त्याची अवस्था होती. या साऱ्या दुष्ट चक्रातून शंतनुला आपला समाज बाहेर काढायचा होता. वाडीतल्या सगळ्या मुलांना उत्तम शिक्षण देऊन, उत्तम नोकऱ्या, व्यवसायाची दिशा त्याला द्यायची होती. त्याच इराद्याने त्याने शाळेत प्रवेश केला.

तो प्रथम आला तो ७ वीच्या वर्गात शिकवणाऱ्या मुख्यध्यापकांकडे. त्यावेळी पानवलकर हे तसे वयस्क शिक्षक सातवीच्या वर्गाला शिकवत होते आणि दोन महिन्याने निवृत्त होणार होते.

"या ! पेढांबकर गुरुजी."

"नमस्कार सर !"

"मी तुमचीच वाट पहात होतो. तुमच्या नेमणूकीच्या ऑर्डर कालच शाळेत आली. मी चौकशी केली, तुम्ही याच शाळेचे माजी विद्यार्थी, हुशार ! बरे झाले तुमची नेमणूक तुमच्याच शाळेत झाली ते ! तुम्हाला येथे परकेपणा वाटणार नाही. तुम्ही ऑफीसमध्ये बसा ! मी हा तास संपवून येतोच !" हेड सर.

"हो ! सर मी तुमची वाट पाहतो ! नमस्कार !" शंतनु.

"मला थोडे पाणी मिळेल का ?" शंतनु

"सर ! बाहेर नळ आहे तेथे जाऊन प्या. हेड सरांशिवाय कोणालाही पाणी देण्याची येथे प्रथा नाही. शिवाय तुम्ही पेढांबकर ना !" शिपाई.

"मग ?" पेढांबकर

"तसे नाही! कृपया आपण बाहेरच्या नळावर जाऊन पाणी पीणे! नाहीतर हेडमास्तरांना माहिती पडले तर ते रागावतील ! ते खूप सोवळे ओवळे पाळतात !" शिपाई.

"ठिक !" पेढांबकर.

थोड्या वेळाने हेड सर आले.

"सर ! मला तहान लागली आहे ! तुमच्या तांब्यातले पाणी मी पिऊ शकतो का ?" शंतनु.

''नाही. मी तुम्हाला दुसरा तांब्या देतो. तुम्ही तो सदैव तुमच्या जवळच ठेवा! तुमच्या सेल्फमध्ये !'' हेड सर.

''मी बाहेर नळावर जाऊन पीतो.'' ! शंतनु.

''असे करा पेढांबकर गुरुजी ! मी निवृत्त होत आहे आणि म्हणून निवृत्ती पूर्वी दोन महिन्याच्या रजेवर जात आहे. तेव्ह आज पासूनच माझा ७ वीचा वर्ग तुम्ही सांभाळा. तुम्ही हुशार आहात. तुम्हाला काहीच कठीण नाही.''

''हो सर ! म्हणत शंतनु उठला व बाहेर येऊन प्रथम पाणी पिण्यासाठी नळावर आला.

''गुरुजी ! तुम्ही त्या नळावर पाणी प्या ! हा नळ ब्राह्मण मराठ्यांसाठी आहे! आपण मागास समाजातले तेव्हा त्या नळावर पाणी प्यायचे.'' शिपाई.

''का नाही !''

असे हेड मास्तर म्हणतात म्हणून !'' शिपाई.

त्या नळावर पाणी पिऊन शंतनु आपल्या सातवीच्या वर्गात आला. सगळी मुले उभी राहिली....

'नमस्ते गुरुजी !''

''बसा ! सगळी मुले बसली. त्यात शंतनुचा भाऊ 'संजय' होता. तो पार मागे एकटाच बसला होता. इतर मुलात आणि त्यांच्यात अंतर ठेवून. शंतनुने डोळे मिटले. ''म्हणजे हा प्रकार अजून चालू आहे तर !''

आज प्रथम शंतनुने 'गणित' शिकवण्यासाठी मुलांना पुस्तक काढण्यास सांगितले. अर्ध्या मुलांकडे पुस्तके नव्हती. क्षणभर तो थांबला. कां ? नसावीत पुस्तके या मुलांकडे. उद्या ही मुले ७ वी तून आठवीत जातील. अभ्यास केल्याशिवाय कशी होणार ही पास ?

खरे तर गावातली बहुतांश मुले गरीब शेतकऱ्यांची होती. वह्या पुस्तकांशिवाय यांचा अभ्यास कसा होणार. वर्गात इन मीन सतराच मुले होती. आणि अर्ध्यांजवळ साधी पुस्तकेही नसावीत ? कसे शिकवतात येथील शिक्षक? आणि पालक तरी असे खुळे कसे ? लक्ष नाही आपल्या मुलांकडे ?

आपल्या मनाशी काहीतरी ठरवून शंतनुने शिकवायला सुरुवात केली...

''मुलांनो ! तुम्हाला काल शिकवलेली गणिते येतात का ? समजली का तुम्हाला ?''

कोणीच काही बोलले नाही. मग त्याने काल शिकविलेल्या गणितांचाच

अभ्यास घेतला. मुले लक्ष देऊन ऐकत होती.

"गुरुजी ! इतके सोपे ! काल आम्हाला काहीच समजले नव्हते !" एक मुलगा.

शंतनुचा भाऊ मात्र फटाफट उत्तरे देत होता. त्याचा अभ्यास शंतनुच घरी करून घेई. इतर वर्गातली मुले हुशार होती. पण योग्य पद्धतीच्या शिकवणीशिवाय विषय कसा समजणार त्यांना.

पुढे झालेल्या तिमाही परिक्षेत मुलांची प्रगती चांगली झाली. त्यांचा अभ्यासात रस वाढला. आणि मुलांना शंतनु गुरुजी आवडू लागले. अभ्यासा व्यतिरिक्तही ते मुलांना इतर छान छान गोष्टी सांगत. अवांतर बाहेरचे ज्ञान त्यांना मिळू लागले. मुले खूष होती शंतनुवर.

शंतनुने आपल्या पहिल्या पगारातून सगळ्या मुलांना पुस्तके आणून वाटली. त्यामुळे मुले घरीही गृहपाठाबरोबर पुढचे वाचन करून येत असत. व अभ्यास छान होऊ लागला.

या आपल्या शाळेत येऊन शंतनुला दोन महिने होत आले. मधल्या वेळात तो आपला डब्बा आपल्या वर्गातल्या टेबलावर बसून खाई. पण एकाही शिक्षकाने त्याची दखल घेतली नव्हती. हेडमास्तरांचा निवृत्तीचा दिवस आला. सगळे शिक्षक उपस्थित होते. शंतनुही. पण एकही शिक्षकाने त्याची चौकशी केली नाही. पण आपल्या भाषणात हेड सर म्हणाले, "हे पेढांबकर गुरुजी याच शाळेचे विद्यार्थी आहेत. ते तुम्हाला भेटले असतीलच ! काही मदत लागली तर त्यांना सहकार्य करा. ते नवीन आहेत आणि माझा वर्गच ते सांभाळीत आहेत. शिक्षकांत कुजबूज सुरू झाली. पण पुन्हा सारे चिडीचूप. त्यांचा चार्ज एका वरीष्ठ शिक्षकाला देण्यात आला तातपुरता.

दूसऱ्या दिवशी नवे हेड टिचर शंतनुच्या वर्गाला आले, "पेढांबकर गुरुजी तुम्ही माझा पाचवीचा वर्ग आजपासून सांभाळा ! मी हा वर्ग सांभाळतो."

"नाही सर ! आम्हाला हेच सर हवे आहेत ! छान शिकवतात. तुम्ही नका येऊ." एक विद्यार्थी.

"गप्प बस रे !" हेड गुरुजी.

मग दुसरा, तिसरा सगळी मुले एक मुखाने म्हणाली – आम्हाला पेढांबकर गुरुजीच हवेत !

थोडा वेळ वर्गात शांतता पसरली. आणि फणकाऱ्याने ते गुरुजी वर्गातून

निघून गेले. या गोष्टीची खबर इतर शिक्षकांना लागली. जोरात चर्चा झाली. पण मुलांच्या विरुद्ध कोणी गेले नाही. शंतनुने त्या वर्गाला वर्षभर शिकवले. अधिक शिकवणी करून मुलांकडून खूप अभ्यास करून घेतला आणि शाळेचा निकाल १००% लागला. त्यांचा भाऊ तालुक्यात पहिला आला.

दोन दिवसानंतर ७ वीच्या पास विद्यार्थ्यांना निरोप देण्याचा समारंभ झाला. संजयलला विशेष पारितोषिक देऊन गावातील प्रतिष्ठीत गृहस्थ दौलतराव यांच्या हस्ते सत्कार केला. त्यावेळी दौलतरावांनी आपल्या भाषणात चार वर्षापूर्वी पेढांकर सर जिल्ह्यात पहिले आल्याचे सांगितले. पुढे ते म्हणाले, ''ते मागास समाजापैकी आहेत, पण शिक्षक हे गुरु आहेत. त्यांना जात पात काही नसावी. मी स्वत: जात पात मानीत नाही ! पेढांबकर गुरुजींनी आज इतिहास घडवला आहे. त्यांचे मी अभिनंदन करतो !'' त्यांनी आपले विचार मांडले. मुलांनी दोन मिनिटे टाळ्या वाजवल्या, पण शिक्षक चिडीचूप होते. मग पेढांबरकर गुरुजी उभे राहिले.

''मी या शाळेचा माजी विद्यार्थी. याच गावचा. मला ही शाळा व गाव याबद्दल नितांत आदर आहे. मी तेव्हाच ठरवले होते या शाळेत शिक्षक म्हणून यायचे. या शाळेतल्या बुरसट प्रथा बंद करायच्या. जातीय वाद, उच्च-निचतेच्या भावना मुलांच्या मनातून नाहीशी करायच्या. मुले ही फुले आहेत. देवाची लेकरे आहेत. ती उत्तम शिक्षीत नागरिक व्हावीत, उच्च पदाला जावीत यासाठी मी सतत प्रयत्न करीत राहिन. मी या शाळेत असेपर्यंत या शाळेचा निकाल १०० % लागेल असा मी प्रयत्न करत राहीन, कारण ही शाळा माझी आहे ! मी इथे परिवर्तन करण्यासाठी आलो आहे. मी इथे थांबणार नाही. मला हा तालुका बदलायचा आहे. मला शिक्षण अधिकारी व्हायचे आहे. यावर्षी मी बी.ए. पास केली आहे. आणि बी.एड्. करतो आहे. '' पेढांबकर.

मुलांनी टाळ्या वाजवून त्यांच्या भाषणाला चांगला प्रतिसाद दिला. नाईलाजाने इतर शिक्षकांनीही एकमेकांकडे पहात टाळ्या वाजवल्या. पण त्यात 'जीव' नव्हता.

कार्यक्रम संपला. त्यच्या वर्गातल्या सगळ्या मुलांनी त्यांच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला. सगळे शिक्षक चाट पडले. शिवाय दौलतरावांच्याही.

आजच्या कार्यक्रमाने शाळेतले सारेच वातावरण बदलले होते. इतर शिक्षक पेढांबर गुरुजींशी प्रेमाने, सलोख्याने वागू लागले होते. पेढांबकरांच्या ध्येयाची

दिशा ऐकून सगळे शिक्षक चाट पडले. हे पाणी काही वेगळेच आहे. याची जाणीव त्यांना पेढांबकरांनी करून दिली.

पुढच्याच वर्षी शंतनुने बी.एड. केले व एम.पी.एस.सी.च्या अभ्यासाला लागले. परिक्षा झाली ते पास झाले चांगल्या मार्कांने, महाराष्ट्रात दहावे आले आणि त्यांची पोस्टींग रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेत शिक्षण अधिकारी म्हणून झाली. पुढे ते आपल्या नोकरीवर निघून गेले.

त्यांना त्या गावातील लोकांनी दणदणीत सेंड ऑफ दिला व खूप भाषणे केली. त्यात तानाजीराव, माधवराव, दौलतराव यांनी त्यांना शुभेच्छा देऊन आपल्या शाळेकडे लक्ष ठेवा असा सल्लाही दिला.

त्या निरोपाला उत्तर देतांना पेढांबकर गुरुजी म्हणाले, ''मी याच शाळेचा, गावचा सदैव ऋणी राहिन. कारण हा गाव, ही शाळा माझी आहे. खूप काही मी या शाळेत शिकलो. चांगल्या गोष्टी तसेच वाईट प्रथाही अनुभवल्या. त्या साऱ्या पुसून टाकण्यासाठी मी विडा उचलला आहे. महार, चांभार मुलांना दिली जाणारी या शाळेतील वागणूक लांच्छनास्पद आहे. मी उद्याचा शिक्षण अधिकारी म्हणून सांगतो उद्यापासून ही प्रथा बंद करा. जात पात शिवाशीव त्यांना या शाळेच्या कंपाऊंडच्या बाहेर ठेवा. शिक्षकांनी मुलांवर चांगले संस्कार करावेत.'' शंतनु.

आणि दुसऱ्या दिवशी त्यांनी रत्नागिरीला जाऊन आपल्या नोकरीचा चार्ज घेतला. आपल्या केबिनमध्ये बसून समाज बदलता येणार नाही म्हणू त्यांनी जिल्ह्यातल्या शाळांना भेटी दिल्या व उत्तम मार्गदर्शन केले. त्यामुळे पुढच्या दोन वर्षात सगळ्या जिल्ह्यातून भेदभाव समुळ नष्ट झाला.

शंतनुने आपल्या घरातल्या चारही भाऊना उच्च शिक्षीत केले. तिघेजण शिक्षक झाले तर एक भाऊ सेक्रेटरी म्हणून आय.ए.एस. परिक्षा पास करून उच्च पदाला गेला. त्यांनी त्यांच्या वाडीतील १७ मुलांना शिक्षक केले. कारण शिक्षकच समाज अमुलाग्र बदलू शकतात यासाठी.

शिवाय आपल्या दोन्ही मुलांना डॉक्टर केले. पहा माणसात जिद्द असेल ना आणि उच्च ध्येयाची ओढ असेल तर समाजात परिवर्तन कठीण नसते. आणि तेच शंतनुने सिद्ध केले. महाराष्ट्र सरकारकडून त्यांना अनेक पुरस्कार दिले गेले व त्यांच्या दूरदृष्टीचा सन्मान केला गेला हे सारे परिवर्तन घडले ते त्यांच्या जिद्दीने, चिकाटी व ध्येयासाठीच्या धडपडीने.

०–०–०

# असा मी काय गुन्हा केला !

''गंगे ! तूला अकरा संपून बाराव सुरू झालयं ! तु आता लहान नाहीस ! समद समजायला हवं तुला ! उद्या तू बाई होशील.... आणि !'' आई.

''बाई होशील म्हणजे ? मी आहेच बाई ! अजून काय होणार हाय ? तुला काय म्हणायचं हाय ?'' गंगु.

''समजल तुला... येळ आली की !'' आई

आणि राजी आपल्या कामाला शेतात गेली. पोरीच आता वय झालयं. आता या वर्षी ते होणार आणि गोंधळ नको व्हायला. पण शाळेत जाणारी पोरी आता सातवीत हाय ! मी कसं समाजवून सांगायच हिला ? अशा विचारांच्या तंद्रीत राजी केव्हा शेतात आली हे तिला समजले नाही. रामु तिची वाट पहात होता. भाकरी खायची वेळ टळून गेली होती. आताशा राजीला रात्री झोप पण लागत नव्हती. त्या काळजीमुळे. हिला आता जलम येणार नी पहिल्या वेळी पोरगी पार घाबरून जाईल. जर घरी झाली तर ठीक पण शाळेत झाली तर ? कसं सांगावं हिला. आणि राजीचा जीव घाबरा-गुबरा झाला.

रामुला भाकरी देऊन ती घरी परतली. पण येताना वाटेत याच विचारांनी ती पुरती गांगरून गेली होती. घरी पाऊल ठेवले. गंगी अभ्यास करीत होती ओट्यावर. तो दिवस रविवार होता. शाळेला रजा होती. एक आठवडाच होऊन गेला होता. कां कोण जाणे राजीला गंगीच्या मास्तरणीची आठवण झाली आणि तरा तरा ती तिच्या घरी गेली. शेळके बाई नव्यानेच शाळेत आल्या होत्या. त्या एकट्याच बाई होत्या त्या शाळेत आणि गंगीच्या वर्ग शिक्षीका.

''नमस्कार बाई ! मी राजी. गंगीची आई. तुमच्या वर्गात हाय न्हव ती ! बाई काम हाय, तवा बोलू का ?'' राजी.

''बोला की ! कसलही आनमान न ठेवता. सार काही सांगा? '' शेळके बाई.

''तसं काही न्हाई ! पण आहे, तसं हायतेच अडचणीच ! कसं सांगणार कळत नाही बाई. '' राजी.

''माझी पोर गंगी आता १२ वं चालू हाय तिला ! तुम्ही बी बाई हायसा ! समद तुम्हाला कळायला हवयं !'' राजी.

''अहो काय ते बोला तर ?'' शेळके बाई.

"तिला जलम येईल कवा बी !" राजी.

"मग ! मी काय करू ? आहो जलम म्हणजे काय? आम्ही शहरात राहणारी कसं कळणार 'जलम' म्हणजे ?" शेळके.

"आता बाई कसं सांगाव ह्यांना ?" राजी

आणि राजी थोडा वेळ गप्पच बसली विचारांच्या चक्रात पार बुडून गेली ती.

"अहो ! बाई काय तुमचे नाव म्हणालात" शेळके बाई"

"राजी ! मी गंगीची आई !" राजी.

"फुड काय बोलणार मी ? मला नाही सांगता येणार ! बाई तुम्ही बाईना, मग तुम्ही कोनाड्यात बसता का ?" राजी.

"म्हणजे ? बाई हे तर खरचं, पण कोनाडा कसला?" शेळके.

शेळकेबाई ही शहरातून आलेल्या मोठ्य घरंदाज, श्रीमंत, गावातून स्कूटरने यायच्या त्या शाळेत. कपडे टकाटक. शहरात हा प्रश्न त्यांना कधी जाणवतच नाही. पण खेडे गावतल्या चालीरीती वेगळ्या. वयात येताना होणारे शारीरिक बदलाची माहिती शाळा आणि आई घरी सांगत असे. पण राजीची गंगी एकच मुलगी. घर तसं अशिक्षीतच. पण पोरगी हुशार. पुढे शिकेल. नांव काढील आई-बापाचं. म्हणून शाळेत घातली. घरची गरीबी होतीच. पण हे असे अडाणीपण. कसं सांगावं पोरीला ? जनम येतो तो. राजीने डोळे गपकन मिटले.

"बाई ! तुम्ही कोनाड्यात बसता, महिन्यातून ३/४ दिवस ?" राजी.

"म्हणजे काय ?" शेळके बाई.

"ते आता कसं सांगू तुम्हाला ! तुम्ही ११/१२ वर्षाच्या होतात ना तवा ? रात्री तवा काय झाले ?

राजी पार हबकून गेली होती ती तशीच शेळके बाईंच्या घरून बाहेर बसली. घरी येताना तिला प्रचंड मानसिक ताणाने थकवा आला होता. आता शेळके बाईंना मी काहीच सांगू शकले नाही. म्हणजे त्यांना समजेल असे. त्याचीच खंत तिच्या मनाला होती. ती घरी पोहोचली.

"गंगे ! इकडे ये !" राजी.

"तुला माहिती आहे ना .... मी कोनाड्यात बसते ३/४ दिवस. तेव्हा तूच करते जेवण, पाणी आणतेस, केर कचरा, सारे काही तूच करतेस !" राजी.

"मग ! काय त्याचे ? " गंगी.

"अग ! म्हणजे मी बसते हे तुला माहित आहे ना !" गंगी.

"आराम करायला ! खूप काम पडते तुला म्हणून... दुसरे काय?" गंगी.

"नाही !" राजी.

आणि राजी पुन्हा चक्रावली. ही पोरगी पार अनाडी कशी अल्लड ? याच विचारानं ती पार पछाडली होती. तिला तिचे दिवस आठवले. आपला तेव्हा झालेला गोंधळ, ओरडून तिने सगळी वाडी जमा केली होती.

एवढ्यात शेळके बाई तिच्या घरी आल्या.

"राजी बाई ! मला समजले तुम्हाला मला काय सांगायचे होते ते. समजले आज मी वर्गात सगळ्या मुलींना हे गुपीत सांगेन. बरे केलेत तुम्ही याची मला जाणीव करून दिलीत ते !" शेळके बाई.

"बरं ! बरं ! ठीक... चहा घेणार काय ?" राजी.

"नको !" शेळके

असे म्हणत त्या निघून गेल्या. जाताना गंगीला "शाळेत ये हं !" हे सांगायला त्या विसरल्या नाहीत...

आणि त्या दिवशी ते गुपीत त्यांनी सगळ्या मुलींना सांगितले. काय काळजी घ्यावी या काळात. पॅड कसे वापरायचे. ते सारे त्यांनी सगळ्या मुलींना समजावले. आज हे सांगेपर्यंत शेळके बाईंना प्रचंड टेन्शन आले होते. तसा विषय नाजूक. कसं समजवायच या बाल मनाच्या कळ्यांना ते ! शहरात सारे समजते पण खेडेगाव ते. आई अशिक्षीत नी मुली नुकत्याच वयात येणाऱ्या. घाबरून जातात पहिल्याच वेळी. आता शेळके बाई अगदी शांत होत्या. आणि मुली मात्र एकमेकींकडे पाहून कुजबूकत होत्या.

गंगी शाळेतून घरी आली आणि तिने आईला सारे समजावले ....

"आई ! मला पैसे दे. " गंगी.

"कशाला"

"पॅड आणायला ! मेडीकल मधून" गंगी.

"पॅड म्हणजे काय ?"

"तू पैसे दे तर मग दाखवते काय ते !" गंगी.

आणि शंभरची नोट घेऊन गंगी धूम पळाली मेडीकलमध्ये. आता पॅड कसे मागायचे दुकानदाराशी या विचारांनी ती गप्प राहिली.

"काय हवे आहे ?" दुकानदार.

गंगीने हाताने 'पॅड' दाखवले ते घेऊन मागे न बघताच ती घरी आली.

''आणले का ? पॅड की काय ते ? कशाला वापरतात हे ?'' राजी

''तुला नाही माहिती ? अग कसं शक्य आहे ? तू महिन्यातून बसते ना ३/४ दिवस तेव्हा लावायचे ? गंगी.

आणि राजी गप्पच बसली. असले काही तिने कधीच वापरले नव्हते... हे गुपीत तिला समजले नी ती खळाळून हसली.

तिने गंगीला जवळ घेतले.

''आपला बायकांचा जन्मच यासाठी असतो. हे बायकांच्याच नशीबी येते. आम्हीच असा गुन्हा काय केला गं !'' राजी.

''आई हा गुन्हा नव्हे ! हे निसर्गाचे देणे आहे ! मुलीच्या जातीला ! असे शेळके बाई म्हणाल्या'' गंगी.

राजी मात्र आता शहाणी झाली होती. तिच्या मनावरचे दडपण पार निघून गेले होत,

आणि गंगीला सारे समजले होते !!

o–o–o

# फारकत

भोईवाडा कोर्टात एक क्रिमिनल मॅटरमध्ये येणे भाग पडले. आजवर माझा ज्युनियर ती केस चालवत होता. पण समारेचा वकील तगडा ॲड. आजगांवकर म्हणून मला कोर्टात जावे लागले. तो फायनल ॲर्ग्रुमेंटचा दिवस होता. मी बांद्रा पालीहिल वरुन सकाळीच कोर्टात आलो. सगळी ब्रिफ डोळ्याखालून घातली. अकरा वाजताच कोर्टात उभे राहिले आणि माझे ॲर्ग्रुमेंट ११.३० वाजता संपले. माझ्या ज्युनियरला काही सूचना देऊन मी कोर्टातून बाहेर पडलो.

ड्रायव्हरला करीरोडने गाडी घ्यायला सांगितले. आज बऱ्याच वर्षांने या बाजूला आलो होतो. जेथे माझे बालपण गेले. परिसर नायगांवचा पण आज अनेक वर्षांनी भोईवाडा कोर्टात यावे लागले जगताप मर्दर केस मध्ये.

माझे बालपण याच भागात या रोडवरच्या स्प्रिंग मिलच्या चाळीत गेले. मुंबईला सातवी इयत्ता नंतर आलो. तसे माझे कोणी नातेवाईक मुंबईत नव्हते. पण गाववाले गणपतराव स्प्रिंगमिल मध्ये वॉचमन म्हणून कामाला होते. त्यांच्याकडे आलो, म्हणजे ते घेऊन आले चिपळूणहून म्हणजे गावाहून शिक्षणसाठी. गणपतराव काका हे पूर्वी मिलिटरीत होते. आणि निवृत्ती नंतर त्यांनी स्प्रिंगमिल मध्ये वॉचमनची नोकरी धरली. त्यांचे कुटुंब गावाला असायचे आणि ते एकटेच येथे राहयचे.

गणपतरावांनी मला आधार दिला आणि तेथूनच शाळेला सुरुवात झाली. बाजूच्याच न्यू भारत या शाळेत त्यांनी माझे नाव घातले. ते जेवण स्वत: बनवत असे आणि मलाही जेवण देत असत. त्यानंतर दोनच महिन्यांनी ते गावाला गेलेत कायमचे. पण स्प्रिंगमिलने राहायला दिलेली खोली वर्षभर त्याच्यांच नावांवर होती. गावाला जाताना त्यांनी त्या खोलीत एक बिऱ्हाड ठेवले आणि आमचा बिस्तारा बाहेरच्या पडवीत. दुसरा कोणाचा आधार नव्हता म्हणून मी माझे बस्तान त्याच खोलीच्या बाहेरच्या पडवीत मांडला. तशी ती पडवी मोठी होती.

मी त्या पडवीच्या बाहेर माझ्या बिछान्याची बळकटी, काही कपडे व दप्तर बाहेर भिंतीला खिळे मारुन लाऊन ठेवायचो. फक्त आंघोळीला त्या खोलीची मोरी आणि झोपायला पडवी. जेवण मी पडवीतच स्टोवर बनवायचो. माझा प्रपंच म्हणजे एक स्टो, एक पत्र्याचा पिठासाठीचा डबा या पलिकडे काही नव्हते.

सकाळी लवकर उठून मी माझी आंघोळ आटोपून घ्यायचो. शर्च-पॅन्ट चार दिवसांनी धुवायचो तोच माझा शाळेचा युनिफॉर्म करुन मी शाळेत जायचो. दुपारी घरी आल्यावर स्वत: चपाती करायचो आणि समोरच्या रामभरोसे हॉटेल मधून आणलेली सफेद वाट्याण्याची उसळ हीच भाजी... हा नेहमीचा उपक्रम होता.

त्या उसळी वरून आठवण झाली. मी शाळेत जाताना एक ग्लास त्या रामभरोसे हॉटेलात ठेवायचो आणि येताना त्यात उसळ घेऊन घरी यायचो. घरी आल्यावर स्टो पेटवायचो आणि त्यावर चपाती घातली आणि ती खाली उतरवली की दुसरी होईपर्यंत ती पोटात जायची. शेवटची तिसरी चपाती तव्यावरुन खाली उतरायची नी स्टो घालवण्याचा तेवढ्यात ती तिसरी चपातीने माझ्या पोटात घर केलेली असायची. मग स्टो बंद करुन तो भिंतीकडे सरकवला की मी मोरीत जाऊन सळासळ ताट धुऊन ठेवायचो की अभ्यासाला सुरुवात...

येथे आल्यावर मनात ठरवले होते आयुष्यात कायतरी बनायचं. निदान वकील तरी आणि त्याच ओढीने माझी अभ्यास करण्याची दिनचर्या ठरवली होती. घराकडून येणाऱ्या बापाच्या मनिऑर्डवर माझा अख्खा महिना जायचा. पै-पे जपून वापरायचो मी. महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत. गरीबी काय असते ती मी पाहिली होती. म्हणून मोठ-मोठी स्वप्ने पहात असे मी. त्या रामभरोसे हॉटेलच्या शंकर शेठने मला खूप मदत केली. कधी पैसे नसायचे तेव्हा तो उसळ घ्यायला नाही म्हणायचा नाही. म्हणून त्या हॉटेल बद्दल मला खूप आदर वाटायचा. कधी कमी पडले तर शाळेची फी भरायला पैसे ही द्यायचा. तो माझ्यावर खूप माया शंकर शेठची.

''या या साहेब ! या !'' म्हणत मला तो आत घेऊन गेला. मी एवढा मोठा झालो पण शंकर शेठ मला विसरले नव्हते आणि मी शंकर शेठला... चहा घेत घेत जुन्या आठवणी दाटून आल्या मनात. अनेक वळणे घेत जाणारे माझे आयुष्य तेथेच सुरु झाले होते. शंकर शेठ आता वयाने सत्तरीकडे झुकले होते. पण नव्हते विसरले मला. चहाचे पैसे त्यांनी नाही घेतले पण जबरदस्तीने मी त्यांच्या काऊंटवर ठेवले. ड्रायव्हरला गाडी पलीकडे घ्यायला सांगितले आणि एवढ्यात एक चिमुरडी ११/१२ वर्षाची मुलगी समोर आली. शेठ ही मुलगी कोणाची ? अंजूची ? अंजूची ? आणि अंजू ? ती या जगात नाही...! ते शब्द माझ्या कानात शिसे (गरम) ओतावे तसे उतरत गेले. आणि डोळे पाणावले...

शंकर शेठच्या ते ध्यानात आले... त्याने मला थोपटले व माझ्याबरोबर माझ्या गाडी पर्यंत आले, मी गाडीत बसलो.

ड्राव्हरने गाडी सुरु केली... पण मी मात्र हरवलो होतो माझ्या बालपणीच्या रम्य घटनांच्या जंजाळ्यात... अगदी नभ शिकांत बुडून गेलो होतो.

ते माझे ८ वी चे वर्ष पार पाडले. मग ९ वी चा अभ्यास सुरु झाला. मी मे महिन्याची सुट्टी संपवून मुंबईला आलो होतो. आणि पहिल्या दिवशी मी माझे नेहमीचे उसळीचे ग्लास रामभरोसे हॉटेल मध्ये गेलो. मी माझे ग्लास शंकर शेठच्या हातात दिले व परतणार तर एक सुंदर चेहरा आमच्याच शाळेत असणारी एक टवटवीत गोरा पान... नजरेत भरली तेव्हाच. खरे तर ते वय उंबारठ्यावरचे.

ती पुढे चालत होती, टिपटॉप कपडे केलेली, छान केसांचा संभार लोळत होता तिच्या पाठीवर. मी गुंतलो त्याच केश संभारात.... ते पहिले प्रेम की काय म्हणतात ते असावे... मी शाळेत जाईपर्यंत तिच्या पाठोपाठ जात होतो. ती तिच्या वर्गात गेली तो वर्ग ८ वी ‘अ’ चा होता. आणि का कोण जाणे मन थोडे बेचैन झाले होते. असे पूर्वी कधी नव्हते हो. पण तिने मात्र माझी विकेट घेतली होती हे मान्य सारे.

आता रोजचाच हा परिपाठ झाला होता. मी रामभरोसे हॉटेल मध्ये यायचा, उसळचा ग्लास काऊंटवरुन घ्यायचा व तिची वाट बघत राहयचो. ती कधी बाहेर पडते याची. मग मागून माझा शाळेकडे प्रवास सुरु व्हायचा.

एक दिवस ‘‘अंजू ! हा जयंता खूप हुशार आहे मुलगा ! आता नववीत आहे तुझ्याच शाळेत. अभ्यासात काही अडचण असेल तर त्याला विचारीत जा ! शंकरशेठ’’ हो ! अंजू

आणि मी तिच्या मागून चालू लागलो शाळेचा रस्ता. मी मागे येत आहे हे तिने पाहिले एकदाच आणि धस् झाले काळजात. मी नजर भिडवली होती तिच्या डोळ्यात. ती थांबली...

अंजू ‘‘तू कुठे रहातोस !

मी ‘‘ इथेच स्प्रिंगमिलच्या चाळीत’’

आणि ती चालू लागली आणि ती ही तिच्या बरोबरीने. शाळा आली ती तिच्या वर्गात नी मी माझ्या. खरे तर त्या दिवशी वर्गात मनच लागले नाही. सारखी तिची छबी डोळ्यासमोर तरळत होती... अंजू असा सारखा जप माझ्या डोक्यात चालू होता...

पुन्हा शाळा सुटल्यावर ती बाहेर बसली, शाळेच्या गेटवर. मी मुद्यामच उशीरा बाहेर आलो. आणि तिला न पाहताच चालू लागलो. पण ती मात्र झटपट माझ्या मागून येऊन बरोबर हचालू लागली. आता मात्र ती अन् मी दोघेही अबोल होतो...

आमच्या स्प्रिंग मिलच्या चाळी तिच्या रामभरोसे हॉटेलच्या बरोबर समोर होते... ते ठिकाण येताच तिने पावले भराभर उचलली आणि माझ्या पुढे चालत ती हॉटेलच्या बाजूने चालत घरी गेली, त्या हॉटेलच्या मागे ते लोक राहत होते. मी हॉटेलात आलो माझ्या उसळीचे ग्लास घेऊन मी रस्ता क्रॉस केला आणि निमूटपणे घर गाठले. आता काय झाले होते माहिती नव्हते पण हृदयातले स्पंदन वाढले होते. मन थाऱ्यावरच नव्हते माझे. मी चपात्या बरोबर जेवलो आणि अभ्यासाला बसलो... पण आज माझे लक्ष लागतच नव्हते. सारखी तिची ती मोहक मूर्ती समोर येई आणि डोळे भरुन आले. पण मी हरवलो एवढे खरे... पण दुसऱ्याच क्षणाला मला याची जाणीव झाली आणि डोके ठिकाणावर आले.

ती रात्र ही तशीच गेली. सकाळी पुन्हा मी तिच्या प्रमाणे निघालो, रामभरोसे हॉटेलवर आलो, अंजू बाहेर उभी होती...

"अंजू ! कोणाची वाट पाहतेस, कोणी मैत्रीण येणार आहे का ? शंकरशेठ

नाही ! हो पप्पा !" अंजू.

म्हणत तिने मला पहातच शाळेचा रस्ता धरला. मी मागून चालत होतो. तो सरळ रस्ता संपला नी उजवीकडेच वळण लागताच ती थांबली... मी पाहिली माझी पावले मंद झाली, पण शाळेची वेळ झाली होती. मी निघताच तीही आता माझ्या बरोबर चालू लागली.

"आज उशीर झाला कां ?" मी.

"हो, नळाला पाणी उशीरा आले." अंजू.

एवढ्यात शाळा आली. आम्ही वर्गात गेलो तो दुसरा दिवस पण मग मात्र आमचा परिपाठ चालू झाला. माझाही धीर चेपला होता आणि ती मात्र बिनधास्त होती. तसा मी मुंबईच्या वातावरणात नवखा होतो. तिचे मात्र बालपण इथले – थोडी निढविलेली.

तिसऱ्या दिवशी...

"जयंत ! तुझ्या गेल्या वर्षाच्या म्हणजे आठवीच्या वह्या असतील तर मला देशील !" मी.

''हो ! का नाही ? उद्या घेऊन येतो.'' मी.

दुसऱ्या दिवशी मी माझ्या गेल्या वर्षीच्या म्हणजे आठवीच्या वह्या तिच्यासाठी घेऊन आलो, हॉटेलसमोर ती वाट पहात होती. मी रस्ता ओलांडतोय हे तिने पाहिले होते.

''घ्या हे ! आधी घरी ठेवून ये.'' मी.

''हो''

म्हणत त्याने तो गठ्ठा ... शंकरशेठकडे दिला नी माझ्याबरोबत चालू लागली...

मग दोन दिवस रजा होती. शनिवार-रविवार. सोमवारी सकाळी जेव्हा मी हॉटेलात आलो व माझे ग्लास देऊन खाली आलो... ती पुढे जात आहे मी पाहिले. पुन्हा त्याच वळणावर ती उभी होती.

''जयंत ! तुझे अक्षर किती सुंदर आहे, जसे मोती ! खूप आवडले मला आणि तुझा लिहीण्यातला टापटीपणा !'' अंजू.

मी काहीच बोललो नाही. तसाच तिच्याबरोबर चालत होतो... निशब्द अवस्थेत.

हा आमचा दोघांचा प्रवास असाच चालू होता. पुढची दोन वर्षे. मी दहावीत होतो तो अकरावीत गेला. आणि ती होती दहावीत.

मे महिन्याची रजा पडली कि मी वाला जात असे मग शाळा सुरू झाली तेव्हा मी मुंबईला परतलो.

शाळेचा तो पहिलाच दिवस होता. मी माझे ग्लास घेऊन हॉटेलात आलो. ग्लास काऊंटरवर दिले व थोडावेळ रेंगाळलो...

----

# कणव

आज ध्यानी मनी नसताना अंधारल, सोसाट्याचा वारा, झाडांच्या पातेऱ्याचा खच आाणि गरा गरा फिरणारी आंब्या फणसाची झाडे, सारे काही अजबच, न पाहिलेले पूर्वी कधी, आणि क्षणात उतरत्या जलधारा घेऊन 'गारा' थंडगार, विघळणाऱ्या निमिशार्धात अंगणात, शिवारात. ऐन फेब्रुवारीत कधी पाऊस पडलेला ऐकला नव्हते. सप्तदशकांच्या जीवन प्रवासात; मी माझ्या कोकणात.

चार सहा दिवसांपूर्वी दूरदर्शनवर बातमी पुसटशी ऐकली होती, वळीवाच्या पावसाची, पण त्यात कोकणाचा उल्लेख नव्हता. हवमान खातेही हल्ली खऱ्या खूऱ्या बातम्या केव्हापासून देऊ लागले, याचा अचंबा वाटला मनाला.

थंडगार वाऱ्याची झुळूक घ्यावी अंगावर. मनाची चादर सुपाएवढी करीत, म्हणून  सताड दरवाजे उघडले तर ताशा वाजावा तशा दहा पैशा एवढ्या गाडा, छपरावर, कौलावर अंथरत होत्या आपले क्षणभंगूर अस्तित्व. हातातही सावरता येईनात. समोर अंगणात परात ठेवली, अर्ध्या बाहेर नि अर्ध्यांचे क्षणार्धात थंडगार पाणी. मन धुवून निघाले विचारांच्या जळमटांचे आणि उल्हासाची शाल पांघरून मी तयार.

पण तासाभरात आटोपला हा अनोखा वळवाचा धिबीडका नी मग शांत शांत.. पार विसरून गेलो होतो स्वत:ला आणि हळूहळू काळोख व्यापू लागला आपले पाय पसरून.

एवढ्यात नजर गेली व्हरांड्यात नी मनाचे जहाज वास्तवात उतरले... जेव्हा परसातल्या खोपटीच्या आसऱ्याने जगणारे दोन जीव डोळे किलकिले करीत आशाळभूतपणे पहात होते माझ्याकडे आधाराला, आसऱ्याला. भिजल्याने कुडकुडत होती. कुई कुई आवाजाने ती निरव संध्याकाळ जागी झाली असे वाटले, नि पायाशी वळवणारे ते दोन जीव पाय चाटतायेत हे जाणवले.

दोन अडीच महिन्याचे ते जीव, म्हणजे सखखी भावंडे, बागडणारी उन्हात, सकाळी संध्याकाळी नी दुपारी निवांत पडलेली अंगणातल्या औदूंबराखाली, पण आज आसरा नव्हता. सुरक्षीत त्यांच्यासाठी, गारांच्या माऱ्याने पार चेपाटून गेली. सगळीकडे पाणीच पाणी. खोपटात इंचभर ही जागा नव्हती सुकी. म्हणून

आसऱ्याला व्हरांड्यात आलेली. आशाळभूत डोळ्यांनी सांगत होती आसरा घ्या.

मीही वळवाच्या वादळातून स्थिर होत पायाशी पाहिले नी भानावर आलो. रोज संध्याकाळी दिवस मावळण्यापूर्वी त्यांना खुराक मिळायचा, मग भरल्यापोटी खोपटीत झोपायची सकाळ पावत, जागी व्हायची ती सुर्याच्या कोवळ्या किरणांच्या उबेने, नि मग बागडत त्यांचा खेळ सुरू व्हायचा, अंगणभर,

सकाळी जेव्हा पक्षांना खायला घालण्यासाठी दरवाजा उघडला जायचा ती दोघेही काही खाण्याच्या आशेने रेंगाळत यायची मागे मागे. पण ते आपले खाणे नाही, ते दाणे, तांदूळ आहेत हे समजल्यावर परतीची वाट धरायचे. हा होता दररोजचा परिपाठ.

मग पुन्हा घरात जाऊन त्यांचे खाणे दिले की ते दोन्ही जीव शांत शांत. मग हुंदडणे कोवळ्या उन्हात, आमच्या प्रशस्त अंगणात.

आजचा सारा प्रकार, आम्हाला आणि त्यांनाही नवा होता. आम्ही उल्हासीत मनाने त्या वळवाच्या पावसाचे, गारांचे स्वागत केले, पण त्या दोन जीवांना हा जीवघेणा अनुभव होता. त्यांना आज हवा होता आसरा घराच्या वळचणीला सुरक्षीत, उबदार. त्यांना पाहताच कोणाचेही काळीज फाटेलं असा तो प्रसंग होता. काय करावे सुचेना. मी मागे फिरताच माझ्या मागून घरात, कधी न येणारी ती दोघे आली आणि त्यांची नजर शोधू लागली आसरा उबेचा. मग त्यांनी सगळा हॉल पाहिला. मी ही त्यांना आत येऊ नका असे म्हटले नाही. कोणी काय म्हणेल याचीही पर्वा नव्हती. फक्त विचार त्यांच्या सुरक्षेचा.

मग घरातून एक गोणता आणून अंथरला दरवाजाच्या आत. ती पटकन त्यावर विसावली आणि कुडकुडतच, गळ्यात गळा घालून झोपली. ती झोप कसली गरम आसऱ्याची ती ऊब सुखावत होती त्यांना या बदलत्या वातावरणात.

मी पण पार विसरून गेलो होतो, त्यांच्या संध्याकाळच्या खाण्याचे आणि मग मन ओलावले. पटकन घरात जाऊन ग्लूकोजचा एक पूडा पसरला त्या गोणपाटावर. त्यांना जाग नव्हती. पण उबदार गोणत्यात गुरफटलेल्या त्या जीवांना माझी हालचाल जाणवली. आणि नजर वळली माझ्याकडे. क्षणभर त्यांचे लक्ष त्या खाण्याकडे नव्हते. ती सुखावली होती ती त्यांना दिलेल्या

सुखदायी आसऱ्याने उबेच्या आणि ती गुंतली खाण्यात.

असे ऐकले होते. पण प्रथमच ती अनुभवीत होतो. त्यांच्या आईने खोपटी खालीच त्यांना जन्म दिला नी, महिन्याभरात वाऱ्यावर सोडले. ती तरी काय करणार त्यांच्या लुचण्याला कंटाळून, ती दूर पळायची... शोधायची अन्न आपल्यासाठी कचऱ्यात आणि केव्हातरी आठवण व्हायची तिला नी परतायची. आणि मग त्या दोघांचे लुचणे सुरू. ती कंटाळायची, चावायची त्यांना, हिडीस पीडीस करायची त्यांना आणि दूर पळायची. हे सारे मी उघड्या डोळ्यांनी पहात होतो.

पाऊस थांबला होता. रात्रीचे नऊ वाजून गेले होते केव्हाच. आमची जेवणाची वेळ झाली होती. ती आटोपून मी बाहेर आलो तर ती दोघे उठली, दरवाजा बंदच होता घराचा. पण त्याची कुई कुई सुरू झाली बाहेर जाण्यासाठी. हे घर आपले नाही. खोपटीच आपले घर हे ती जाणत होती. त्यांच्या कुरबूरीने मी दरवाजा उघडला.. क्षणात ती बाहेर गेली नी व्हरांड्यात सुखावली. मी बाहेरची लाईट लावली तर ती त्यांच्या किलकिल्या नजरेने, आशाळभूतपणे माझ्याकडे पहात होती... धन्यवाद म्हणत!

सकाळीच मला समजले होते की बिबट्याने त्यांच्या आईची शिकार त्याच रात्री केली होती. आम्ही झोपेत. शेजाऱ्यांनी दुसऱ्या दिवशी समजले तेव्हा डोळे पाणावले आमचे. विचारी ती दोन पिल्लं पोरकी झाली होती.

हि त्याची 'कणव' मला एकाएकी कशी आली की हे निसर्गानेच आपल्यात निर्माण केलेली भावना ? आपण आपल्या बाळांना, नातवंडांना किती जपतो. मायेच्या उबेने, पण आईच्या उबेला पारखे झालेले ते जीव. परावलंबी कोणाच्या तरी आसऱ्याने, ८/१० वर्षाचे जीवन कसे जगत असतील ? याच विचारात मी हरवून गेलो. सुखावलो. ही कणवेची जाणीव माणसाने जपायला हवी. जीवनभर दुसऱ्यांसाठी, प्राण्यांसाठी, पक्षांसाठी जे तुमच्या जीवनाशी निगडीत आहेत. विसंबून आहेत. तुमच्या जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. लाचार म्हणून नव्हे तर, निसर्गाच्या नियमाला धरून जागून आपण.

मनात रात्रभर हाच विचार पुन्हा पुन्हा येऊन झोप मोड झाली. मग पुन्हा लाईट लावली नी दरवाजा उघडला तर बाहेर थंडीचे थैमान, थंडीचेच दिवस ते. मग आतून गोणता आणला नी ती विसावली त्यावर गळ्यात गळा घालून निवांतपणे.... मला कणवेचा धडा शिकवून ...!

०-०-०

# सोशल डिस्टसिंग

त्याचे असे झाले, पत्रिका जुळली, पसंतीही पार पडली आणि लग्नाची तारीख पक्की होत. हॉल वाजत्रीवाले, घोडेवाले, कॅटरींगवाले, हारवाले... सारे पक्के होतात. पत्रिका छापून वाटल्या जाण्यापूर्वी ऐंग्जमेंटचा बार उडतो आणि मधेंच 'तेरावा ग्रह' उभा रहातो. लग्नाच्या मुशीवर 'कोरोना' रुपात. राव, सगळाच विचका होतो हो लग्नाच्या खेळाचा नी शाम सोशल डिस्टंसींगचा, फणा उभारुन....रस्ता रोखीत !

आणि मग किड लागलेल्या वेलीसारखी मान टाकतात नवरा-नवरी, ढीगभर स्वप्ने पाहीलेली असतात लग्नाआधी, हनीमुनची, भविष्याची त्यांच्या नी लग्नाचा बार फूसका झाला. अंजनी शाम यांचे लग्न जमवून ८/९ महिने झाले. फिरफिर फिरले दोघे हातात हात घेऊन, कधी मिठीत घेऊन, चुंबनांचा वर्षाव करीत, बाकी होता फक्त बार उडायचा लग्नाचा... तो या कोरोना तेराव्या ग्रहामुळे अडला हो.

लग्ना आधी बाजूच्या आईला भटजी म्हणाले होते. बारावा गुरु चालू आहे. ठरलेल्या तारखे आधी लग्न उरकून घ्या. नाहीतर ! आणि खरच तेरावा ग्रह आडवा आलाच. आणि सारा खेळ बिघडला. शाम अंजली यांनी केलेल्या कल्पनेतल्या मांड्यांचा राव चेहरे पडले सगळ्यांचे. अन्न, पाणी जाईना, झोप येईना, नजरे समोर उभी रहात स्वप्नांची भेंडोळी, वाकूल्या दाखवीत.

राजू-अंजनी भेटली एकदा संध्याकाळी हँगीग गार्डन मध्ये एकमेकांना धीर दिला. घट्ट मिठीत सामावून घेतले दोघांनी आणि स्वप्नांची उजळणी केली. आणि मग मिठी सैल झाली.

''आता आधी भेटायचें ! अंजली

''हे पहा हा कोरोना सुसाट सुटलाय, मुंडदे पडतायत माणसांचे, लॉक आउट, १४४ कलमाची अमंलबजावणी, पोलिसी खात्यात मोटर सायकल वर एकच माणूस प्रवास करी. त्या दोघांना वेगवेगळ्या मार्गाने जावे लागले. हा कोरोनाचा विळखा कधी सुटणार काही माहिती नव्हता. तेव्हा पाहू कधी भेटायचे ते, अन्यथा फोनवर असतोच ना, आपण !''

''त्याने काय होणार ? अंजू

''म्हणजे !''

''तुला नाही कळताच आम्हा बायकांचे मन...मग पुढच्या रविवारी कोहीनुरमध्ये !'' अंजू.

''अग पण हॉटेलही बंद झाली आहेत. ट्रेन बंद ! कसे भेटायचे ? राजू.

दोघेही अबोल झाली आणि गार्डनच्या पायऱ्या उतरायला लागली, हातात हात गुंफून, शेवटच्या क्षणी अश्रूंनी थबथबलेल्या डोळ्यांनी... शेवटची मिठी... सैल झाली आणि दोघांचे दोन मार्ग... दोघांमधले अंतर वाढत गेले...'' सोशियल डिस्टसींग सारखे.

मध्ये एक आठवडा गेला नी लॉकडाऊन अधिकच घट्ट होत गेला. घरातच रहाण्याच्या सुचना कडक होत गेल्या, रस्ते शुकशुकाट आले. गाड्याना रजा बस, रेल्वे बंद. घरात राहून आठवडाभरात विकली. शाम-अंजू मग भेटली ती ग्रॅट रोडच्या भाजी बाजारात. कसली होती भेट, तीन फुटांचे अंतर, हातात जड भाजीच्या पिशव्या. काय बोलणार ? तुफान गर्दी एकमेकांना धक्के मारीत, भाजीचे चढे भाव. डोक्याचे खोके झालेले. मग पाणावलेल्या डोळ्यांनी दोघे दोन दिशाना निघून गेली.

रात्री मात्र तासंतास बोलत, आवंढेगिळीत, डोळे पुशीत, केव्हा झोप लागे त्याना कळत नव्हते. त्यात स्वप्नांची देवाण घेवाण, भेटीचे इरादे, याशिवाय काय विषय असणार ? या कोरोनाच्या लॉकडाऊन मध्ये दोन महिने निघून गेले. मग हॉलचे कॅन्सलेशन आणि त्याबरोबर सगळाच बोजबारा नियोजनाचा पून: मुहुर्ताची चाचपणी, हॉलचे बुकींग, सारे पूर्वीसारखे. पण काही केल्या कोरोना हटेना. हवालदील नवरा-नवरी चा जीव कंठीत आला होता. नशिबाला शिव्या देण्याशिवाय दुसरा उपाय नव्हताच.

बरे चार महिन्यात घरात बसलेल्या शामच्या नोकरीवर गदा. अंजू सरकारी नोकरीत तिचे बरे होते. पण शामला पगार मिळत नव्हता. घरातली लग्नासाठी ठेवलेली गंगाजळी आटत होती. शाम कमालीचा हवालदील झाला होता.

एक दिवस अचानक अंजूचा शामला फोन.

''आता काय करायचे ? अंजू

''मी काय सांगू ? शाम.

''अरे दुसरा काही उपाय ? अंजू

''कसला ? शाम

''आपल्या लग्ना बाबत. मला दमवडत नाही. सारखे तुझ्याकडे यावेसे

वाटते, झोप येत नाही. बोल, काहीतरी बोल !'' अंजू

''म्हणजे लग्नाशिवाय ?

''मग काय हरकत आहे ! लग्नाशिवाय रहायचे, लिव्हीन रिलेशनने. नाहीतरी आपली रीतसर ऐंगजमेट झाली आहे. आपण घरच्याना विचारुन बघूया का ? अंजू

''नाही रे बाबा !'' शाम

''कच खाऊन नको असा ! ही सोशीयल डिस्टंशीग माझा जीव घेत आहे. वेड बागायचेच बाकी आहे !'' अंजू

''मग काय करु ?

''तू काहीच कामाचा नाहीस, हे अगोदर माहीती असते तर गाठच बांधली नसती तुझ्या बरोबर ! त्यापेक्षा तू !

''त्या पेक्षा काय ? असा वेड्यासारखा विचार करु नको. माझे प्रेम आहे तुझ्यावर, आपण आणाभाका घेतला आहेत. आयुष्य बरोबरीने काढायचे... मी आताही लग्नाला तयार आहे. पण...हा कोरोना, गृह आपल्या आड येऊन उभा आहे !'' शाम.

''दुसरा काही उपाय ! ...अंजू !

''दुसरा कुठला...तूचं सांग!'' शाम

''नोंदणी पध्दतीने विवाहाचा !...अंजू

''पाहू या चाचपून ! तू त्या कार्यलयाच्या बाजूच्या ऑफीस मध्ये आहेस. चौकशी कर !'' शाम.

''हो ! नक्की, मलाच घाई आहे... कारण घरचे ही काडीमोड घे म्हणतात. पण मला लग्न तुझ्याशीच करायचे आहे. मी उद्या फोन करते जमल्यास नाव नोंदवून ही टाकते !'' अंजू.

''हो ! करच ! घरच्याना मी समजावतो ! पण तुला १४ दिवस कोरंटाईत व्हावे लागेल... आमच्या घरी... आणि मग...''सेफ डिस्टंसींग...!

''बापरे ! म्हणजे मग उपयोग काय लग्न करुन ! कोरंटाईन चे ठीक, पण मग दम कसा वडवणार आपल्याला !

''अरे ! सेफ डिस्टंसींग म्हणजे सगळी अडचणच ना ! मग काय विचार करू या? बोल ! काय करु सांग ! आपली दोघांचीही अवस्था तशीच आहे !'' अंजू.

''हो ! तशीच आहे ! तू बुकींग करुन टाक ! आपण कोरंटाईन नी डिस्टंर्शींगला आढ्याला बांधून ठेऊ !'' शाम.

''मग छान ! करच...आपण फाट्यावर मारु कोरंटाईन नी डिस्टंर्शींग ला !

मग मात्र दोघांच्याशी मनातला दूरावा दूर झाला. आणि कोरंटाईन डिस्टंर्शींग आणि कोरोनाच्या १३ व्या ग्रहालाही बासनात बांधले गेले.

एक महिन्याने मॅरेंज ब्युरोत लग्न-घरी येऊन माप ओलांडून... संपवले एकदाचे डिस्टंर्शींग...!!!

आणि कोरोनाने मान टाकली !!!

०-०-०

# कर्माचे भोग

ती गेली, आणि आनंदरावांचे आकाशच काळवंडून गेलं. संकटांच्या काळ्याकूट्ट ढगांनी. सुमा आणि आनंदरावांच्या संसाराला, कोणाची नजर लागली माहिती नाही, आणि भरल्या घरात त्यांना भिंतीही खायला उठल्या एकाकीपणाने. हे कर्माचे भोग नाही म्हणायला हवेत काय ?

महिना होऊन गेला होता. तिला कॅन्सरने गाठले पण त्याची जराही सुचना त्याला मिळाली नाही. कावीळ म्हणून झाली आणि सारा बाजारच आटोपला पंधरा दिवसात. त्यावेळी ते त्यांच्या गावी राजापूरला रहायला गेले होते. निवृत्तीनंतर आपण गावातल्या आपल्या नव्याने बांधलेल्या वास्तूत चार दिवस सुखाने काढावे यासाठी त्यांनी सुमाला गळ घातली. खरेतर तिच्याही मनात नव्हते पण अनेक वर्षे मुंबईत राहिलेल्या तिला इथल्या वातावरणाची सवय झाली होती. गावात तसे वातारवरण स्वच्छ, पाणीही मुबलक, पण आजूबाजूला शेजार नव्हता. खूप लांब लांब होती घरे आणि अडीअडचणीला माणूस मिळत नव्हते. मोठ्या हौसेने त्यांनी बाग केली आंबे, काजू, फणसाची. त्यांनी या वर्षीच फळे घ्यायला सुरूवात झाली होती. त्याचा आस्वाद घ्यावा असे आनंदरावांना वाटे, पण सुमा तशी तयार नव्हती. तिथे डॉक्टर जवळ नव्हते, बाजारहाटसाठी ३-४ कि.मी. चालत जावे लागे. या सगळ्या अडचणीचा पाढा त्यांनी आनंदरावांकडे वाचला. पण हट्टाला पेटलेल्या आनंदरावाना नकार देणे तिला कठीण झाले आणि होळीच्या वेळी त्यांनी राजापूर गाठले.

पहिले दोन महिने इकडून नेलेल्या वस्तूंना त्यांनी पुरवले पण मग अडचणी सुरू झाल्या. त्यात करोनाचा लॉकडाऊन. सुमाची प्रकृती स्थूल. तिला धड चालताही येत नव्हते. आणि तेवढ्यात की कोण जाणे त्यांच्या पोटात दुखू लागले. थातूर मातूर घरची औषधे, काढे त्यांनी केले पण उपाय थकले. त्यांनी अंथरूण धरले आणि आनंदरावांची पंचाईत झाली. घरची सगळी कामे, बागेतील कामे यांने ते बेजार झाले. कारण इतकी वर्षे मुंबईच्या कंपनीत काढलेल्या त्यांनी. म्हणून काम करणारे सुखवस्तु आनंदराव त्याने अगदी हबकून गेले. जेवणाचेही त्यांच्यावरच पडले. केव्हातरी सुमा उठे पण तिच्यात त्राण नव्हते. पण तरीही दुसरा उपाय नव्हता. कसे तरी दहा दिवस गेले आणि तेवढ्यात सुमाचा आजार वाढला. पोटदुखी, उलट्या यांनी त्यांचा जीव

टांगणीला लागला होता. त्यात मदतीला कोणीही नव्हते. पैसा होता, पण नोकरचाकर मिळेना. आनंदरावांनी सुमाला तालुक्याच्या हॉस्पिटलला नेले. त्यांनी तिला ॲडमिट करून घेतले. पण दोन दिवस झाले तरी फरक पडेना आणि शेवटी मुंबईला नेण्याचा विचार झाला. तिला येथे आणली व के.ई.एम. मध्ये ॲडमिट केली. पण उपाय थकले आणि ती गेली.

पुरुषाला खरा आधार उतारवयात बायकोचाच असतो... मुलांचा नाही, ना मुलींचा. पण आनंदरावांच्या मुली शेर निघाल्या. त्यांनी आईसाठी सारे काही केले. रात्रंदिवस जागल्या, पैसा खर्च केला. आनंदरावांना खरा आधार मुलींचाच होता. लग्ने झाली तरी आईवडीलांच्या साठी त्यांचे हात सदैव तयार असत. त्या आपला संसार सांभाळून होता होईल तेवढी मदत करीत तोच एक आधार होता. ७/८ वर्षांपूर्वी मुलींची लग्ने झाली. पण अजून त्यांच्या घरात पाळणा हालला नव्हता हीच एक खंत सुमाला होती तशीच ती आनंदरावांना. एरव्ही सारे काही ठीक चालले होते.

मुलींची लग्ने झाली म्हणजे त्या त्यांच्या प्रपंचात गुंतून गेलेल्या. आई होती तोवर त्यांचे येणे जाणे होते. पण त्यांच्या, मुलींच्या नोकरी धंद्यातून त्यांना तरी वेळ कुठे होता. त्यांना वेळ मिळेना आणि आता आनंदरावांना एकांतवास नकोसा झाला होता. आपले मन ते वाचनात आणि टी.व्ही.च्या सान्निध्यात घालवीत असत. त्यांना सुमाचे घरात नसणे अगदी जीवघेणे झाले होते. घरात कोणी बाई मिळावी यासाठी खूप प्रयत्न केले पण कोणी मिळेना. आता जेवण, कपडे धुणे, घर साफ करणे ही सगळीच कामे आनंदरावांवर पडली होती. त्यात त्यात तिची पेन्शन हाच आधार... तोही आता थांबला होता.

दिवाळीला सगळे कुटूंब एकत्र आले तेवढेच. मग पुन्हा एकांतवासच. त्यात मुलांची मायाही आटत चालली होती त्याला खूप कारणे होती. त्यांनी ठरवले गावाला, राजापूरला जावे. आणि थोडे दिवस तेथे थांबून आपल्या प्रॉपर्टीची देखभाल करावी. ते आले ते एकटेच, उलट ते मुंबईला सुखी होते. पण गावात त्यांचा वेळ जाईना. त्यांनी ठरवले आता १५ दिवस झाले आहेत गावात. तेव्हा काही कामेही नाहीत. आपण मार्चमध्ये राजापूरला यायचे, आंबे येतील त्यावेळी. आणि त्यांनी परत मुंबईला यायचा निर्णय घेतला. पण मुलीना ते रुचले नाही.

ते गावी गेलेल्या १५ दिवसात बरेच मोठे रामायण घडले होते मुंबईत.

त्यांच्या बंगल्याच्या तीन चाव्या होत्या. त्यातल्या दोन दोन मुलींकडे आणि एक स्वत:कडे ठेवली होती  चावी. तीही त्यांनी त्यांच्या धाकट्या मुलीकडे देऊन ते गेले... कोठे हरवेल या भितीने. तो 'स्वप्नपूर्ती' बंगला तसा प्रशस्त होता. दोन मजली सगळ्या सोयींनीयुक्त. खाली दोन रुम व किचन तसेच पहिल्या मजल्यावरही. दोन बेड रुम व किचन शिवाय भले मोठे परसावन, पाण्याच्या बोअर वेल व आंब्या-फणसाची झाडे. पहाणाऱ्याचे डोळे दिपून जावेत असा तो बंगला. खरोखर बहोत कष्टाने उभा केला होता. ते येथे मुंबईला नसताना जे रामायण घडले असे म्हणतो ना ते असे की...

आनंदराव गावाला गेल्यावर त्यांच्या बंगल्याबाबत दोन मुलींत वाद नव्हता. तो बंगला आईच्या नावावर होता व सुमाने आपल्या दोन मुली वारस म्हणून लावल्या होत्या. ही घटना त्या मुलींच्या लग्नापूर्वीची होती. त्या बंगल्यात प्रथम मोठी आली व हे समजतात छोटीनेही एक मजला बळकावला. यातली कोणतीच गोष्ट आनंदरावांना माहित नव्हती. त्या दोघींनीही सोसायटीला तशी पत्रे लिहीली व जागा आपल्या नावावर करून घेतली. आनंदरावांनी त्यांच्या मुलीला फोन केला की मी दोन दिवसांनी येणार आहे. पण त्या मुलीनी याची जराही दखल घेतली नाही. आपला बाप आता कायम गावातच रहाणार असा समज त्यांनी करून घेतला होता. पण तो चुकीचा होता. ही वास्तू विकावी यासाठी त्यांनी डाव खेळला. एजंटना सांगून गिऱ्हाईक शोधू लागले. पण त्या दोघींच्या कामाच्या वेळा वेगळ्या होत्या. त्यामुळे दिवसा घर बंदच असायचे. कधी कधी त्या आपल्या मुळ घरी जाऊन यायच्या. त्यामुळे हा बंगला बऱ्याच वेळा बंद असायचा. बंगला तसा सुंदर. गिऱ्हाईकांना पसंत पडायचा. ही गोष्ट त्या दोघींना माहित पडली आणि त्या सावध झाल्या. त्यांना ती वास्तू काही केल्या विकायची नव्हती. ती त्यांच्या आईची म्हणजे सुमाची होती. स्वत:च्या पैशाने उभी केलेली. त्यात त्यांचे बालपण गेले होते म्हणून.

पुढच्या आठवड्यात आनंदराव सकाळीच पॅसेंजरने निघाले व दुपारी घरी आपल्या बंगल्यात पोहोचले. सोबत त्यांची पहिली बायको होती. पण घर बंदच होते आणि त्यांच्या जवळील चावी त्यांनी मुलींना दिल्या होत्या. दुपारची वेळ. अडीच वाजले होते. त्यांनी दोन्ही मुलींना फोन केला पण काही रिसपॉन्स दिला नाही. संध्याकाळ होत आली. तेव्हा फारच अस्वस्थ झाले. पूर्वी कधी असा प्रकार त्यांनी अनुभवला नव्हता. त्यांच्या मुलींना त्यांच्या बद्दल जराही आस्था

नव्हती, होती ती त्यांची पत्नी, सुमा बद्दल. कारण हे त्यांचे लग्न दुसरे होते. त्यांच्या पहिल्या बायकोला सुमाच पोसीत होती. आयुष्यभर त्याने सुमाला ओरबाडले होते. त्यामुळे नवरा म्हणून ठिक पण तिच्या मनात त्यांच्याबद्दल जराही रिस्पेक्ट नव्हता. कारण ती फसवली गेली होती. त्याचे पहिले लग्न झाले हे आनंदरावांनी तिला सांगितले नव्हते. दोन तीन वर्षानंतर ही गोष्ट सुमाला माहिती पडली. त्यावेळी तिची मोठी मुलगी झाली होती. ती आता मागे जाऊ शकत नव्हती. त्याला तिने नवरा म्हणून स्वीकारला नाईलाज म्हणून. हे तिने अनेक वेळा आपल्या दोन्ही मुलींना सांगितले होते. कोण जाणे हा आपला बाप एक दिवस आपल्यालाही फसवील आणि आईने कष्टाने निर्माण त्यावेळी ही वास्तु विकून टाकील. याच कारणाने त्यांनी तो बंगला आपल्या ताब्यात घेतला. त्यांना हा आपला बाप आपल्याजवळ नकोच होता. याचे कारण त्याने त्यांच्या आईला दिलेला त्रास. तिची केलेली फसवणूक. तिच्या पैशावर त्याचा गुजराण होत होता. त्याला फक्त तिचे शरीर आणि पैसा हवा होता. तो तिच्या जवळ एकनिष्ठ असेल की नाही या बाबत ही सुमाला शंका होती. हे त्याला कारण होते.

संध्याकाळी दोन्ही मुली आल्या त्यावेळी साडे सात वाजले होते. तोवर आनंदराव बाहेर बसून होते. मध्ये त्यांनी समोरच्या हॉटेलातून जेवण घेतले तेवढेच...

''पप्पा ! तुम्ही न सांगता आलात ?'' मुली.

''का ? मी फोन केला होता ना की मी येत आहे म्हणून. आम्ही दोघेही दुपारी अडीच वाजता पोहोचलो !''

''ह्या बाई कोण ?''

''हि तुमची आई ! माझी पहिली बायको !'' आनंदराव.

''आम्ही नाही ओळखत हिला. आणि ही आमची आई कशी होणार ? आमची आई गेली. आता या वास्तुशी तुमचा संबंध संपला. तुम्ही आल्या वाटेने परत जा !'' दोन्ही मुली.

आनंदरावांना शॉक बसला असे काही घडेल हे त्यांच्या ध्यानी मनी नव्हते. ही वास्तू विकून दोन करोड रुपये घेऊन त्यांना पुनः राजापूर गाठायचे होते. पण मुलींनी त्यांचा डाव उधळून लावला होता.

''पण आम्ही आता रात्री कुठे जाणार ? आजचा दिवस आम्हाला येथे राहू

दे ! इतक्या निष्ठूर होऊ नका ! प्लीज दरवाजा उघडा.'' आनंदराव.

आणि त्या निघून गेल्या, नी आनंदराव रात्रभर त्याच व्हरांड्यात बसून होते... मग सकाळी ते गावाला निघून गेले. आल्या पावली नाईलाजाने.

खरेतर मुलीना वाईट वाटले. आपल्या वडीलांना वाईट वागणूक दिली म्हणून. पण त्या त्यांच्या पहिल्या बायकोला पाहिल्यावर त्यांचे डोकेच फिरले आणि त्यांनी हा निर्णय घेतला नाईलाजाने. मनात नसतानाही. कारण त्यांना कल्पना होती आई गेल्यावर हा आमचा बाप पहिल्या बायकोबरोबर घरोबा करेल म्हणून. कुणालाही ही वास्तू विकेल म्हणून. तो त्यांचा अंदाज खरा ठरू लागला होता.

या अपमानाने आनंदराव पार पडला होता. त्याला ती वास्तू हवी होती. खरे तर सुमाने स्व-कष्टाने ही वास्तू बांधली होती. त्यात आनंदरावांचा काहीही सहभाग नव्हता. तिच या सोसायटीची सभासद होती.

सुमाने शेवटच्या क्षणी मुलींना हॉस्पिटलला बोलावले व असे काही घडेल याची सुचना केली होती. आनंदरावावर सुमाचा जराही विश्वास नव्हता. हा माझ्या पश्चात ही वास्तू विकणार आणि तसेच आज घडत होते.

आनंदराव एक बेकार माणूस होता. त्याला गेल्या वीस वर्षात सुमाच पोसीत होती. त्याची कंपनी बंद झाली. तो युनीयनमध्ये होता. मग अनेक राजकीय पार्ट्यामध्ये वावरला. पण त्याच्या नशीबाने त्याचा त्याला काहीही फायदा झाला नाही, उलट खर्चासाठी सुमाच त्याला पैसे देत असे. हे मुलींना माहित होते. त्यांना सावधानतेचा इशारा दिला होता, त्याला कारण तसेच होते. ते हेच.

आनंदराव खटपट्या होता. त्याने पैसे खिलवून सुमाची पेंन्शन आपल्या नावावर करून घेतली. वारसदार म्हणून ही गोष्ट ही त्यांच्या मुलींना खूप झोंबली होती. जीवंत असताना तो तसा वागला आणि आताही गेल्यावर तिच्या जाण्याचा फायदा उठवू पहात होता. ही गोष्ट खरेतर बेकायदेशीर होती. कारण एक लग्न झाले असताना दुसरे लग्न कायदेशीर होऊ शकत नाही. हे मुलींना माहित होते. म्हणून त्यांनी बापाला धडा शिकवण्यासाठी त्यांनी तसे कळवले व त्यांच्या पेन्शनला चाप लावण्यासाठी तशी केस सुमाच्या पेन्शन डिपार्टमेंटमध्ये फाईल केली व त्यांची पेन्शन बंद केली. त्यामुळे त्याने सुमाने राजापूरला बांधलेले घर जे तिच्या नावावर होते ते विकून टाकले आणि आपल्या पहिल्या बायकोबरोबर तो मालवणला निघून गेला. ही गोष्ट दोघींना समजली. त्यांनी

ग्रामपंचायतमधून सगळी माहिती घेतली, तर ती वास्तू सुमाच्याच नावावर होती आणि तिचे वारस दोन्ही बहिणी होत्या. त्यामुळे तो विक्रीचा व्यवहार खरेतर कायदेशीर नव्हता. त्यांनी राजापूरच्या तहसील आणि कलेक्टर यांना तसे लिहिले आणि या व्यवहाराचे सेलडील रद्द केले व ती वास्तूही आपल्या ताब्यात घेतली.

खरेतर बाप म्हणून दोन्ही मुलींनी त्याला स्वीकार करायला हवे होते पण त्यांच्या मनात आनंदरावाबद्दल एक प्रकारची घृणा होती. हा आपला बाप खरा, पण बेईमान, फसवणूक करणारा, आपल्या आईला आयुष्यभर पिडणारा, लुबाडणारा म्हणून त्यांच्या मनात घृणा होतीच. त्याचाच परिणाम म्हणून आनंदरावाना त्यांनी दे धरणी माय असा धडा शिकवला होता. जी गोष्ट सुमा करु शकली नाही. कारण ती भिडस्त होती. ती या वयात आणि आजारपणाच्या अवस्थेत असे पाऊल उचलू शकत नव्हती. ती आपली संस्कृती नाही म्हणून तिने त्याला स्वीकारला होता. तोही नाईलाजाने. ही सगळी हकीकत तिने मुलींना सांगितली होती.

हा त्यांचा प्रेमविवाह. आनंदराव त्यावेळी शिक्षण खात्यात होते. आणि ती बी.एम.सी.मध्ये एक शिक्षीका. त्यांच्या शाळेत अनेकवेळा त्याचे येणे होत असे. तशी ती सुंदर होती. कोणालाही आवडेल अशी. आणि आनंदरावांच्या प्रेमातही फसली. त्याचे पहिले लग्न झाले होते, हे ही त्याने तिला सांगितले नव्हते. आणि प्रेमाच्या या खेळाची परिणीती त्याचे एकत्र येण्यात झाली. ती व तो अनेकवेळा विरारच्या रेस्ट हाऊसवर भेटत. तेथे रात्री रहात, त्यातून शरीर संबंध आले आणि ती गरोदर राहिली. मग मात्र लग्न करण्याशिवाय त्यांना पर्याय नव्हता. त्याचे पहिले लग्न झाले आहे हे त्याने लपवून ठेवले. तिला ही गोष्ट अडीच-तीन वर्षांनी समजली. तिला कमालीची घृणा वाटली आनंदरावांची. पण पदरात पडले नी ते तिला स्वीकारावे लागले. तिच्या वैवाहीक जीवनात तिने हे सत्य आजारी पडेपर्यंत मुलींनाही सांगितले नव्हते. पण तिला रहावेना म्हणून मृत्यूपूर्वी तिने सगळे पत्ते आपल्या मुलींपुढे उघडले. आणि त्यांचाही आनंदरावांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. त्यानंतर ३/४ दिवसांनी ती गेली पण मुलांच्या डोक्यातून तो कायमचा उतरला. आणि पुढचे महाभारत घडले.

त्यातून सुमाला न्याय मिळाला असणार. आपण जे करू शकलो नाही ते आपल्या मुलींनी करून दाखवले याचे समाधान तिला आता स्वर्गात खचितच

वाटले असेल. नाही कां? नैतिकतेचा उंबरठा ओलांडणारा माणूस जाणून–बुजून गुन्हे करीत रहातो. काय होणार आहे ? म्हणत पण दिवस भरले की पाया खालची वाळू सरकायला लागते आणि माणूस तोंडघाशी पडतो आणि अडचणींचा पाढा त्यांच्या गळ्यात लोढणा घेऊन फास लागतो. हेच खरे नां?

हे आनंदरावांच्या कर्माचे फळ होते एवढे मात्र खरे....

०–०–०

# दुरावा

लेकीचे लग्न थाटामाटात इंदूरला पार पडले आणि अरूणरावही सुखावले. लेक तशी हुशार, शिकलेली उच्च पदस्थ आय.ए.एस.ऑफीसर, पण गरीब घरातली. तिला स्थळे यायची सामान्य घरातल्या मुलांची, पण काय प्रस्ताव पुढे न जाता मध्येच बारगळायचा.

मुळची ती मुंबईची, अरुणरावांची नोकरी सचिवालयातली. म्हणून ते ही कायम मुंबईला, पण लेकीची पहिलीच पोस्टींग अहमदाबादला झाली आणि सगळी समीकरणेच बदलून गेली. प्रथम ती देहरादूनला ट्रेनिंगसाठी दीड वर्ष होती तेव्हा काहीच तक्रार नव्हती. पण, आता ती कायमची निदान तीन वर्षे तरी तेथे इंदूरला जाणार यामुळे सगळे घरचं अस्वस्थ झाले.

सुधाच्या मागची दोन भावंडे ती शिकत होती. अरुणरावांची अजून नोकरीची तीन वर्षे बाकी होती. तेवढ्यात त्यांचे शिक्षण आटोपेल आणि तीही मार्गी लावतील अशी सगळी व्यवस्था होती. पूऱ्या नोकरीत अरुणराव सरकारी निवास स्थानात बांद्र्याला रहात होते. त्यांनी मुंबईत रहायला जागेसाठी काहीच प्रयत्न केला नाही. नोकरीत त्या पगारात सगळा गाडा ओढता ओढता त्यांचा पूरा दम निघाला होता.

त्यात अरुणरावांची पत्नीही एकाएकी कोरोनाच्या प्रादुर्भावाने हे जग सोडून गेली. ती पोकळी वयाची पंचावन्न वर्षे पार केलेल्या अरुणरावांना कठीण जात होती. मुले शिकणारी, त्यात सुधा अहमदाबादला, जेवण व सारा प्रपंचाचा भार त्याच्यावरच पडला होता. त्यांनी एक बाई जेवण करायला ठेवली. पण त्यांच्या नोकरीच्या वेळा, मुलांचे कॉलेज यामुळे त्या बाई सोडून गेल्या. म्हणून अरुणरावांनी खानावळीतून डबा मागवायला सुरूवात केली. वर्षानुवर्षे आईच्या हातचे रुचकर खाणे खाणाऱ्या मुलांना ते जवण आठवडाभरातच बंद करावे लागले. म्हणून त्यांनी महिन्याची रजा टाकली.

आता रजेनंतर ऑफीसला जावे लागले. मग काय ? काहीच उपाय सापडत नव्हता. त्यांची बेचैनी दिवसेंदिवस वाढतच होती. आणि शेवटी ऑफीसमध्ये रुजू होण्याची वेळ आली एकदाची. अरुणरावांनी दोन्ही मुलांना या गोष्टीची कल्पना दिली. पण ती ना समज मुले अबोल झाली आणि अरुणरावांनी अजून एक महिन्याची मेडीकलची रजा टाकली. आता या अडचणीला काही शेवट

नव्हताच. गावाकडून म्हणजे रत्नागिरीतून एखादी पोक्त स्त्री मिळते का हे त्यांनी पाहिले, पण काहीच उपयोग झाला नाही. शेवटी त्यांची सोन्यासारखी नोकरीतून त्यांना व्ही.आर.एस. घ्यावी लागली. आणि मुलांची ही व्यवस्था रत्नागिरीत केली.

रत्नागिरीतले त्यांचे घर प्रशस्त होते. सगळ्या सोईंनी युक्त, शहरापासून जवळ असे होते. आता सारे काही सुरळीत चालले होते. अरुणराव सगळे घर सांभाळीत, पण मिळणाऱ्या पेन्शनमध्ये घरचा खर्च, मुलांचे शिक्षण याचा ताळमेळ बसत नव्हता. वर्षभरात त्यांना प्रॉव्हीडंड फंडाच्या त्यांच्या एफडी मोडाव्या लागल्या. या ओढाताणीत अरुणरावांची प्रकृतीही मध्ये मध्ये बिघडत होती. तोही खर्च डोक्यावर नव्याने आला होता. सगळी घडीच बिघडत चालली होती. अगदी मेटाकूटीला ते आले होते. सुधाकडून काही मदत घ्यावी हे त्यांना पटत नव्हते.

आणि आता तर ती दूर अहमदाबादला, तिला सरकारी जागा मिळाली होती. जायला यायला सरकारी गाडी, तशी फारशी अडचण नव्हती तिलाही. नोकर चाकरांचा पगार व इतर खर्चाची जुळवाजूळव करावी लागत होती. आता ती वडील, भावंडे यांच्यापासून दूर होती. कोरनाचा काळ, जबाबदारी कामाची यातून तिलाही रजा घेता येईना. पुन्हा अहमदाबाद मुंबई व तेथून रत्नागिरी असा त्रांगड्याचा प्रवास. खूप अस्वस्थ होती ती. गेले वर्षभर ती अहमदाबादलाच होती.

हि सरकारी नोकरी म्हणजे अनेक अडचणींचे मायाजाल, पार करता करता ती ही अस्वस्थ होती. त्याच चौवीस तास दावणीला बांधलेली. सध्या तिची पोस्टींग अहमदाबाद सचिवालयात सह सचिव म्हणून झाली होती. परके ठिकाण, भाषेची अडचण, पण त्यातून तिने सारे निभावले होते. आता या नोकरीच्या निमित्ताने अस्थिर जीवनाची सवय लावायला हवी हे तिला कळून चूकली होती. अनेकवेळा तिच्या मनात येई पोस्टींग चॉईस देताना महाराष्ट्र कॅडर मागितले असते.. आज ना उद्या मिळाले असते. मग त्या हिशेबाने अडचणी कमी. पण ते न केल्याने आता पस्तावण्यात काही उपयोग नव्हता. पण एक रस्ता होता. तो म्हणजे त्याच कॅडरमधल्या महाराष्ट्रातील आय.ए.एस. मुलाशी लग्न गाठ बांधणे. या कल्पनेने ती क्षणभर सुखावली. पण हे जमावे कसे ?

त्यात आपल्या रिती भाती, जाती या प्रत्येक ठिकाणी आडव्या येऊ

लागल्या. एक तर आपल्या मराठा जातीत आय.ए.एस. नगण्य. शिक्षणाची ही वानवा होती तरुणात. शेवटी तो विचारही तिने झटकून टाकला आणि पाहू पुढे काय होते ते. आता तिची तिशी जवळ आली होती. नी अरुणला ही तिच्या लग्नाची काळजी होतीच.

त्यानंतर सुधाची दुसरी पोस्टींग मध्य प्रदेशात इंदुरला झाली. आता तिची काळजी अधिकच वाढली. ही बदली प्रमोशन वर होती. म्हणजे स्वीकारणे भागच होते. म्हणून ती आपल्या नोकरीवर रुजू झाली. गेल्या सहा वर्षात तिची वडीलांशी भेट गाठ नव्हती. सगळा मामला फोनवरच होत असे.

एक बरे झाले इंदूरला पूर्वीचा मराठमोळा प्रदेश, होळकरही मराठ्यांचे सरदार तेव्हा अनेक मराठी कुटूंब इंदूर संस्थानात आली. त्याचबरोबर शेजारचे बडोदा संस्थान ही फारसे लांब नव्हते. आता ती त्या जिल्ह्याच्या फारसे लांब नव्हती. आता ती त्या जिल्ह्याची जिल्हाधिकारी होती. तेव्हा तिच्याकडे सर्वांचे लक्ष होते. ती अजून लग्नाची आहे यासाठी मराठा उच्चभ्रू समाजात त्याबाबत चर्चा सुरू झाली.

एक दिवस काही कामानिमित्त हंबीरराव मोहिते हे सद्‌गृहस्थ आले. बराच वेळ बाहेर थांबल्यावर त्यांना प्रवेश मिळाला. ती इंदूरातील मोठी आसामी होती, गेले दोन तास हंबीरराव बाहेर उभे होते. वयाची सत्तरी पार केलेले हंबीरराव इंदूर आर्मीचे माजी कर्नल होते. वर काळाकोट व शेरवानी, हातात सोन्याची काठी, आकडेबाज मिशा अशा रुबाबातले हंबीरराव सुधासमोर आले.

‘‘सर आपण बसावे.’’

‘‘एस !’’

पण न बसता त्या रुपवान कन्येकडे पहात राहिले. हे रुपवतीचे ध्यान पाहून त्यांना आश्चर्य तर वाटलेच पण, तिच्या बद्दल मनात कुतूहल निर्माण झाले क्षणभर. ते खाली बसेनात म्हणून सुधा उठली, तिने शिपायाला बेल दिली. व स्वत: उठून त्यांना बसण्याची विनंती केली.

‘‘सर ! आपण बसावे ! काय काम काढलेत आपण ?’’

तसे काही फारसे महत्त्वाचे नाही. ते तुमचे ऑफीसर करतीलच. आपण प्रथमच येथे आलात या कुतूहलापोटी आपणास भेटावेसे वाटले म्हणून, आलो ! तुम्ही बसा! मी आपली पाचच मिनिटे घेणार आहे.

‘‘आज शनिवार आहे ! कामाचा लोड नाही ! आपण बोला ... ! मी

आपणाला ओळखीत नाही ! प्रथम आपली ओळख सांगा ! शिवाय आपले काहीच काम नाही ! तेव्हा!''

''तसे नाही. आज बऱ्याच दिवसांनी येथे आलो. तुमच्या अगोदरचे कलेक्टर सोहनी आमचे मित्र. एवढ्यात समजले की त्यांची बदली झाली. आपले नाव वाचले – कु.सुधा जाधव, म्हणून कुतूहलापोटी भेटायला आलो. गेल्या अनेक वर्षात मराठी कलेक्टर ची पोस्टींग येथे नव्हती. सगळेच युपी, बिहारी येथे येत असत. पण मराठी यायचे हं त्यांना ! इथलेच रहिवाशी. इंदूरकर म्हणायचे स्वतःला !''

''बरे! आपली ओळख ?''

''मी निवृत्त कर्नल हंबीरराव मोहिते. इंदूर आर्मीतून निवृत्त ! आता वास्तव्य इंदूरातच. शेतकरी बागायतदार आहे मी. दोनशे एकर वर मी विविध प्रकारची शेती करतो. मुले परदेशात इंजिनीअर, टी.सी.एस.मध्ये. एक मुलगा आर्मीमध्ये मेजरच्या पदावर आहे. सध्या त्याची पोस्टींग आसाम बॉर्डरवर आहे. आणि आम्ही दोघे येथे असतो आमचा पुर्वजांचा प्रशस्त वाडा आहे ! अजून काय ?

''काही नाही !'' सुधा.

सुधाने त्यांना कॉफी मागवून दिली. मग गप्पा सुरू होत्याच. अर्धा तास केव्हा गेला समजले नाही....

''आम्ही मराठ मोळे, मोहिते सरदारांचे वंशज, महाराष्ट्रातून आलेले. आमचे पूर्वज येथे स्थायीक झाले. आणि आम्ही येथे इंदूरकर झालो.'' हंबीरराव.

''ओके !'' काही काम आहे कां माझ्याजवळ ?''

''नाही ! ते तुमच्या डेप्युटी कलेक्टरने केले असणार. आम्ही एक सॉफ्टवेअर कंपनी काढायचे म्हणतो. परदेशात नोकरी करण्यापेक्षा आपला स्वतःचा व्यवसाय असावा. म्हणून येथील अटारी परगण्यात एक पाच मजली .... इमारत बांधली आहे. त्याचे ओ.सी. न्यायला मी आलो होतो ! हे माझे कार्ड. आपणास मी आमच्या घरी येऊन पाहुणचार घ्यावा, अशी मी विनंती करतो आहोत ! ती विनंती स्वीकारावी. अर्थात, मी माझी गाडी पाठवू का ?''

''चालेल ! उद्या रविवार.आमची सरकारी वाहने बंदच असतात ?'' सुधा.

सुधाला या गृहस्थाबद्दल का कोण जाणे प्रचंड कुतूहल निर्माण झाले होते. त्यांनी दिलेल्या माहिती व्यतिरिक्त तिला त्यांच्याबद्दक काहीच कल्पना नव्हती.

इंदूर ही होळकरांच्या राज्याची राजधानी. सुंदर मराठ मोळे शहर, जुने अनेक वाडे या शहरातले पण जुन्या आर्किटेक्टचे स्वच्छ रस्ते, बागा, हॉटेल्स नी सजलेले.

सकाळी साडे नऊ वाजताच हंबीररावांची मर्सिडीज गाडी सुधाच्या सरकारी बंगल्यासमोर उभी. हंबीरराव जातीने तिला न्यायला आले होते. सुधा तयारच होती. ती येऊन या गाडीत बसली. ती प्रथमच या उंची गाडीत बसत होती. पाचच मिनिटात त्यांची गाडी हंबीररावांच्या ''येळकोट'' वाड्यात आली. प्रशस्त वाडा. आत बागा, शेकड्यांनी रुम व सुंदर सजावट केलेला, प्रथम दर्शनी हॉल पाहून सुधाही क्षणभर चक्रावली. असा वाडा, ती प्रथमच पहात होती.

''यावे !'' हंबीरराव.

त्यांच्या सुविद्य पत्नी राजलक्ष्मी. सुधाच्या स्वागताला दरवाज्यातच उभ्या होत्या, त्या पुढे आल्या. मग सुधाने त्यांना वाकून नमस्कार केला. त्याही सुखावल्या. त्यांनी सुधाला आशीर्वाद दिले व सोबत वाड्यात घेऊन आल्या.

''माझे सासरे होळकर संस्थानचे जनरल होते. चीफ ऑफ आर्मी! त्यांचा हा वाडा. आमचे सगळे कुटूंब तेव्हा पासून येथेच आहे !'' राजलक्ष्मी.

सुधाने आत आल्यावर या वाड्याचा हॉल पाहिला. उंची पडद्यांनी सजवलेला. डायनिंग हॉल. सोन्याच्या काटे-चमच्यांनी अरेंज केलेला, उंची सोफे. झुंबरे पाहून सुधा क्षणभर भांबावली.

''प्रथम आमचा वाडा पहा ! तोवर न्याहारीची तयारी होईल... कसे ?'' राजलक्ष्मी.

''ठिक ! म्हणत सुधा, हंबीरराव व राजलक्ष्मी यांनी वाडा पाहिला. भक्कम बांधणीचा, दोनशे वर्षाचा जुना, पाहून प्रशस्त डायनिंग हॉल. ते परत डायनिंग हॉलमध्ये आले आणि न्याहारीसाठी बसले.

''प्रथमच एक कलेक्टर, या वाड्यात येत आहे !'' म्हणत... ते काही बोलणार, ऐवढ्यात हंबीररावांचे जेष्ठ चिरंजीव मेजर डॉ.अमर यांचे आगमन न्याहारीसाठी झाले.''

''सुधाताई ! हे आमचे जेष्ठ चिरंजीव, अमर, आर्मीत मेजर डॉक्टरआहेत. ते स्वत: एक निष्णात सर्जन आहेत आणि डेहरादूनच्या आर्मी मेडीकल हॉस्पीटलमध्ये असतात. आताच ते येथे दोन महिन्याच्या रजेवर आले आहेत. हे अविवाहीत आहेत. दुसरे चिरंजीव अमेरीकेत टी.सी.एस.मध्ये जी.एम.

आहेत.'' हंबीरराव.

''ओके ! सुधा... तिने त्यांना नमस्कार केला. एक राजबिंडा तीस वर्षाचा तरुण, रुबाबदार, उत्तम शरीरयष्टीचा हा तरुण पाहून सुधाच्या मनातही हलचल झाली, सगळे जण उभेच होते...

''बसा ! न्याहरीला सुरुवात करा !'' राजलक्ष्मी.

आजच्या खास बेतामध्ये ज्वारीची भाकरी आणि इंदूरचा खास चिटको ही भाजी शिवाय, दही व इतर गोष्टी बरोबर गुलाबजाम असा बेत होता.

सुधाचे सुंदर रुप अमरच्या मनात केव्हाच भरले होते. ती अविवाहीत आहे. हे या पूर्वीच हंबीररावानी अमरला सांगितले होते. हंबीररावही अमरसाठी योग्य स्थळाच्या शोधात होतेच. न्याहारी आटोपली.

''अरे अमर ! या मॅडमना आपले फार्म हाऊस दाखवून आण आणि मग त्यांच्या बंगल्यात सोड. तुझी लॅन्ड रोव्हर घेऊन जा !'' हंबीरराव.

''होय ! पप्पा !'' अमर.

सुधा निघण्यापूर्वी राजलक्ष्मीने सुधाला इंदूरची पैठणी व भेटवस्तू दिल्या, तिनेही त्यांचा मान ठेवून त्या स्वीकारल्या. व ती अमर बरोबर त्यांचे शेत पहायला गेली. हंबीरराव नगदी पिकाबरोबर ऊस व इतर लागवडी करीत असत. १५० कामगार या शेतावर काम करीत होते. सगळीकडे हिरवळच हिरवळ. विशेष म्हणजे ते भाजी, फळे यांची निर्यात करत होते. मालाची प्रत उत्तम तेव्हा भावही चांगला नी प्रचंड मागणी. हे सारे पाहून सुधाही भारावली.

''मी ही वर्षातून दोन महिने रजा घेऊन शेतीची कामे करतो. वडीलांचे वयही झाले आहे. कामे दिवसेंदिवस वाढत आहेत. महिन्याभरात भाऊ येईल. त्यांच्या कंपनीच्या कामासाठी तो इथेच राहणार आहे. त्याने पूर्वीच एक सॉफ्टवेअर कंपनी सेट अप केली आहे आणि त्याचे काम तो अमेरीकेत ही करतो आहे. आता पुढचा बिझनेस येथूनच होईल. खूप गप्पा दोघांनी मारल्या एकमेकांना ओळखून-पारखून घेतले. सुधाला हे स्थळ आवडले होते. पण हे जमावे कसे याच विवंचनेत ती होती. तिने अमरचा स्वभाव कसा आहे याची परीक्षा घेतलेली होतीच.

आठवड्याने शनिवारी अमर तिच्या ऑफीसमध्ये आला. तासभर थांबल्यावर चोपदाराने त्याला आत सोडले. त्याला पाहून सुधा उठून उभी राहिली. ती कलेक्टर होती. जिल्ह्याची प्रमुख कलेक्टर आणि दंडाधिकारीही.

येरव्ही कधी उठायचा प्रसंग आला नव्हता. पण आजची गोष्ट वेगळी होती.

तिने अमरला बसायला सांगितले, कॉफी दिली व येण्याचे प्रयोजन विचारले. पण तो आल्यावर आज ती सुखावली होती. तिला अमर आल्याने आनंद झालाच होता.

"मला वाटले आपल्याला भेटावे म्हणून आलो. शिवाय आईने तुम्हाला डिनरला बोलावले आहे उद्या. तेच सांगायला आलो होतो मी." अमर.

थोडा वेळ विचारात पडली. कारण उद्या मुख्यमंत्री दोन दिवसाच्या दौऱ्यावर येणार होते. मग कसे शक्य होणार ?

"सॉरी, उद्या सकाळपासून मुख्यमंत्री आणि जिल्हा पालक मंत्री दौऱ्यावर आहेत; तेव्हा पुढच्या आठवड्यात पाहू ! मला या लोकांची व्यवस्था व वेगवेगळ्या सेंटरच्या मिटींग आहेत. आज रात्री जागून सारे करावे लागेल. पुढच्या आठवड्यात मी फोन करीन. मग ठरवू." सुधा.

अमर नाराज झालेला दिसला.

"इटस ऑल राईट. सॉरी. हा प्रकार आमच्या ड्युटीचा एक भाग असतो तेव्हा तो टाळता येत नाही !" सुधा.

आणि नाराज मनानेच तो निघून गेला. तो जाताना त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे ती पहात राहिली. त्याची पर्सनॅलिटी कोणालाही भुरळ घालणारी होती. तो एक एम.डी. डॉक्टर आहे आणि देशाची सेवा करीत आहे. याचे तिला अपरूप वाटले.

तिच अवस्था अमरची. तिच्या समोरचा तो अर्धा तास खूपच अल्हाददायक वाटला. तिचे मृदू बोलणे, उच्च पदस्थ असूनही शांत, हसतमुख. तो तिच्या प्रेमातच पडला.

त्या रात्री अमरने हंबीररावाना या संदर्भात विषय काढून चर्चा केली व आपण या संदर्भात तिच्या जवळ, तिच्या पालकांजवळ बोलावे असे सुचवले. दिवाळी होऊन गेली होती. त्याच्या रजेचा अजून दीड महिना होता. त्या काळात विवाह मार्गी लावावा असे त्याने ठरवले होते.

पुढच्या रविवारी डिनरचे ठरले, स्वतः अमर तिला न्यायला आला होता. सुधाने त्याला बंगल्यात बोलावले व कॉफी दिली. मग तयार होऊन ती अमरबरोबर त्यांच्या वाड्यावर आली. तिच्या कुटूंबाची माहिती घ्यावी यासाठी हंबीररावांनी तिला विचारले..

"बेबी ! तुमचे आई-वडील कोठे असतात ?"

"रत्नागिरीला ! तेथे ते आणि माझी दोन भावंडे रहातात. ती कॉलेजमध्ये शिकत आहेत." सुधा.

"मी त्यांना भेटायचे म्हणतो. " हंबीरराव.

"जरुर ! पण आता त्यांचे वयही झाले आहे. फिरणे बंद झाले आहे. अनेक व्याधींनी ते त्रस्त आहेत. सत्तरीतले आहेत ते !" सुधा.

"पण मग मी फोनवर त्यांना संपर्क करू शकतो का ?" हंबीरराव.

"का नाही !" म्हणत तिने बाबांचा मोबाईल व लॅन्ड लाईन नंबर दिला.

"आहे खास काम." हंबीरराव.

सुधाला थोडा अंदाज आला होता आणि तिचा त्याला नकार नव्हता. ती उलट खूष होती. बरे झाले या प्रकरणाला हंबीररावांनीच हात घातला.

हंबीररावांनी तिच्या वडीलांना फोन केला व सविस्तर बोलणी झाली. त्यांनी त्यांची संमती दर्शविली. पण प्रथम तुम्ही माझ्या मुलीजवळ बोला असे सुचविले.

गेल्या आठ वर्षात सुधा वडीलांना भेटू शकलेली नव्हती. अहमदाबाद, तत्पूर्वी दीड वर्षे देहरादून व आता इंदूर, म्हणजे ती माझ्यापासून दूर दूरच आहे. म्हणजे ती सातत्याने दूरच होती. सुधाच्या वडीलांना तिला भेटावेसे वाटत होते पण प्रकृतीच्या कारणामुळे त्यांना ते शक्य झाले नाही. हा दुरावा त्यांच्या मनाला यातना देत होता. पण त्यांचा नाईलाज होता. गेली अनेक वर्षे आपली मुलगी आपल्यापासून दूर आहे, याच गोष्टींने त्यांना अस्वस्थ वाटत होते. आणि आता तर तिच्या लग्नाचे घाटत आहे आणि आम्ही तेथे पोहचू शकत नाही. यामुळे अरुणराव दुःखी होते. आपली मुलगी आपल्याला सातत्याने भेटावी असे राहून राहून त्यांना वाटत होते. पण त्यांचाही नाईलाज होता आणि सुधाचाही.

एवढा लग्नाचा सोहळा होत आहे आणि आपण त्याला हजर राहू शकत नाही यामुळे त्यांची झोप उडाली होती. रोज ते रात्री सुधाबरोबर मोबाईलवर बोलत असत. आणि ही खंत त्यांनी तिच्याजवळ बोलूनही दाखवली.

सध्या अनेक व्याधींनी अरुणराव त्रस्त होते. चालणे फिरणे बंद झाले होते. डॉक्टरांचे घरी येऊनच औषधोपचार चालू होते. सुधा सतत त्यांच्या स्वप्नातही येई. आणि मग ते अधिक अस्वस्थ होत. आता येथूनच तिला आशीर्वाद द्यावे लागणार आणि म्हणून ते सद्‌गदीत झाले होते. त्यांचा नाईलाज होता.

तिच्या लग्नाची पत्रिका कुरीयरने हंबीररावांनी पाठविली. त्यांनी उलट पत्री कळविले की माझी लाडकी लेक मला केव्हा भेटणार याच विवंचनेत माझा पूर्ण दिवस जात आहे. पण मी लग्नाला नाही पोहचू शकत.

शेवटी लग्न थाटामाटात पार पडले. सुधा हंबीररावांच्या घरी गेली. व लग्नाचे फोटो, सिडी तिने वडीलांना पाठविली. ते सगळे पाहून अरुणरावांचे डोळे भरून आले, अश्रूंनी डबडबले.

आपल्या लेकीचा दुरावा त्यांना खूपच दुःखदायक वाटत होता. पण तिचे लग्न झाले हेच समाधान मानून त्यांनी आपले डोळे पुसले.

आणि अचानक अरुणराव आजारी पडले. त्यांना काय होते आहे हे मुलांना कळेनाच त्यांनी अरुणरावांना रत्नागिरीच्या कॉटेज हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. निदान व्हायला वेळ लागला. त्या हॉस्पीटलमध्ये रिपोर्ट करण्यासाठीच्या सगळ्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. डॉक्टर म्हणाले – यांना मुंबईला घेऊन जावे लागेल. मुले गोंधळली. शिवाय पैशाची चणचण होतीच. आणि प्रवासही खर्चिक होता त्यात ना कुणाची मदत.

त्या हॉस्पिटलमध्ये डॉ.पाटील इन-चार्ज होते. त्यांना समजले की अरुणरावांची मुलगी कलेक्टर आहे. त्यांनी रत्नागिरीच्या कलेक्टरना या संबंधी संपर्क केला. चक्रे भराभर फिरली. अरुण रावांना मुंबईला आणले. आणि त्यांना के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये ॲडमीट करण्यात आले. पण अडचण होती ती – मुलांच्या राहण्याची. पण डॉ.पाटील यांच्या मित्राने ती अडचण सोडवली. अरुणरावांच्या आजाराचे निदान झाले. त्यांना कॅन्सर झाला होता. पण त्या हॉस्पिटलमध्ये ट्रीटमेंटची व्यवस्था नव्हती. आणि त्यांना समोरच्या टाटा हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. सर्जरी झाली. आणि दोन दिवसांनी अरुणरावांना शुद्ध आली.

झोपेतच ते त्यांच्या मुलीच्या म्हणजे सुधाला नावाने हाक मारीत असत. मुलाने सुधाला फोन केला. पण ती आठवड्याभराच्या दौऱ्यावर होती. तो भाग ग्रामीण दुर्गम भाग होता. आदिवासींचा. त्यामुळे संपर्क होऊ शकला नाही. आणि इकडे अरुणरावांनी अन्न-पाणी सोडले. आपल्या मुलीपासूनचा हा दुरावा त्यांना जिव्हारी लागला होता. मुलाने हंबीररावांना फोन केला आणि घरी निरोप ठेवला पण त्यांनाही सुधाचा संपर्क होऊ शकला नाही.

दोन दिवसांनी सुधा आली. तिला सगळा वृत्तांत कळला पण त्या काळात

अरुणरावांची प्रकृती अगदी गंभीर झाली. मी दोन दिवसात येते असे सुधाने अरुणरावांना निरोप पाठविला होता. ती मुंबईला आली होती. पण रात्रीची वेळ होती. हॉस्पिटलमध्ये रात्री कोणालाही पेशंटला भेटण्याची परवानगी नव्हती. सुधा आली हे अरुणरावांना समजले. अरुणराव कोमात गेले. ती त्यांच्या समोर येऊन उभी राहिली. पण अरुणरावांचे डोळे झाकलेलेच होते. ते एक जात डोळे उघडायला तयार नव्हते. आज आठ वर्षानंतर सुधा आपल्या वडीलांसमोर उभी होती. सुधाला रडू कोसळले व तिने तेथेच बसकन मांडले. एवढ्यात डॉक्टर आहे. त्यांनी अरुणरावांना तपासले पण काहीही न बोलता निघून गेले. सुधा त्यांच्या मागे गेली. पण आता सारे संपले असा त्यांनी इशारा केला. सुधाला दु:ख अनावर झाले होते. ती गांगरली. तिच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा सुरुच होत्या.

शेवटी आपल्या लेकीचा दुरावा अरुणरावांना सहन झाला नाही. ती आता येणारच नाही असा समज त्यांनी करून घेतला असावा आणि त्या बाप लेकीची भेट होऊ शकली नाही. सुधाच्या मात्र मनात आयुष्यभर यांची खंत जाणवत राहिली....

आपल्या लेकीवर जीवापाड प्रेम करणाऱ्या अरुणरावांनी तिच्या आईच्या पश्चात आईची माया दिली. तिला वाढवले, तिला शिक्षण दिले या आठवणींनी सुधाच्या मनालाही अरुणरावांचा हा दुरावा असह्य झाला होता.....

०-०-०



लेखक

## ॲड. यशवंत बाबुराव कदम

(नमनेश्वर)

**'लंडनचा किनारा'** हा लेखक ॲड. यशवंत कदम यांचा अकरा कथांचा कथासंग्रह मराठी साहित्यक्षेत्रात पदार्पण करीत आहे.

ॲड. यशवंत कदम हे एक उत्तम कवी आहेत. तसेच ते चतुरस्त्र लेखक ही आहेत. त्यांच्या मनावर ग्रामीण जीवनाचा ठसा उमटलेला आहे. ह्याची जाणीव त्यांचा **'लंडनचा किनारा'** कथासंग्रह वाचताना आपल्याला सतत होत राहते.

ह्या अकरा कथा मानवी जीवनाचा व मनाचा वेध घेतात. कथांची कथावस्तू व कलावस्तू व्यापक स्वरुपाची आहे.

ॲड. यशवंत कदम यांचे मूळ गाव कोकणातील चिपळूण तालुक्यातील आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील निसर्गरम्य असे महालक्ष्मीच्या आशीर्वादाने वसलेले त्यांचे 'टेरव' गाव आहे. त्यामुळे त्यांच्या ह्या कथासंग्रहात कोकणातील विविध गावांचे प्रकटीकरण स्वाभाविकपणे व्यक्त झालेले आहे. त्यांच्या ह्या कथांमध्ये वैश्विक जीवनातील अमर प्रेम सतत आपले अढळ स्थान प्रगट करते.

त्यांनी मानवी जीवनातील विविध घटनांचे अष्टपैलू दर्शन ह्या संग्रहातील अकरा कथांमधून वाचकांस घडविले आहे.

अशा कथांच्या ह्या वाङ्मयकृतीतून साहित्यप्रेमी वाचकांना लेखक ॲड. यशवंत कदम यांनी प्रणय, वात्सल्य, क्रोध, मत्सर, भय, भावनांच्या अतिरेकीपणाचा दुष्परिणाम, मानवी विकृती, मुंबईतील गिरण - गावातील चाळ संस्कृती, विविध मनोव्यापाराचे दर्शन, लैंगिक क्षुधा, स्त्रीला लाभलेले कष्टमय नैसर्गिक देणे, या भावनांचा प्रत्यय दिला आहे. ह्या कथा वाचकाला चिरंतन आनंद देतील व मानवी जीवनाच्या सुंदरतेचा आविष्कार घडवतील, असा मला विश्वास वाटतो.

आयुष्याचा अर्थ शोधणे म्हणजेच स्वत:शी बोलणे. त्याच संवादातून जीवनातील अनेक घटना लेखकाला खुणावतात व त्यातूनच मानवी जीवनाचा गर्भितार्थ शोधणाऱ्या कथा जन्मास येतात. ॲड. यशवंत कदम यांचा **'लंडनचा किनारा'** हा कथासंग्रह त्याची साक्ष देतो, अशी माझी खात्री आहे.

अवती भवती घडणाऱ्या घटनांचा सूक्ष्म तपशील लेखक मनात जपून ठेवतो आणि त्यातूनच **'लंडनचा किनारा'** सारखा सामान्य माणसांच्या मनातील भावना रेखाटणारा कथासंग्रह जन्मास येतो. अकरा विभिन्न हिऱ्यांच्या अंगठीत प्रत्येक कोंदणात बसवलेला एक एक वेगवेगळा हिरा म्हणजेच लेखक ॲड. यशवंत कदम यांची **'लंडनचा किनारा'** कथासंग्रहातील प्रत्येक कथा होय. प्रत्येक वाचकाने हा संग्रह एकदा निश्चितच वाचायला हवा.

**डॉ. सुनील सावंत**

ज्येष्ठ साहित्यिक

कोमल प्रकाशन